गार्डनमध्ये काम करण्यासाठी अपंग व्यक्ती व महिला पाहिजेत

पात्रता – B.com, Computer शिक्षित महिला पाहिजेत.

अर्जासह भेटा साईन रिसॉर्ट, चोंढी, रेवस रोड, अलिबाग

कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १० जानेवारी २०२६

किंमत ४ ₹

# रायगडातील घरपट्टी वसुलीत वाढ

- अवघ्या चार महिन्यांत ९०.७७ कोटींची वसुली
- समृद्ध पंचायत राज अभियानाचा मोठा प्रभाव

**यामुळे झाली घरपट्टी वसुलीत वाढ**

- समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत घरपट्टी वसुलीसाठी सोमवार व शनिवारी विशेष कॅम्पचे आयोजन
- थकबाकीवर ५० टक्के सवलत देण्याचा शासन निर्णय
- लोकअदालतीत ठेवलेल्या प्रकरणांचा तातडीने निपटारा
- जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून क्यूआर कोड, ऑनलाईन पेमेंटची सुविधा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. त्याचा परिपाक म्हणूनच जिह्यातील ग्रामपंचायतींच्या घरपट्टी वसुलीत या अभियानादरम्यान लक्षणीय वाढ झाली आहे. अभियानाच्या पहिल्या टप्प्यात सप्टेंबर ते डिसेंबर २०२५मध्ये ग्रामपंचायतींची तब्बल ९० कोटी ७७ लाखांची वसुली आहे. या वसुलीमुळे ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होणार आहे.

रायगड जिल्ह्यात शासनाच्या समृद्ध पंचायत राज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची घरपट्टीची मोठी थकबाकी राहिल्याने या अभियानांतर्गत थकबाकी भरणासाठी ग्रामपंचायतींतर्फे विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायतींना सोमवारी व शनिवारी असे दोन दिवस घरपट्टी भरणासाठी कॅम्प आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. पान २ वर

> “जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत तब्बल ६२ टक्के घरपट्टी वसुली करण्यात आली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानामुळे घरपट्टी वसुलीला गती मिळाली आहे. अभियानाची मुदत आता ३१ मार्चपर्यंत वाढली असून, हे अर्थिक वर्ष संपेपर्यंत म्हणजे पुढील तीन महिन्यांत ही वसुली किमान ९० टक्क्यांपर्यंत करण्याचा आमचा मानस आहे. त्याप्रमाणे ग्रामपंचायतींनाही सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रामस्थांनीही ग्रामपंचायतींना घरपट्टी भरून सहकार्य करावे.”
> – नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद

# धरणाने गाठला तळ

**अवघा १५ दिवस पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक**

**खारेपाट विभागावर भीषण पाणीटंचाईचे सावट**





**। पेण । संतोष पाटील ।**

**उत्तर शहापाडा योजनेतील २७ गावे व ४३ वाड्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या शहापाडा धरणाची पाणी पातळी मोठ्या प्रमाणात खालावली असून, सध्या धरणात केवळ पंधरा दिवस पुरेल एवढा पाणीसाठा शिल्लक आहे. धरणात तळ गाठलेले मृत गाळयुक्त पाणी शिल्लक असून, ते पाणी पिण्यासाठी सोडल्यास नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**

गेल्या काही दिवसांपासून बंद असलेला पाणीपुरवठा जरी सध्या सुरु करण्यात आला असला, तरी तो अत्यंत कमी दाबाने होत आहे. हेटवणे कालव्याचा पाणीपुरवठा बंद केल्यामुळे भोगावती पान २ वर

> “पाणीटंचाईबाबत दोन दिवसांपूर्वी प्रांत कार्यालयात झालेल्या बैठकीत तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. पेणला पाणीपुरवठा न झाल्यास सिडकोचा पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा देण्यात आला असून, कालव्याद्वारे पाणीपुरवठा तातडीने पाणी सोडण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.”
> – योगेश पाटील, माजी सरपंच, वडखळ

### हेटवणे कालव्यातून पाणी मिळेपर्यंत टंचाईच

हेटवणे धरणातून सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईला पाणीपुरवठा होत असतान, पेणच्या जनतेला मात्र दरवर्षी पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. येणाऱ्या नव्या वर्षात शहरातील लोकसंख्या वाढणार असल्याने ‘धरण उशाला आणि कोरड घशाला’ अशी स्थिती नागरिकांच्या वाट्याला येण्याची भीती व्यक्त होत आहे.

# गुलशन कुमारांचा मारेकरी अब्दुलचा हृदयविकारानं मृत्यू

**। छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी ।**



टी-सीरीजचे मालक गुलशन कुमार यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला आरोपी अब्दुल रऊफ मर्चंट (वय ६०) याचा गुरुवारी मृत्यू झाला. हृदयविकाराच्या तीव्र झटक्यानं त्याचा मृत्यू झाल्याची माहिती कारागृह प्रशासनाच्यावतीनं देण्यात आली आहे. रऊफ मर्चंटची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून खालावली होती. ३० डिसेंबर रोजी त्याला सौम्य हृदयविकाराचा झटका आल्यानं घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. उपचारानंतर प्रकृतीत सुधारणा झाल्यानं ४ जानेवारीला त्याला पुन्हा कारागृहात आणलं गेलं. मात्र, गुरुवारी सकाळी पुन्हा त्याला अस्वस्थ पान २ वर

## वेधक

### भीषण अपघातात तिघांचा मृत्यू

**नवी दिल्ली** : इंदूरमधील रालामंडल बायपासवर झालेल्या एका दुर्दैवी रस्ते अपघातात माजी खासदार गृहमंत्री बाला बच्चन यांची मुलगी प्रेरणा बच्चन, काँग्रेस प्रवक्ते आनंद कासलीवाल यांचे पुत्र प्रखर कासलीवाल आणि त्यांचा मित्र मान सिमरन संधू यांचा मृत्यू झाला. या अपघातात एक तरुणी गंभीर जखमी झाली असून, तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

प्रखर यांचा वाढदिवस साजरा करून हे तिघेही मित्र कॅनडा बायपासवरील कोको फार्मवरून परतत असताना रालामंडलहून विजय नगरला जात असताना त्यांची कार अनियंत्रित झाली. पान २ वर

### प्रवासी बस दरीत कोसळून आठ ठार

**नवी दिल्ली** : हिमाचल प्रदेशातील सिरमौर येथे शुक्रवारी मोठा अपघात झाला. प्रवाशांनी भरलेली एक खासगी बस दरीत कोसळली. या अपघातात आठ जणांचा मृत्यू जागीच मृत्यू झाला आहे. तर, अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. या बसमध्ये ३५ पेक्षा अधिक प्रवासी होते, त्यामुळे मृतांची संख्या वाढण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे. ही खासगी बस शिमलाहून कुपवीला जात होती. सिरमौर जिल्ह्यातील हरिपूरधारजवळ ही बस दरीत कोसळली. त्यामुळे अपघात घडताच घटनास्थळी मोठ्या प्रमाणात आरडाओरड झाली.

### शिक्षकांसाठी खुशखबर

**मुंबई** : गेल्या तीन वर्षांपासून रखडलेली जिल्हा परिषद शिक्षकांची आंतरजिल्हा बदली प्रक्रिया लवकरच मार्गी लागणार आहे. बदली प्रक्रियेचा सातवा टप्पा लवकरच सुरू करण्याच्या हालचाली ग्रामीण विकास विभागाकडून सुरू झाल्या असून, याबाबत प्रधान सचिवांनी राज्यातील सर्व शिक्षण अधिकाऱ्यांची बैठक घेऊन आवश्यक आवश्यक सूचना दिल्या आहेत. त्यामुळे दीर्घकाळापासून बदलीच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रहार शिक्षक संघटनेने सातत्याने या प्रश्नाचा पाठपुरावा केला असून, त्याला यश आल्याचे बोलले जात आहे.

# ‘काँग्रेसला सत्ता देऊ, पण भाजपची जिरवू’

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय समाज पक्षाचे (रासप) अध्यक्ष महादेव जानकर यांनी सोलापुरात प्रचारादरम्यान भाजपवर जोरदार आणि आक्रमक टीका केली. भाजप स्वतःला ‘पार्टी विथ डिफरन्स’ म्हणवते, मात्र आता त्या पक्षात कोणताही फरक राहिलेला नाही, अशी घणाघाती टीका जानकर यांनी केली.

“आम्ही भाजपचे बाप आहोत. कारण आम्हीच त्यांना सत्तेत आणले होते. आम्ही जिकडे असतो, तिकडे पारडे जड असते,” असा दावा करत जानकर यांनी भाजपला थेट आव्हान दिले. पुढे ते म्हणाले, “वेळ आली तर आम्ही काँग्रेसला सत्ता देऊ, पण भाजपची जिरवू.” भाजपमधील जुन्या कार्यकर्त्यांची अवस्था बिकट असल्याचे सांगत जानकर यांनी भाजपचे आ. सुभाष देशमुख आणि विजयकुमार देशमुख यांच्यावरही टीका केली. “जर आमदारांचीच अवस्था इतकी वाईट असेल, तर सामान्य कार्यकर्त्यांची अवस्था काय असेल?” असा सवाल त्यांनी उपस्थित केला. भाजपमध्ये आज ‘ओरिजनल’ कार्यकर्त्यांना स्थान नसून, काँग्रेसमधून आलेले लोकच सत्तेचा उपभोग घेत असल्याचा आरोपही त्यांनी केला. “भाजप ही काँग्रेस झालेली नाही, तर काँग्रेसचे कार्यकर्ते भाजपात आलेत, असेही जानकर म्हणाले.

### याचिका फेटाळली

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

महापालिका निवणूक उमेदवारांकडून विविध विभागांतून एनओसी आणण्याची सक्ती करण्याच्या निर्णयाविरोधातील याचिका शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळून लावली. ही प्रक्रिया आधीच पार पडली. निवडणूक अगदीच तोंडावर अलेली असताना यात हस्तक्षेप करणं योग्य ठरणार नाही. त्यामुळे सगळीच प्रक्रिया बारगळून निवडणुकीच्या वेळापत्रकावर त्याचा थेट परिणाम होईल. त्यामुळे या टप्प्यावर या याचिकेवर सुनावणी घेणे योग्य ठरणार नाही, असे स्पष्ट करत मुंबई उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना कोणताही दिलासा देण्यास नकार देत याचिका फेटाळून लावली.

# ..तर शिंदेंचा टांगा पलटी करुन घोडेपण फरार करेन

### गणेश नाईकांचे खुलं आव्हान

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) युतीचे सरकार सत्तेवर असले तरी नवी मुंबई महापालिकेत मात्र हे दोन्ही पक्ष स्वबळावर निवडणूक लढवत आहेत. या निवडणुकीत गणेश नाईक विरुद्ध शिंदेची शिवसेना असा सामना रंगला असतानाच, गणेश नाईक यांनी पुन्हा शिंदेवर टीका केली आहे. भाजपाने परवानगी दिली तर एकनाथ शिंदेंचा टांगा पलटी करून घोडेपण बेपत्ता करेन, असे खुले आव्हान गणेश नाईक यांनी शिंदे यांना दिले आहे.

नवी मुंबईत शिवसेना (शिंदे गट) विरुद्ध भाजप असा सामना रंगला आहे. वनमंत्री गणेश नाईक आणि शिंदे सेनेचे नेते यांच्यात गेल्या काही दिवसांपासून आरोप-प्रत्यारोप तसेच टीकाटिप्पणी सुरू आहे. नवी मुंबई महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने शहरात सुरू केलेल्या ‘नवी मुंबई, नवं सरकार’ या प्रचाराला ‘नवी मुंबईकरांसाठी जुनं तेच सोनं’ असल्याचे जोरदार प्रत्युत्तर भाजप नेते आणि वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले.

ठाणे हा कोणाचाही बालेकिल्ला नाही. केंद्रीय नेतृत्वाने रोखले नसते आणि माझ्याकडे जबाबदारी दिली असती तर संपूर्ण जिल्ह्याचे राजकीय चित्र पालटून दाखविले असते, असा दावाही नाईक यांनी यावेळी केला होता. गेल्या पाच वर्षांत प्रशासकीय कालावधीत नवी मुंबईला लुटणाऱ्यांना येथील मतदार घरचा रस्ता दाखवतील, असेही नाईक यावेळी म्हणाले.

गणेश नाईक यांनी केलेल्या विधानामुळे शिंदेच्या सेनेत अस्वस्थता पसरली असतानाच, गणेश नाईक यांनी आता पुन्हा शिंदेंवर टीका केली आहे. एकनाथ शिंदे यांच्याशी माझे काहीही वैयक्तिक मतभेद नाही. पण एकनाथ शिंदे नेहमी म्हणातात, ‘मला हलक्यात घेऊन नका, टांगा पलटी घोडे फरार करेन’ पण तुम्ही गणेश नाईकांना हलक्यात घेतले ना, तुमच्या आधी मी येथे तीन वेळा ठाणे जिल्ह्याचा पालकमंत्री होतो. तुमच्या सुपुत्राच्या कल्याण लोकसभा मतदारसंघातील कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील १४ गावांचा नवी मुंबईत सामावेश करताना मंत्रालयात बैठक बोलावली. त्यात आम्हाला विचारलेदेखील नाही. हा प्रस्ताव पूर्वी मीच मांडला होता. पण, त्यात काहीतरी अटी होत्या. गणेश नाईकांना हलक्यात घेतला ना आणि भाजपने मला परवानगी दिली तर एकनाथ शिंदे यांचा टांगा पलटी करून घोडे फरार नाही तर बेपत्ता करुन टाकेन, असे नाईक म्हणाले.



**तळीरामांना बिअरची सर्वाधिक भुरळ** | **वाइनच्या विक्रीत प्रचंड घट**

# डिसेंबरमध्ये ४४ लाख लीटर दारु रिचवली

**प्रमोद जाधव**

**। रायगड ।**

**रायगड जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात मद्यविक्रीने उच्चांक गाठला असून, तब्बल ४३ लाख २७ हजार ५२५ बल्क लीटर दारू तळीरामांनी रिचवली आहे. यामध्ये बिअरची विक्री सर्वाधिक झाल्याचे राजय उत्पादन शुल्क रायगड विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. देशी व विदेशी दारुपेक्षा बिअरला मद्यपींची मोठी पसंती मिळाल्याने वाईनच्या विक्रीत मात्र लक्षणीय घट नोंदवली गेली आहे.**



**दारु विक्रीवर दृष्टीक्षेप**

- देशी 9,51,381
- विदेशी 1,14,426
- बिअर 24,96,960
- वाईन 64,758

डिसेंबरमध्ये नाताळसह थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक दाखल झाले होते. त्यामुळे हॉटेल, रेस्टॉरंट, कॉटेज पर्यटकांनी फुल्ल होते. दहा लाखाहून अधिक पर्यटकांनी या कालावधीत जिल्ह्याला भेट दिल्याने मद्यविक्रीत प्रचंड वाढ झाली. अनेक ठिकाणी पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले होते, त्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून मद्यविक्रीचे परवानेही देण्यात आले होते.

आकडेवारीनुसार, डिसेंबर महिन्यात ४३ लाख २७ हजार ५२५ बल्क लीटर इतकी दारु मद्यपींनी रिचवली असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये नऊ लाख ५१ हजार ३८१ बल्क लीटर देशी दारु, नऊ लाख १४ हजार ४२६ बल्क लीटर विदेशी दारु, २४ लाख ९६ हजार ९६० बल्क लीटर बिअर आणि ६४ हजार ७५८ वाईन विकली गेली. यावरुन बिअरची क्रेझ किती वाढली आहे, हे स्पष्ट होते.

विदेशी दारुच्या किमतीमध्ये तीस टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाल्याने मद्यपींनी बिअरकडे मोर्चा वळवला. ६५० रुपयांची बाटली ९०० रुपयांपर्यंत गेली असून, प्रत्येक क्वॉर्टरमागे साठ रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे यंदा विदेशी दारुपेक्षा बिअर पिण्याकडे पान २ वर

### विदेशी दारु विक्रीवर परिणाम

विदेशी दारुच्या विक्रीमध्ये भरमसाठ वाढ करण्यात आली आहे. १५० रुपयांना मिळणारी दारु २००हून अधिक रुपयांनी बाजारात विकण्यात आली. त्यामुळे यंदा विदेशी दारुपेक्षा बिअरला विक्रीला मद्यपींना पसंती दर्शविली. त्याचा परिणाम विदेशी दारुच्या विक्रीवर झाला असल्याची माहिती समोर येत आहे.

### दारु पिण्याची वाढती क्रेझ

दारु पिण्याचा क्रेझ दिवसेंदिवस वाढत आहे. गावठी दारु बरोबरच देशी, विदेशी दारु पिणे ही फॅशन झाली आहे. नियमीत दारु पिणाऱ्यांसह काही जण महिन्यातून सहा महिन्यातून एकदा दारु पिणारेदेखील मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे मद्यपींची संख्या वाढत आहे.

### ४८ तास धोक्याचे

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

राज्यात थंडीचा कडाका पुन्हा वाढताना दिसत असून, पुढील काही दिवस तापमानात चढ-उतार कायम राहणार आहेत. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात थंडीचा जोर अधिक जाणवत असून, उत्तर महाराष्ट्रात किमान तापमानात मोठी घट नोंदवण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्रातील काही भागांत नीचांकी ६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. दरम्यान, कोकण विभागात इतर भागांच्या तुलनेत तापमान जास्त असल्याचं दिसून येतं आहे. १० जानेवारी रोजीही राज्याच्या बहुतांश भागांत थंडी कायम राहण्याचा अंदाज आहे. उत्तर भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा वेग वाढल्याने तापमानात लक्षणीय घट होण्याची शक्यता असून, येत्या ४८ तासांत काही भागांत बर्फासारखी थंडी जाणवू शकते.

# गोमांसाची वाहतूक करणारा अटकेत

### ३० किलो गोमांस व स्कुटी जप्त



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

संपूर्ण महाराष्ट्रात गोवंश हत्येवर कायदेशीर बंदी असतानाही अशा बेकायदेशीर कृत्यांचे प्रकार सातत्याने उघडकीस येत आहेत. रायगड जिल्ह्यातील माणगाव, म्हसळा व महाड तालुक्यांमध्ये गोवंश हत्येचे प्रमाण अधिक असल्याचे चित्र असून, श्रीवर्धन पोलिसांनी वेळेवर कारवाई करत गोवंश मांसाची वाहतूक करणाऱ्या आरोपीस अटक केली आहे.

श्रीवर्धन शहरालगत असलेल्या आराठी ग्रामपंचायत हद्दीतील मेटकर्णी परिसरात काही इसम बाहेरुन गोमांस आणून विक्री करत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचला असता, गुरुवारी दुपारी सुमारे पावणे चार वाजता शौकत गुलाम काझी ( रा. मेटकर्णी परिसर) हा टीव्हीएस कंपनीच्या स्कुटीवरुन अंदाजे ३० किलो वजनाचे गोमांस घेऊन जात असल्याचे आढळून आले.

भट्टीचा माळ परिसरात पोलीस शिपाई तुषार रामभाऊ आठरे यांनी आरोपीची स्कुटी अडवून तपासणी केली असता, त्याच्याकडे गोमांस असल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळी पंचनामा करुन पोलिसांनी गोमांसासह संबंधित स्कुटी ताब्यात घेतली.

या कारवाईदरम्यान पोलीस उपनिरीक्षक प्रदीप राठोड व सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन लकडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पान २ वर

### शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिलला

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने घेण्यात येणारी चौथी आणि सातवीची उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. परीक्षा परिषद आयुक्त अनुराधा ओक यांनी याबाबत पत्रक काढले आहे. त्यात म्हटले आहे की, यावर्षीपासून चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. या परीक्षेची अधिसूचना परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. यंदाच्या २०२५-२६ या शैक्षणिक सत्राची शिष्यवृत्ती परीक्षा दि. २६ एप्रिल अशी निश्चित करण्यात आली आहे.

# रोहा-कोलाड रस्त्यालगत बेवारस वाहनांचा विळखा

### रहदारीला अडथळा, अपघाताचा धोका वाढला



**। धाटाव । प्रतिनिधी ।**

रोहा-कोलाड रस्त्यालगत अनेक दिवसांपासून धूळ खात पडलेली व भंगार अवस्थेत उभी असलेली बेवारस वाहने रहदारीस मोठा अडथळा ठरत आहेत. या बेशिस्तपणे उभ्या केलेल्या वाहनांमुळे पादचारी, सायकलस्वार तसेच दुचाकी व चारचाकी चालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून, अपघाताला निमंत्रण मिळत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

मुंबई-गोवा महामार्गाला जोडणारा रोहा-कोलाड रस्ता हा धाटाव औद्योगिक पान २ वर

### गुजरातच्या राजकोटमध्ये भूकंपाचे धक्के

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

गुजरातच्या राजकोट जिल्ह्यात शुक्रवारी पहाटे सव्वासहाच्या दरम्यान अवघ्या चार तासांमध्ये भूकंपाचे एकामागून एक तब्बल ११ धक्के जाणवले. अचानक आलेल्या या मोठ्या संकटामुळे जिल्ह्यातील लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. नागरिक प्रचंड घाबरले आहेत. भूकंपाचा पहिला धक्का जाणवताच नागरिकांनी घराच्या बाहेर धाव घेतली. त्यानंतर एकामागून एक भूकंपाचे धक्के जाणवले. हे सर्व भूकंपाचे धक्के सौम्य होते, यामध्ये फार काही नुकसान झालेलं नाही, २.७ ते ३.८ रिस्टर स्केल एवढ्या तीव्रतेचे हे भूकंप होते.

# लायन्स फेस्टिव्हलचा दिमाखदार शुभारंभ

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग-मांडवा रोडवरील कनकेश्वर फाटा येथे लायन्स क्लब ऑफ अलिबाग-मांडवा यांच्यावतीने दि. ८ ते १२ जानेवारी या कालावधीत आयोजित भव्य लायन्स फेस्टिव्हलचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. पाच एकरांच्या विस्तीर्ण परिसरात भरलेल्या या महोत्सवाचे मुख्य आकर्षण असलेल्या सरखेल कान्होजीराजे आंग्रे व्यासपीठावरून मान्यवरांनी उपस्थितांना संबोधित केले.




या दिमाखदार सोहळ्याप्रसंगी व्यासपीठावर प्रथम प्रांतपाल प्रवीण सरनाईक, द्वितीय प्रांतपाल विजय गणात्रा, अलिबागचे माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक प्रशांत नाईक, माजी प्रांतपाल अनिल जाधव, बोरिस-गुंजीस ग्रुपग्रामपंचायत सरपंच सदिच्छा पाटील, रिजन चेअरपर्सन गिरीश म्हात्रे आणि झोन चेअरपर्सन डॉ. रेखा म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच लायन्स क्लब अलिबागचे अध्यक्ष प्रदीप नाईक, पोयनाडचे अध्यक्ष गुरुनाथ माळी, डायमंड क्लब अलिबागच्या अध्यक्षा श्रृती सरनाईक, फेस्टिव्हल चेअरमन नितीन अधिकारी, लायन्स क्लब मांडवाचे अध्यक्ष ॲड. ऋग्वेद ठाकूर, सुबोध राऊत, अरविंद घरत, अमिष शिरगावकर, धवल राऊत, सुधीर पुरो, अभिजीत गुरव, हर्षद पाटील, अजय आंगणे, पंकज केसरकर, विद्या अधिकारी, मृदुला राऊत, मीनल ठाकूर, मोहन पाटील आणि प्रदीप पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी मांडवा लायन्स क्लबने आयोजित केलेल्या या फेस्टिव्हलचे विशेष कौतुक केले. लायन्स क्लबने आपल्या विविध सामाजिक कार्यांतून अलिबागमध्ये स्वतःचा एक वेगळा आणि सकारात्मक ठसा उमटवला असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला फेस्टिव्हल चेअरमन नितीन अधिकारी यांनी प्रास्ताविक करताना क्लबच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.

महोत्सवाच्या पहिल्या दिवसाची सुरुवात प्रसिद्ध लावणी कलाकार, नृत्य दिग्दर्शक आणि अभिनेते अश्मिक कामठे यांच्या बहारदार लावणीने झाली, तर शालेय नृत्य स्पर्धेने पहिल्या दिवसाची सांगता झाली. या पाच दिवसीय फेस्टिव्हलमध्ये खाद्यपदार्थ, गृहोपयोगी वस्तू आणि सौंदर्य प्रसाधनांचे तब्बल १०५ स्टॉल्स लावण्यात आले असून, मुलांसाठी खास अम्युझमेंट पार्क हे आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीम सुतार आणि सुमीत पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन धवल राऊत यांनी केले.

## देशी दारू विक्रेत्यांवर कारवाई

**पनवेल :** पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांनी देशी दारू विकणाऱ्यांवर कारवाई करून हजारो रुपये किमतीची देशी दारू जप्त केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी शहरात कोम्बिंग ऑपरेशन राबवून विशेष पथकाने शहरातील करंजाडे छापा टाकून त्याच्याकडून विनापरवाना विकत असलेली जवळपास ६०० रुपये किमतीची देशी दारू हस्तगत केली आहे. त्याचप्रमाणे पळस्पे येथील एका पानटपरीवर छापा टाकून त्याच्याकडे असलेली ९०० रुपये किमतीची देशी दारू हस्तगत केली. या कारवाईमुळे बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# उमेदवारांना जाहिरातींसाठी परवानगी अनिवार्य

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महापालिकेच्या ७८ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. आता प्रचाराची रणधुमाळी उडत आहे. यानिमित्ताने डिजिटल प्रचार करणाऱ्या उमेदवारांसाठी निवडणूक आयोगने काही बंधने घातली आहेत. निवडणूक आयोगच्या सूचनेनुसार आता कोणत्याही उमेदवाराला किंवा राजकीय पक्षाला डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर जाहिरात करताना महापालिकेच्या माध्यम प्रमाणन-संनियंत्रण समितीची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी डिजिटल माध्यमांमध्ये जाहिरात प्रसारणाच्या कार्यपद्धतीबाबत माहिती दिली आहे. डिजिटल माध्यमांमध्ये केल्या जाणाऱ्या जाहिरातींसाठी संबंधित उमेदवार आणि पक्षांना माध्यम प्रमाणन-संनियंत्रण समितीकडे अर्ज करावा लागणार आहे. या अर्जानुसार परवानगी घेतल्यावरच जाहिरात प्रसारित करण्याची मुभा दिली जाणार आहे. उमेदवारांनी जाहिरात प्रसारित करावयाच्या दिनांकापूर्वी किमान ५ दिवस आधी समितीकडे निवडणुकीच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण-जाहिरात प्रमाणान आदेश २०२५ या राजपत्रातील परिशिष्ट ४ नुसार अर्ज करणे आवश्यक आहे. या अर्जासोबत परिशिष्ट ५ मधील प्रतिज्ञापत्र आणि जाहिरातीची प्रत २ प्रती पेन ड्राईव्हमध्ये सांक्षांकित केलेल्या दोन मुद्रित प्रतींसह जमा करावी लागेल. या अर्जाचे नमुने पनवेल महारपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच माध्यम उमेदवारांना सूचना प्रमाणन-संनियंत्रण समिती कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. निवडणूक प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप, युट्युब यासारखी समाजमाध्यमे, दूरदर्शन, केबल वाहिन्या, सिनेमागृह, सार्वजनिक ठिकाणचे ऑडिओ-व्हिज्युअल डिस्प्ले, ई-वृत्तपत्रे च्या माध्यमांद्वारे निवडणूक काळात पक्षीय आणि उमेदवारांकडून केल्या जाणाऱ्या जाहिरातींसाठी सदर बंधने घालण्यात आली आहेत. निवडणूक अधिकारी तथा आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील सदर समिती अर्जाची छाननी करुन कार्यालयीन तीन दिवसांच्या आत त्यावर निर्णय देईल.

# अल्पसंख्याक मतदारांची भूमिका निर्णायक

**पनवेल :** खारघर येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होणाऱ्या पनवेल महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत तळोजा-खारघर परिसरातील प्रभाग क्रमांक ३ मध्ये अल्पसंख्याक मतदारांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. एकूण मतदारसंख्येतील मोठा टक्का अल्पसंख्याक समाजाचा असल्याने कोणत्याही उमेदवाराचा विजय अथवा पराभव या मतदारांच्या मतदानावर अवलंबून राहणार आहे. त्यामुळे सर्वच राजकीय आणि अपक्ष उमेदवारांनी अल्पसंख्याक मतदारांना आकर्षित करण्यासाठी विशेष रणनीती आखली आहे.

पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक ३ मध्ये ४७ हजार ७१५ मतदार आहेत. या प्रभागात अल्पसंख्याक समाज मोठ्या संख्येने वास्तव्यास असून, या समाजाची मतदार संख्या १८ हजार आहे. शिक्षण, रोजगार, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य सुविधा आदी मूलभूत सुविधांचे प्रश्न या मतदारांसाठी प्राधान्याचे ठरले आहेत. मागील काही वर्षांत नागरी सुविधा अपुऱ्या राहिल्याची भावना अल्पसंख्यांक समाजात असून, काम करणारा आणि सर्वसमावेशक विकास करणारा उमेदवारच निवडून देऊ, अशी भावना अल्पसंख्याक मतदार व्यक्त करत आहेत. विशेष म्हणजे, यावेळी मतदार केवळ पक्षचिन्हावर नव्हे तर, उमेदवाराची प्रतिमा, कामाचा अनुभव आणि स्थानिक प्रश्नांवरील भूमिकेचा सखोल विचार करताना दिसत आहेत. त्यामुळे पारंपरिक मतांचे ध्रुवीकरण कमी होऊन विकास विरुध्द दुर्लक्ष असा थेट सामना रंगण्याची शक्यता आहे. अनेक उमेदवारांनी अल्पसंख्याक वस्तीमध्ये प्रत्यक्ष भेटी, संवाद सभा, घराघरांत प्रचार तसेच समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींशी चर्चा सुरु केली आहे. खारघर आणि तळोजा या दोन्ही भागांच्या सीमारेषेवर असलेल्या प्रभाग क्रमांक ३ मध्ये झपाट्याने शहरीकरण झाले असले तरी मूलभूत सुविधा त्या वेगाने पोहोचल्या नसल्याची तक्रार या प्रभागातील मतदार करीत आहेत. त्यामुळे यंदा आश्वासन नव्हे, तर अंमलबजावणी हाच मुख्य मुद्दा बनला आहे.

दरम्यान, ओवेगावमध्ये वास्तव्यास असलेले भाजपा अल्पसंख्याक विभागाचे माजी रायगड जिल्हा अध्यक्ष मन्सूर पटेल गेल्या अनेक वर्षांपासून भाजपा मध्ये काम करीत असून, अल्पसंख्याकसमाजाचे मतदान भाजपाच्या पारड्यात पडावे, यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत. महापालिका प्रभाग क्रमांक ३ मध्ये अल्पसंख्यांक मतदारांचा कौल कोणाच्या पारड्यात पडतो, यावरच भावी नगरसेवकाचे भवितव्य ठरणार आहे. त्यामुळे निवडणूक जसजशी जवळ येईल, तसतशी अल्पसंख्याक मतदारांच्या भूमिका आणि अपेक्षांकडे सर्वांचे लक्ष केंद्रित होत आहे.

## पान १ वरून

### धरणाने गाठला तळ

नदीपात्रातील पाणीसाठा आटला असून, याचा फटका पेण शहरातील सुमारे एक लाख लोकसंख्येला तसेच वाशी, वडखळ व खारेपाट विभागातील २७ गावे व ४३ वाड्यांना बसणार आहे. एकूण दीड लाख लोकसंख्येच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

पेण शहराला हेटवणे किंवा आंबेघर धरणातून थेट पाणीपुरवठा करणारी कोणतीही स्वतंत्र योजना अस्तित्वात नाही. भोगावती नदी पात्रातील पाणी पिंपळडोह येथून लिफ्ट करुन ते नागरिकांना दिले जाते. मात, सध्या हेटवणे कालव्याच्या भूमीगत पाइपलाइनचे काम सुरू असल्याने कालवा विभाग व हेटवणे प्रकल्प संस्थेने सिंचनासाठी सोडण्यात येणारे पाणी बंद केले आहे. त्यामुळे खारेपाट विभागातील गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची चिन्हे आहेत.

पाणी ही जीवनावश्यक बाब आहे. तीन दिवसांआड मिळणारे पाणी जेमतेम अर्धा तास ते ४० मिनिटेच येते. जलवाहिन्या फुटणे व त्यातून होणारा विलंब लक्षात घेता, नवीन वर्षात ही समस्या गंभीर होण्यापूर्वीच हेटवणे कालव्याद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा.

– प्रभाकर म्हात्रे, माजी जि.प.सदस्य वढाव, वडखळ

### भीषण अपघातात तिघांचा मृत्यू

पार्क केलेल्या ट्रकला धडकली. कार चालवणारा काँग्रेस नेत्याचा मुलगा प्रखर याचा जागीच मृत्यू झाला, तर प्रेरणा आणि मन सिमरन यांचा रुग्णालयात मृत्यू झाला. अनुष्का ही आणखी एक तरुणी गंभीर जखमी असून तिच्यावर एमवाय हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. अपघातात नुकसान झालेल्या कारमध्ये दारूची बाटली आढळली. मृत प्रखर हा गाडी चालवत होता. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह ताब्यात घेतले. पोलीस घटनेचा तपास करत आहेत.

### रायगडातील घरपट्टी वसुलीत वाढ

या विशेष कॅम्पचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेउन अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला.

अभियान कालावधीतच १३ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या लोकअदालतीमुळे अनेक प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. या लोकअदालतीमध्ये जिल्हातील ग्रामपंचायतींकडून घरपट्टीची एकूण २७ हजार ३४१ प्रकरणे ठेवण्यात आली. यातील ८ हजार ३१६ प्रकरणांचा निपणारा करून ६ कोटी ८० लाख १४ हजार ९६३ रुपयांची घरपट्टी वसूल होण्यास मदत झाली.

रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यावर विशेष भर दिला जात आहे. वाढीव घरपट्टी वसुलीमुळे ग्रामपंचायतींना मूलभूत सुविधा, विकासकामे व लोकहिताच्या योजना अधिक प्रभावीपणे राबविता येणार आहे.

**पाणीपट्टी वसुलीतही एप्रिल ते डिसेंबर २०२५ दरम्यान ५०.५६ टक्के वसुली झाली असून, समृद्ध पंचायत राज अभियानाच्या पहिल्या टप्प्यात सुमारे ९ कोटींची वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे लोकअदालतीमध्ये पाणीपट्टीची ६ हजार ६८९ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यातील १ हजार ४७४ प्रकरणांचा निपटारा झाला असून १ कोटी १४ लाख ४१ हजार ५५० रुपयांची वसुली झाली आहे.**

### मारेकरी अब्दुलचा हृदयविकारानं मृत्यू

वाटू लागल्यानं तातडीनं घाटी रुग्णालयात नेण्यात आलं. परंतु, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला, अशी माहिती हर्सूल कारागृह अधीक्षक खामकर यांनी दिली आहे.

मुंबईत १२ ऑगस्ट १९९७ रोजी संगीत क्षेत्रातील प्रसिद्ध असलेले व्यक्तिमत्त्व आणि टी सिरीज या म्युझिक कंपनीचे मालक गुलशन कुमार यांची एका मंदिराबाहेर क्रूरपणे हत्या करण्यात आली होती. पोलिसांनी कारवाई करत गुन्ह्यात अटक केलेल्या मर्चंटला २००२ मध्ये जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. २००३ मध्ये त्याची रवानगी येरवडा कारागृहातून छत्रपती संभाजीनगरच्या हर्सूल कारागृहात करण्यात आली होती.

गुलशनकुमारांचा

### गोमांसाची वाहतूक करणारा अटकेत

श्रीवर्धन पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस शिपाई तुषार आठरे यांनी फिर्याद दिली आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास श्रीवर्धनच्या उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन लकडे व पोलीस उपनिरीक्षक प्रदीप राठोड हे करीत आहेत. दरम्यान, या प्रभावी कारवाईबद्दल विश्व हिंदू परिषदेचे रायगड जिल्हा मंत्री जितेंद्र करंजकर यांनी पोलिसांचे आभार व्यक्त केले. यापुढेही तालुक्यासह रायगड जिल्ह्यात अशा प्रकारेच काटेकोरपणे गोवंश हत्या बंदी कायदा राबवावा, अशी मागणी केली आहे.

### रोहा-कोलाड रस्त्यालगत बेवारस वाहनांचा विळखा

वसाहतीकडे जाणारा महत्त्वाचा मार्ग असल्याने येथे कामगार वर्ग, शाळकरी मुले, सायकलस्वार व इतर वाहनांची सतत वर्दळ असते. मात्र, रस्त्यालगत वाढती अतिक्रमणे, फळे-भाजी व मच्छी विक्रेत्यांचे ठाण, लहान दुकाने तसेच गॅरेजसमोरील उभी वाहने यामुळे रस्ता अरुंद होत चालला आहे.

रस्त्याच्या कडेला उभी असलेली ही वाहने पादचारी व दुचाकीस्वारांसाठी धोकादायक ठरत आहेत. त्यातच सायंकाळी पथदिवे कधी सुरू तर कधी बंद असल्याने ही वाहने नजरेस न पडता अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण होते. या मार्गावर यापूर्वीही अनेक अपघात घडून काहींना जीव गमवावा लागला असून, काहीजण कायमचे अपंग झाले आहेत. गेल्या कित्येक महिन्यांपासून रस्त्यालगत उभी असलेली ही वाहने मालकांकडून दुर्लक्षित असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण करणारी बेवारस व बेशिस्त वाहने तात्काळ हटवून संबंधित वाहनचालक व मालकांवर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून रोहा वाहतूक पोलीस प्रशासनाकडे करण्यात येत आहे.

### डिसेंबरमध्ये ४४ लाख लीटर दारु रिचवली

मद्यपींचा कल अधिक दिसून आला. एकंदरीत, वाढते पर्यटन, सण-समारंभ आणि महागलेली विदेशी दारु यांचा परिणाम म्हणून रायगड जिल्ह्यात डिसेंबरमध्ये बिअरची विक्री विक्रमी, तर वाईनची विक्री ढासळलेली असल्याचे चित्र समोर आले आहे.


## ई-निविदा सुचना-२ री

**मा. राज्य अतिथींच्या परिवहन व्यवस्थेकरीता खाजगी वाहन भाडेतत्वावर करुन घेण्यासाठी ई-निविदा**

रायगड जिल्ह्यातील मा. राज्य अतिथींच्या परिवहन व्यवस्थेकरीता विविध प्रकारची खाजगी वाहने भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येत आहे.

**कामाचे नाव :-** मा. राज्य अतिथीच्या परिवहन व्यवस्थेकरीता विविध प्रकारची खाजगी वाहने भाडेतत्वावर पुरवठा करणेबाबत.

| | |
|---|---|
| ई निविदा फार्म शुल्क | र.रु. १८,०००/- (विना परतावा) |
| इसारा/बयाणा (EMD) रक्कम | र.रु.१,८०,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | र.रु. १,८०,०००/- (एक लाख ऐंशी हजार मात्र) राष्ट्रीयकृत बँकेची गॅरंटी |
| ई निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वेळ | दिनांक १२/०१/२०२६ रोजी सकाळी ११.००. वाजता |
| ई निविदा भरण्याचा कालावधी | दिनांक १२/०१/२०२६ ते दिनांक १९/०२/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. १६/०१/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता |
| ई निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. १९/०१/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा फार्म क्रमांक-१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. २०/०१/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वा. |
| ई निविदा उघडण्याचे ठिकाण | सामान्य शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड, अलिबाग |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हाधिकारी (सा.प्र), रायगड, अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)

२ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.

३ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास ||| डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन यावी.

४ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

५ निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हाधिकारी (सा.प्र), रायगड यांचे दालनात राहील.

सही/-
(किशन ना. जावळे )
जिल्हाधिकारी रायगड

विमाका/कोवि/२०२५-२०२६/२७४



## जाहीर सूचना

याची नोंद घ्यावी की, आमच्या अशिलांच्या वतीने, आम्ही **रोशनी वसंत उद्यावर** यांच्या यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या झिराडपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खाता क्र. ६१ च्या दोन्ही (१) गट क्र. १०, क्षेत्रफळ ००एच-२९आर-८० पी आणि (२) गट क्र. १३, क्षेत्रफळ ०१एच-३५आर-२०पी पैकी ००एच-४४आर-२०पी च्या शेतकी जमीन, दायासी आणि मैदानाच्या (यात यानंतर **'सदर जमीन'** असा उल्लेख करण्यात आलेला आहे) संबंधातील हक्क विलेखांची चौकशी करीत आहोत.

सदर जमिनीच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, अभिहस्तांकन, गहाण, आकार, बक्षीस, न्यास, एकाधिकार, वारसा, भोगवटा, कब्जा, भाडेदारी, पोट- भाडेदारी, संमती, परवानगी, अनुज्ञप्ती, काळजीवाहू तत्वावरील, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, धारणाधिकार, परिरक्षा, सुविधाधिकार, प्रसंविदा, अधित्याग, अधित्यजन, अनुदान किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने कोणताही करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांतरण विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, सामंजस्य ज्ञापन, विवाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा न्यायालयीन आदेश, करार/ करारनामे किंवा भार किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/ किंवा मागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निम्नस्वाक्षरीकर्त्यांना अशा दाव्याच्या या सूचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत पाठींबा देणाऱ्या सर्व नोटरी केलेल्या दस्तऐवजासह लेखी स्वरुपात ज्ञात होण्यासाठी कळवावे, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा अशा व्यक्तींचा दावा, मागणी, अधिकार, हक्क, हितसंबंध, विवाद किंवा आक्षेप, जर काही असेल तर त्यांचा अधित्याग/परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**परिशिष्ट :**

**(सदर जमिनीचे वर्णन)**

गाव – झिराडपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील शेतकी जमीन, दायासी आणि मैदानाचा खाली दिल्याप्रमाणे तो सर्व तुकडा आणि भाग :

(१) गट क्र. १०, क्षेत्रफळ ०० एच -२८ आर-३० पी आणि एफ.एल. ०० एच -०१ आर-५० पी मिळून एकूण क्षेत्रफळ ०० एच -२९ आर-८० पी आहे, ज्याचे मूल्यांकन ३.७५ रुपये आहे.

आणि खालीलप्रमाणे सीमित असलेली :

उत्तर दिशेकडे : झिराडपाडा गावातील गट क्र. ९

दक्षिण दिशेकडे : झिराडपाडा गावातील गट क्र. ११

पूर्व दिशेकडे : झिराडपाडा गावातील गट क्र. १२ आणि गट क्र. १३

पश्चिम दिशेकडे : रस्ता

(२) एकूण ०१ हेक्टर-३९ आर-३० पी आणि एफ.एल. ०० एच -०७ आर-९० पी , म्हणजेच एकूण ०१ हेक्टर-४७ आर-२० पी जमिनीपैकी, रोशनी वसंत उद्यावर यांच्या नावावर असलेल्या खाता क्रमांक ६१ च्या आणि ८.६४ रुपये कर आकारणी असलेल्या, ०१ हेक्टर-२७ आर-३० पी आणि एफ.एल. ०० हेक्टर-०७ आर-९० पी, म्हणजेच एकूण ०१ हेक्टर-३५ आर-२० पी जमिनीपैकी गट क्र. १३, क्षेत्रफळ ०० हेक्टर-४४ आर-२० पी जमीन

आणि खालीलप्रमाणे सीमित असलेली :

उत्तर दिशेकडे : झिराडपाडा गावातील गट क्र. १३ चा उर्वरित भाग, रस्ता आणि गट क्र. ८

दक्षिण दिशेकडे : झिराडपाडा गावातील गट क्र. १२

पूर्व दिशेकडे : झिराडपाडा गावातील गट क्र. १३ आणि गट क्र. २१ चा उर्वरित भाग

पश्चिम दिशेकडे : झिराडपाडा गावातील गट क्र. ८, ९ आणि १०

**आज दिनांक १० जानेवारी, २०२६**

**नेहा सेहेगल**
**भागिदार,**
**युनिव्हर्सल लिगल**
१६१/१६२, ए विंग, मित्तल कोर्ट,
जमनालाल बजाज मार्ग,
नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१



## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. भारती कृष्णा कडवे, रा. म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या सामाईक मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १.म्हात्रोळी ता.अलिबाग | २३६ | ०-४५-०० पो.ख.०-१०-०० एकूण ०-५५-०० | ०.४७ |

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०१/२०२६ सही/-

**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.



## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक पुरुषोत्तम हिराचंद शाह (भक्त तर्फे वारस) अनिता कैलास गांधी, अलका अनिल पाटील, संगिता पुरुषोत्तम शाह, हेमांगी हेमंत साखळे, सरिता संतोष ओसवाल, संतोष पुरुषोत्तम शाह तर्फे अखत्यारी श्री. रोहन अजित ताम्हाणे रा. मुंबई यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे ता. अलिबाग | ४९१ | ०-६२-०० | १.१२ |

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ८/०१/२०२६ सही/-

**ॲड. विवेक रमेश साळवी**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.



## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक प्रसन्नता सुधीर बावकर, रा. मुंबई यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| किहीम ता. अलिबाग | ९० | ०-०३-०० पो.ख.०-००-८० एकूण ०-०३-८० | ०.८७ |

वर नमूद संपूर्ण मिळकत व या मिळकतीमधील ग्रुप ग्रामपंचायत किहीम घर क्र. १८३, क्षेत्र १३५.८३ चौ.मी. व घर क्र. १८१, क्षेत्र ६७.३७ चौ.मी. यासह

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०१/२०२६ सही/-

**ॲड. विवेक रमेश साळवी**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## निवडक



### ट्रान्सपोर्ट मालकांची बैठक संपन्न

**उरण** : ट्रान्सपोर्ट मालक संतोष कदम, सोनम ट्रान्सपोर्ट यांच्या तर्फे उरण तालुक्यातील स्थानिक ट्रान्सपोर्ट मालकांना विविध त्रास देण्यात येत आहे. यामुळे उरणमधील स्थानिक ट्रान्सपोर्ट मालकांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या महत्वाच्या समस्यांकडे पोलीस प्रशासनाचेही दुर्लक्ष झाल्याने व स्थानिक ट्रान्सपोर्ट मालकांवर सातत्याने अन्याय होत असल्यामुळे स्थानिक ट्रान्सपोर्ट मालकांची नवघर येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीला उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी विशेष उपस्थितीत सर्व मालकांच्या समस्या जाणून घेतल्या. स्थानिक ट्रान्सपोर्ट मालकांना कामधंद्यात रोजगारात प्राधान्य मिळावे, संतोष कदम व सोनम ट्रान्सपोर्टकडून होणारा अन्याय दूर करून न्याय मिळावा, बाहेरून येणाऱ्या परप्रांतीय ट्रान्सपोर्ट मालकाकडुन होणारा त्रास कमी व्हावा, पोलीस प्रशासनाने ट्रान्सपोर्ट मालकाबरोबर सहकार्याची भूमिका ठेऊन ट्रान्सपोर्ट मालकांना न्याय द्यावा, ट्रान्सपोर्ट मालकांवर होणारा विविध अन्याय, समस्याचे त्वरित निराकरण करावे आदी मागण्या ट्रान्सपोर्ट मालकांकडून यावेळी करण्यात आले. पोलीस प्रशासनासोबत बैठक लावून नगराध्यक्ष भावना घाणेकर यांनी समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले आहे.

### मुरुड येथे पारितोषिक वितरण संपन्न

**मुरूड-जंजिरा** : रायगड गणित विज्ञान अध्यापक मंडळाच्या गणित संबोध परीक्षा २०२४-२५ चा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवारी सर एस. ए. हायस्कूल, मुरुड येथे उत्साहात पार पडला. या समारंभाला मुरुड तालुक्यातील विविध शाळांचे मार्गदर्शक शिक्षक, पालक व दीडशेहून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी ललिता दहितुले, मुरुड तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, मुख्याध्यापक सरोज राणे, छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगरच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत, गणित संबोध परीक्षा अध्यक्षा मीना मोरे गणित मंडळ तालुका अध्यक्ष संदेश चोरघे, विज्ञान मंडळ तालुका अध्यक्ष सुरेश मोरे आदी उपस्थित होते.यावेळी मुख्याध्यापक सरोज राणे, संदेश चोरघे, परीक्षा प्रमुख मोरे आणि सुरेश मोरे आदींनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. शिक्षणाधिकारी ललिता दहितूले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि गणित शिक्षणाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. संदेश चोरघे यांनी प्रस्ताविक केले. परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना आणि शाळांना या वेळी सन्मानित करण्यात आले. सदर परीक्षेला मुरुड तालुक्यातून ५०७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी २७६ विद्यार्थ्यांना यशस्वी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. त्यातील जिल्हा शिष्यवृत्ती प्राप्त एकूण ८ विद्यार्थ्यांचा खास गौरव करण्यात आला.



### भोस्ते येथे बांधला वनराई बंधारा

**श्रीवर्धन** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत भोस्ते येथे ग्रामस्थ व श्रीवर्धन येथील महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने वनराई बंधाऱ्याचे बांधकाम व वृक्षारोपण करण्यात आले. लोकसहभाग व मेहनतीने वनराई बंधाऱ्याचे बांधकाम केले असून या स्तुत्य उपक्रमातून झालेल्या बंधाऱ्यामुळे पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीला एक नवीन स्त्रोतांची संजिवनी मिळाली आहे शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करीत असताना लोकसहभाग हा खुप महत्वाचा असून त्यातूनच गावाचा विकास होत आहे असे प्रतिपादन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच गणेश जावळेकर यांनी केले. या उपक्रमातून ग्रामपंचायत मुख्यमंत्री समृद्ध राज अभियानात आपली चांगली छाप सोडेल असे प्रतिपादन माजी सदस्य संतोष रटाटे यांनी केले. शासनाने वृक्ष लागवाडी करिता दिलेल्या आदेशानुसार लोकसहभागातून लागवड करण्यात आलेल्या आंबा, नारळ, चिकू, काजू व सुरू या झाडा भोवताली आलेल्या गवत व इतर छोट्या झाडांची बेणणी करण्यात आली व वृक्षांना खते ही लावण्यात आली तसेच ठिबक सिंचन करून पाण्याची व्यवस्था ही करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य योगेश लोखंडे, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# नारळ-सुपारी बागायतदार संकटात

## रायगडमधील हजारो कुटुंबाच्या उपजीविकेवर संकट; शासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

हवामानातील झपाट्याने होणारे बदल, वारंवार येणारी चक्रीवादळे, अवकाळी पाऊस, वाढती आर्द्रता आणि कीडरोगांचा प्रादुर्भाव यामुळे कोकणासह रायगड जिल्ह्यातील नारळ व सुपारी या पारंपरिक बागायती पिकांवर गंभीर संकट ओढावले आहे. उत्पादनात सातत्याने घट होत असताना या दोन्ही पिकांना प्रभावी पीकविमा संरक्षण उपलब्ध नसल्याने जिल्ह्यातील हजारो बागायतदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

जिल्ह्यात सध्या नारळाची १,२२७.९१ हेक्टर, तर सुपारीची ९७६ हेक्टर इतकी लागवड आहे.



अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन हे तालुके नारळ-सुपारी बागायतीचे प्रमुख केंद्र मानले जातात. मात्र हेच किनारपट्टीवरील तालुके वादळ, मुसळधार पाऊस आणि खारट वाऱ्याचा सर्वाधिक फटका सहन करत आहेत. अनेक भागांत नारळाच्या फळधारणेत लक्षणीय घट झाली असून सुपारीच्या झाडांवर करपा, पिवळेपणा तसेच विविध कीडरोगांचा प्रादुर्भाव वाढल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून होत आहेत.

काही ठिकाणी चक्रीवादळामुळे झाडे उन्मळून पडल्याने शेतकऱ्यांना पुन्हा नव्याने लागवड करावी लागत आहे. नारळ व सुपारी ही दीर्घकालीन बागायती पिके असल्याने लागवडीपासून उत्पादनापर्यंत किमान ८ ते १५ वर्षांचा कालावधी लागतो. या काळात रोपे, खते, औषधे, मजुरी, सिंचन, कुंपण, वाऱ्यापासून संरक्षण यासाठी मोठा खर्च करावा लागतो. झाडे उत्पादन देऊ लागल्यानंतरही देखभाल खर्च कमी होत नाही. अशा परिस्थितीत एखादी नैसर्गिक आपत्ती आली किंवा उत्पादन घटले, तर संपूर्ण आर्थिक गणित कोलमडते. विमा संरक्षण नसल्याने नुकसानभरपाई मिळेल की नाही, याबाबत अनिश्चितता असून शेतकरी अधिक असुरक्षित झाले आहेत.नारळ-सुपारी ही केवळ शेती पिके नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानली जातात. हजारो कुटुंबांची उपजीविका या पिकांवर अवलंबून आहे. किनारपट्टी भागात पर्यायी पिकांची मर्यादा, वाढता उत्पादन खर्च आणि मजुरीदर यामुळे बागायती शेती आधीच अडचणीत आहे. त्यातच विमा संरक्षणाचा अभाव असल्याने ही शेती टिकवणे कठीण होत असल्याची भावना बागायतदार व्यक्त करत आहेत.

### काजू व आंबा पिकांनाच संरक्षण

जिल्हा कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी सांगितले की, नारळ व सुपारीसाठी विमा संरक्षणाबाबत प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर पाठवण्यात आला होता. मात्र विम्यासाठी महसूल मंडळात किमान ३०० हेक्टर क्षेत्राची अट असल्याने अडचणी येत आहेत. सध्या काजू व आंबा पिकांनाच विमा संरक्षण उपलब्ध आहे. त्यामुळे नारळ-सुपारी बागायतदारांसाठी स्वतंत्र व प्रभावी विमा योजना लागू करण्याची मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

## सर्वांना सोबत घेऊन काम करणारे जी.एच. पाटील

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम दिवंगत जी. एच पाटील यांनी संघटनेच्या माध्यमातून केले आहे. संघटना मजबूत करण्याचे खरे श्रेय पाटील यांना जात आहे. सहाय्यक प्रशासनासह युनियन अध्यक्ष असताना सर्व कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन त्यांनी काम केले, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद युनियन कार्याध्यक्ष ॲड. बाबुराव पुजारवाड यांनी केले.

रायगड जिल्हा परिषद सेवा निवृत्त संघटना अध्यक्ष स्व. जी. एच पाटील यांचे २७ डिसेंबरला निधन झाले. त्या निमित्ताने अलिबागमधील पंचायत समितीच्या सभागृहात शोकसभेचे आयोजन शुक्रवारी (दि.९) संघटनेच्या वतीने करण्यात आले.



यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, सुरेश म्हात्रे, किशोर घरत, ए.बी. पाटील, ए. एम. पाटील, मंगेश पाटील, राम लाड, प्रकाश काळे, डॉ. राजेंद्र म्हात्रे, शुभदा पाटील, चारुलता कोरडे, सुविधा म्हात्रे, उल्हास इंदुलकर, संतोष साळावकर, सुदिन कांबळे, सुरेश जांभळे, अंजू वर्तक, रश्मी कांबळे, अशोक कुकलारे, झेंडेकर, सुचिता पाटील, मदन मोरे, डॉ. रवि पाटील आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद युनियन कार्याध्यक्ष ॲड.बाबुराव पुजारवाड यांनी सांगितले की, जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत राज्यात अनेक बैठका झाल्या. या बैठकांमध्ये जी. एच. पाटील उपस्थित राहत होते. ते एक अभ्यासू नेतृत्व असणारे व्यक्तिमत्व होते. संघटनेसाठी सढळ हाताने मदत करणारे एक निष्ठावन व्यक्ती होते. त्यांच्या निधनाने संघटनेत मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अलिबाग युनियन हे राज्यात अग्रेसर असल्याचे बोलणे वावगे ठरणार नाही. कारण जी. एच पाटील यांच्या नेतृत्वाखाली चांगले काम संघटनेने केले आहे. सर्वांना पुढे नेण्याचे काम पाटील यांनी केले आहे. अनेक माणसे त्यांनी निर्माण केली आहेत. संघटना मजबूत करण्याचे खरे श्रेय जी.एच पाटील यांना जात आहे. सहाय्यक प्रशासनासह युनियन अध्यक्ष असताना सर्व कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन त्यांनी काम केले. संघटनेसाठी निष्ठा ठेवून काम केल्यास जी. एच पाटील यांना खरी श्रध्दांजली ठरेल, असे पुजारवाड म्हणाले.

■ **ॲड.पुजारवाड यांचे प्रतिपादन**

## कुरूळमध्ये आज रंगणार भजन महोत्सव

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

क्षात्रैक्य समाज संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त शनिवारी (दि.१०) अखंड भजन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेच्या कुरूळ येथील सभागृहात संपन्न होणाऱ्या, स्व. प्रभाकर सदाशिव राणे स्मृती भजन महोत्सवात निमंत्रित दहा भजन मंडळे सहभागी होणार आहेत. यामध्ये अलिबाग तालुक्यातील जागृती पाटील, जयवंत पाटील व संदीप पाटील, प्रकाश नाईक, चेतन पाटील, भूषण माळवी व दयानंद भगत, समर्थ पाटील, नरेश कडू, निलेश जंगम, नितीन पाटील हे आपल्या भजन मंडळा सह सहभागी होणार आहेत. याशिवाय सुप्रसिद्ध भजन गायिका प्रणिता देशमुख यांनाही निमंत्रित केले आहे. सुप्रसिद्ध पखवाज वादक सुशांत पाटील हे आपल्या शिष्यवृंदा सोबत पखवाज सहवादन करणार आहेत. शेवटी चक्री भजन जुगलबंदीचा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये आदिनाथ सटले आणि महेश कंठे हे दोन सुप्रसिद्ध भजन सम्राट सहभागी होणार आहेत. भजन महोत्सवाचा लाभ संगीत आणि भजन रसिकांनी घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष द्वारकानाथ वामन नाईक, सचिव प्रदीप कृष्णाजी नाईक आणि भजन महोत्सव समिती प्रमुख ॲड. प्रसाद शांताराम पाटील यांनी केले आहे.

## दुरटोली गावानजीक लागला वणवा

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**

दुरटोली गावानजीक असलेल्या आदिवासी वाडी परिसरामध्ये सपाट मैदानाला वणवा लागला. या मैदानामध्ये गुरांच्या वैरणीसाठी असलेले सुमारे सहा एकर जमिनीवरील गवत जळून खाक झाले.

या गवताबरोबर लहान रोपटी खाक झाली. सायंकाळी चारच्या दरम्यान वाऱ्याचा वेग होता. त्यामुळे परिसरातील गवताला त्याची झळ पोहोचून गवत जळून खाक झाले. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे गुर चारण्यासाठी मैदानात असतात मात्र यावेळी गुरव मैदानात नसल्यामुळे जीवित हानी टळली. मात्र गुरांच्या वैरणीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर भासणार आहे. वणवा लागलेला समजताच दुरटोली ग्रामस्थांनी मेहनत घेऊन वणवा आटोक्यात आणला.

## नेरळ रेल्वे फाटक चार दिवसांनी वाहतुकीसाठी खुले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेवरील कर्जत दिशेकडे असलेल्या नेरळ स्थानकाच्या पुढील रेल्वे क्रॉसिंग फाटक दुरुस्तीच्या कामासाठी कोणत्याही प्रकारच्या वाहनांसाठी बंद होते. सहा जानेवारी रोजी रात्री दुरुस्तीच्या कामासाठी बंद करण्यात आलेले फाटक आज नऊ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता वाहनांच्या वाहतुकीस खुले करण्यात आले.

नेरळ जंक्शन रेल्वे स्थानक ते भिवपुरी रोड रेल्वे स्थानक



या दरम्यान मध्य रेल्वे मार्गावर फाटक २१ असून मध्य रेल्वे वरील सर्वाधिक वाहनाची गर्दी असलेले फाटक समजले जाते. त्या फाटकातून अवजड वाहनांची मोठी वर्दळ सुरू असते आणि त्यामुळे फाटकातील रेल्वे मार्गिका मधील दगडी खडी दबली जात असते. त्यामुळे मध्य रेल्वे प्रशासनाने या फाटकातून होणारी वाहनांची वाहतूक बंद करण्यात आली.सहा जानेवारी रोजी रात्री ही फाटक वाहनांच्या वाहतुकीस बंद करण्यात आला आणि आज नऊ जानेवारी रोजी ही फाटक वाहतुकीस पुन्हा खुला करण्यात आला आहे.या कालावधीत पेव्हर ब्लॉक लावण्यात आले असून मार्गिकेच्या दोन्ही बाजूला डांबरीकरण करण्यात आले असून दोन्ही मार्गिकेच्या मध्ये खडी टाकून पेव्हर ब्लॉक लावण्यात आले आहेत. आज सकाळी हे फाटक वाहतुकीस पुन्हा सुरू केले जात असताना विजय हजारे यांनी नाराजी व्यक्त केली.

## भडवळ परिसरात रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

दामत ग्रुप ग्रामपंचायतीमधील भडवळ येथील धनगरवाडी-कातकरवाडी येथील रस्त्याचे मंजूर काम केले जात नव्हते. त्यामुळे ग्रामस्थांनी १२ जानेवारी पासून उपोषण करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र उपोषणाच्या इशाऱ्यानंतर शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी त्या कामाचा नारळ फोडला असून लवकरच काम पूर्ण होईल असे आश्वासन दिले आहे.



धनगरवाडी आणि कातकरवाडीला मुख्य गावाशी जोडणारा रस्ता अद्याप तयार झालेला नाही. या रस्त्याअभावी दैनंदिन जीवनात अत्यंत मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात रस्त्याची स्थिती अतिशय बिकट होते. खराब रस्त्यामुळे आजारी रुग्ण, गरोदर महिला आणि शालेय विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. इतकेच नव्हे तर शेतीमाल, दूध आणि इतर जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणेही अशक्य झाले आहे.

रस्त्याचे काम करण्यात यावे यासाठी स्थानिक ग्रामस्थ सतत पाठपुरावा करीत आहेत. प्रशासनाचे दुर्लक्ष केल्याने आपल्या हक्काच्या रस्त्यासाठी ग्रामस्थांनी यापूर्वी अनेकवेळा संबंधित कार्यालयात तोंडी आणि लेखी तक्रारी केल्या आहेत. रस्त्याचे काम करण्यासाठी भूमि पूजन सोहळा शिवसेना शिंदे गटाने पूर्ण केला असून अशा कार्यक्रमाने रस्त्याचे काम खरोखरच पूर्ण होणार काय? असा प्रश्न स्थानिकांना पडला आहे. निवडणुका जवळ आल्या असून स्थानिक ग्रामस्थांना खुश करण्यासाठी नारळ फोडला आहे काय? असा प्रश्न देखील उपस्थित केला आहे.

## वारळचा अविश्वास ठराव फेटाळला

**। वारळ । प्रतिनिधी ।**

ग्रामपंचायतीच्या सरपंच कविता महेंद्र पेरवी व उपसरपंच किरण काशिराम चाळके यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव आवश्यक मतसंख्या न मिळाल्याने नामंजूर करण्यात आला.तहसीलदार सचिन खाडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत हा निर्णय घेण्यात आला.

सरपंचांवर मनमानी कारभार व गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले होते तसेच उपसरपंच मुंबईत वास्तव्यास असल्याने ग्रामस्थांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा दावा करण्यात आला होता.मात्र सभेमध्ये या आरोपांबाबत कोणतेही ठोस



पुरावे सादर करण्यात आले नाहीत. हातवर करून घेण्यात आलेल्या मतदानात एकूण ८ सदस्यांपैकी ५ सदस्यांनी अविश्वासाच्या बाजूने तर ३ सदस्यांनी विश्वासाच्या बाजूने मतदान केले. अविश्वास ठराव मंजूर होण्यासाठी किमान ६ मतांची आवश्यकता होती. एक मत कमी पडल्याने सरपंच व उपसरपंच यांच्याविरोधातील दोन्ही अविश्वास ठराव नामंजूर झाले. दरम्यान हा अविश्वास ठराव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत वादातून आणण्यात आल्याची चर्चा आहे.

**जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे समुपदेशन** | **तुटणाऱ्या नात्यांना मिळाली नवी दिशा**

# लोकअदालतीतून वर्षभरात १९ संसार पुन्हा जुळले

**। रायगड । प्रतिनिधी ।**

बदलती जीवनशैली, वाढता ताणतणाव, व्यसनाधीनता, आर्थिक अडचणी, संशय, संवादाचा अभाव तसेच शारीरिक व मानसिक छळ यांसारख्या विविध कारणांमुळे सध्या विवाहित जोडप्यांमध्ये कलह वाढताना दिसत आहे. किरकोळ वादातून सुरू झालेले मतभेद अनेकदा गंभीर स्वरूप धारण करून थेट घटस्फोटापर्यंत पोहोचत असल्याचे चित्र सर्वत्र दिसते. अशा परिस्थितीत तुटण्याच्या मार्गावर असलेल्या संसारांना वाचविण्यासाठी रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने लोकअदालतीच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे.



जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या लोकअदालतींमधून तब्बल १९ विवाहित जोडप्यांचे संसार पुन्हा जुळविण्यात यश आले आहे. घटस्फोटाच्या उंबरठ्यावर पोहोचलेली ही नाती समुपदेशन, संवाद आणि तडजोडीच्या माध्यमातून पुन्हा एकत्र आली असून त्यामुळे संबंधित कुटुंबांचे भविष्य वाचले आहे.

> **गेल्या वर्षभरात झालेल्या ४ लोकअदालतींमध्ये आम्हाला १९ जोडप्यांचे संसार पुन्हा जुळविण्यात यश आले आहे. त्याचप्रमाणे आता पुन्हा जिल्हा प्रमुख व सत्र न्यायाधिश राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन वर्षात १४ मार्च रोजी लोकअदालत होणार असून ज्या जोडप्यांना आपला संसार टिकविण्याची आशा आहे, त्यांनी या लोकअदालतीचा नक्कीच लाभ घ्यावा.**
> **- तेजस्विनी निराळे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड.**

अनेक वेळा छोटे गैरसमज, अहंकार, संवादाचा अभाव आणि बाह्य हस्तक्षेप यामुळे वाद अधिक तीव्र होतात. हे वाद वेळेत मिटवले गेले नाहीत, तर त्याचे रुपांतर न्यायालयीन लढाईत होते. अशा प्रकरणांमध्ये पती-पत्नी घटस्फोटासाठी न्यायालयात अर्ज दाखल करतात. मात्र, अंतिम निर्णयापूर्वी ही प्रकरणे तडजोडीसाठी लोकन्यायालयात ठेवण्यात येतात. लोकअदालतीत न्यायालयीन वातावरणापेक्षा वेगळ्या, सौहार्दपूर्ण वातावरणात समुपदेशन केले जाते.

दोन्ही पक्षांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले जाते. गैरसमज दूर करण्यासाठी संवाद साधला जातो, जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली जाते आणि एकमेकांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो. याच प्रक्रियेतून वर्षभरात १९ पती-पत्नींमधील दुरावा दूर करण्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला यश आले आहे.

### लोकअदालतीतील वर्षभराचा तपशील

२२ मार्च २०२५ रोजी झालेल्या लोकअदालतीत ४ संसार जुळले.१० मे २०२५ रोजी ५ संसार पुन्हा एकत्र आले.१३ सप्टेंबर २०२५ रोजी ५ संसार जुळविण्यात यश मिळाले.१३ डिसेंबर २०२५ रोजी ५ संसार पुन्हा सुरळीत झाले.अशा प्रकारे वर्षभरात एकूण १९ संसार पुन्हा उभे राहिले.



# लोकांचा शास्त्रज्ञ गेला

काही दिवसांपूर्वी जयंत नारळीकर, आणि आता माधव गाडगीळ गेले. या दोघांमध्ये अनेक साम्ये होती. दोघांनाही आपापल्या कुटुंबांमधून ज्ञानाचा व संशोधनाचा वारसा लाभलेला होता. दोघांनीही आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन केले, प्रसिध्दी मिळवली. पण तिथल्या असंख्य संधी सोडून ते भारतात परतले व इथे त्यांनी असे काम उभे केले की ज्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर नोंद घेतली गेली. नारळीकरांचे वडील व मामा हेही केंब्रिजचे पदवीधर होते. जयंतरावांनी फ्रेड हॉयेल या संशोधकांसमवेत मांडलेला सिद्धांत जगभर गाजला. नंतर त्यांनी पुण्यात आयुकाची स्थापना केली. माधव गाडगीळांचे वडील धनंजयराव गाडगीळ हे ख्यातनाम अर्थतज्ज्ञ व नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष होते. महाराष्ट्रातील सहकार चळवळ किंवा कोयना धरणासारखे प्रकल्प यांमध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. गाडगीळांची कन्या व माधवरावांच्या भगिनी सुलभा ब्रह्मे याही अर्थतज्ज्ञ तसेच कट्टर डाव्या विचाराच्या अभ्यासक होत्या. नव्या आर्थिक सुधारणांच्या विरोधात त्यांनी केलेली मांडणी ही देशभर चळवळींसाठी मार्गदर्शक ठरली. माधवराव हे शुध्द विज्ञानाच्या क्षेत्रात गेले. पण तिथून तेही पर्यावरणाच्या विषयाकडे आले व लोकवैज्ञानिक अशी ओळख त्यांना प्राप्त झाली. महाराष्ट्र व विशेषतः कोकणाला माधव गाडगीळ यांची ओळख व आठवण राहील ती पश्चिम घाट संरक्षणासाठी त्यांनी सादर केलेल्या अहवालामुळे. मनमोहनसिंग यांच्या सरकारने गाडगीळ पश्चिम घाट किंवा सह्याद्रीच्या संदर्भात ही समिती नेमली होती. पण तिचा अहवाल स्वीकारण्याची हिंमत मात्र ते किंवा नंतरचे सरकार दाखवू शकले नाही. पालघरपासून केरळपर्यंत पसरलेला सह्याद्री हा अत्यंत नाजूक असा पर्यावरणीय भाग असून त्याच्या सुमारे १ लाख ३० हजार चौरस किलोमीटर परिसरात कोणतेही खाण किंवा उद्योग तसेच रासायनिक शेती केली जाऊ नये असे समितीचे म्हणणे होते. या भागाचा विकास स्थानिक लोकांच्या सहयोगाने व परिसराला झेपेल इतक्याच रीतीने करायला हवा अशी तिची सूचना होती. मात्र आपली सरकारे, मंत्री व नेते कंत्राटदारी विकासाच्या इतके आहारी गेले आहेत की त्यांनी समितीचे म्हणणे हाणून पाडले.

### सह्याद्री वाचवण्याचे प्रयत्न

सह्याद्रीमध्ये मोठ्या प्रमाणात खोदकाम, डोंगरांची कापाकापी किंवा झाडे तोडून सिमेंटची जंगले उभारणे हे धोकादायक आहे असा गाडगीळ समितीचा इशारा होता. समितीने कुठल्या तरी वातानुकूलित कार्यालयात बसून हा अहवाल लिहिलेला नव्हता. त्यासाठी गाडगीळ यांनी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांचा तसेच कोकणातील खेड्यापाड्यांचा प्रवास केला होता. तेथील लोकांना भेटून त्यांचे याबाबतचे म्हणणे समजून घेतले होते. या समितीच्या अहवालाला महाराष्ट्रात नारायण राणे आणि केरळात कॅथलिक ख्रिश्चन लॉबीने तीव्र विरोध केला. त्यातून मग या अहवालावर विचार करण्यासाठी कस्तुरीरंगन समिती स्थापन झाली. तिने संरक्षित करायचा परिसर आकाराने कमी केला तरी गाडगीळ समितीच्या शिफारशीच पुढे नेल्या. पण तेवढेही या सरकारला मान्य झाले नाही. थोडक्यात हे दोन्ही अहवाल कुजवण्यात आले. विकास रोखला नाही तर स्थानिकांवर भयंकर स्थिती ओढवेल व सतत मोठे नुकसान होईल असा इशारा गाडगीळांनी दिला होता. त्याचे प्रत्यंतर इर्शाळवाडी ते वायनाड अशा अनेक दुर्घटनांमधून आपल्याला दिसले. आज सरकारने हा अहवाल मान्य केला नसला तरी पर्यावरणासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी त्यांनी एक महत्वाचा आधार तयार करून ठेवला आहे. शास्त्रीय संशोधनाची शिस्त पाळून तयार झालेला हा अहवाल भविष्यातील सरकारविरुद्धच्या किंवा न्यायालयांमधील लढाईत अमान्य करणे सोपे राहणार नाही. महत्वाची बाब ही की, गाडगीळ हे भाबडे पर्यावरणवादी किंवा मनेका गांधींसारखे निर्बुद्ध पण कर्मठ प्राणिप्रेमी नव्हते. म्हणूनच अलिकडे बिबट्यांचा उपद्रव वाढल्यावर त्यांच्या शिकारीला परवानगी द्यायला हवी अशी सूचना त्यांनी केली होती. यासाठी कोणत्या अटी घालता येतील हेही त्यांनी सांगितले होते. हरिणे, वानर, डुक्कर इत्यादींबाबतही हाच मार्ग वापरावा लागेल हेही त्यांनी सूचित केले होते. या प्राण्यांमुळे शेतकऱ्यांना जे नुकसान सोसावे लागते त्याची त्यांना जाणीव होती. संरक्षित जंगलांच्या बाहेर, लोकवस्त्यांमध्ये बिबट्या किंवा इतर प्राणी आले तर जगात कोठेही त्यांचे रक्षण करावे असे म्हटले जात नाही. त्यांना मारणे व त्यांच्या संख्येवर आळा ठेवणे हेच केले जाते हे त्यांनी नमूद केले होते.

### भाबडे पर्यावरणवादी नव्हेत

त्यावर आपल्याकडच्या पर्यावरणवाद्यांनी टीका केली होती. एरवी गडचिरोलीत अदानी वाटेल तशी जंगले कापून खाणी उभारतो आहे किंवा इकडे फडणवीस आणि मंडळी मुंबई ते पुणे रस्ता आणखी रुंद करण्यासाठी वाटेल तसे डोंगर कापत आहेत किंवा मुंबईमध्ये प्रचंड खोदकाम करून भुयारी रस्ते बांधले जात आहेत, तेथील राष्ट्रीय उद्यानाची वाट लावली जात आहे. पण याचे या पर्यावरणवाद्यांना काही पडलेले नसते. त्याऐवजी बिबट्यांना वाचवा हा संदेश त्यांना मोलाचा वाटतो. अर्थात गाडगीळ यांनी कधीही असल्या टीकेची पर्वा केली नाही. आपले मत हे भरपूर माहिती व आकडेवारीवर आधारलेले आहे याविषयी त्यांना खात्री होती. शिवाय, पर्यावरण हा त्यांचा पुस्तकी अभ्यासाचा नव्हे तर आयुष्यभराच्या ध्यासाचा विषय होता. त्यांचे वडील धनंजयराव आणि पक्षीतज्ज्ञ सलिम अली हे मित्र होते. सलिम अलींना माधव यांनी लहान वयात पत्र लिहिले होते व त्यांच्यापासून प्रेरणा घेऊनच ते जीवशास्त्राच्या अभ्यासाकडे वळले. भारतात तसेच अमेरिकेतील हॉर्वर्डमध्ये शिक्षण घेतले. तिथे गणितीय जीवशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. हॉर्वर्ड, स्टॅनफर्ड आदी विद्यापीठांमध्ये अभ्यागत प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. पण व्हिएतनाममध्ये अमेरिकी सैन्याने जे अत्याचार चालवले होते ते पाहून अमेरिकेमध्ये त्यांचा जीव विटला व ते भारतात परतले. परतल्यावर त्यांनी बंगळुरुच्या भारतीय विज्ञान संस्थेत प्रदीर्घ काळ काम केले. तिथेच त्यांनी सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस ची स्थापना केली. पुण्याच्या आसपासच्या देवराया किंवा गवताळ कुरणे राखण्यासाठी गवळी धनगरांच्या परंपरा अशासारख्या अनेक विषयांवर त्यांनी त्या त्या ठिकाणी जाऊन अभ्यास केला. जंगले राखायची असतील तर स्थानिक आदिवासी व रहिवासी यांच्यावर विश्वास ठेवून त्यांच्याच हवाली ती करायला हवीत असे त्यांचे म्हणणे होते. कोकणात मिळणारी फळे किंवा मासळी यांच्यावर उपउत्पादने करणे हाच इथला मुख्य व्यवसायाचा स्त्रोत असायला हवा, येथे उद्योग आणता कामा नयेत यावर ते ठाम होते. त्यासाठीही त्यांनी येथील स्थानिक लोकांच्या जगण्याचा अभ्यास केला होता. गाडगीळ यांनी वडिलांप्रमाणेच दिल्लीच्या सरकारांसोबत काम केले. इंदिरा व राजीव गांधींच्या काळात त्यांनी सल्लागार म्हणून केलेल्या कामांमुळे अनेक गोष्टी घडल्या. केरळातील सायलेंट व्हॅली किंवा बस्तरचे जंगलाचे संरक्षण त्यांच्या प्रयत्नांमुळेच झाले. केंद्रात पर्यावरण मंत्रालयाची स्थापना किंवा कर्नाटकात निलगिरी टेकड्यांच्या रक्षणाचा भारतातला सर्वात मोठा प्रकल्प त्यांच्याच मुळे आकाराला आला. प्रचंड बुद्धिमत्ता, ज्ञान, मोठे यश व कीर्ती मिळवलेली असूनही अखेरपर्यंत सामान्य माणसांचा विचार करणाऱ्या या लोकवैज्ञानिकाला कृषीवल परिवाराच्या वतीने श्रद्धांजली.

विचार

# रहमान यांचे परतणे भारताच्या पथ्यावर?

***बांगलादेशमध्ये लवकरच होणाऱ्या निवडणुकीआधी भारतविरोधी भावना भडकावून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न होत असताना माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे चिरंजीव तारिक रहमान बांगलादेशमध्ये परतले. त्यांचे झालेले उत्स्फूर्त स्वागत पाहता ते पंतप्रधानपदी निवडून येऊ शकतात. सध्याच्या अंतरिम सरकारचे प्रमुख युनूस मोहम्मदइतके ते पाकिस्तानधार्जिणे नसल्याने त्यांचे परत येणे भारताच्या पथ्यावर पडू शकते.***



**प्रा. जयसिंग यादव**

बांगलादेश विजय दिनाच्या दोन दिवसांनंतर १८ डिसेंबरच्या रात्री दोन प्रमुख माध्यम आउटलेट्स आणि अनेक सांस्कृतिक संस्थांवर जमावाचा हल्ला झाला. इन्कलाब मंचचे संयोजक आणि प्रवक्ते उस्मान हादी यांच्या मृत्यूनंतर संतप्त जमावाने प्रथम 'आलो' आणि 'द डेली स्टार' या दोन माध्यमांच्या कार्यालयावर तसेच छायानौत भवनवर हल्ला केला. तोडफोड केली आणि आग लावली. या संस्थांना 'भारताचे एजंट' आणि 'फॅसिझमचे मित्र' असे संबोधले गेले. भारताने बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्याला मदत केली होती; परंतु तेव्हापासून सीमावर्ती भागात पाणीवाटपात भारताची भूमिका किंवा अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप केल्याच्या आरोपांमुळे बांगलादेशमध्ये भारतविरोधी भावना वारंवार उफाळून येत असतात. अलीकडील हल्ले हे बांगलादेशी राजकारणात भारतविरोधी भावनांचा वेळोवेळी वापर सुरू असल्याचे अनेकांचे मत आहे. अंतरिम सरकारच्या १६ महिन्यांच्या कार्यकाळात कायदा आणि सुव्यवस्था ही एक प्रमुख समस्या राहिली आहे. आता या अस्थिर परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी निवडणुका हा एकमेव मार्ग आहे. अनेक राजकारण्यांनी अशी भीती व्यक्त केली आहे, की एक गट भारतविरोधी भावनांचा फायदा घेऊन आगामी निवडणुकांमध्ये व्यत्यय आणत हिंसाचार भडकवत आहे. एकीकडे ही स्थिती असताना बांगलादेशमधील प्रमुख राजकीय पक्ष बांगलादेश नॅशनॅलिस्ट पक्षा (बीएनपी)ला आता नवसंजीवनी मिळणार आहे. त्याचे कारण आतापर्यंत युनूस हे पाकिस्तानधार्जिण्या मूलतत्त्ववादी पक्षांच्या कलाने निर्णय घेत होते. अवामी लीग हा यापूर्वीचा सत्ताधारी पक्ष निवडणुकीच्या रिंगणात असणार नाही 'बीएनपी'चे अनेक नेते तुरुंगात आहेत. बरेच वयोवृद्ध झाले आहेत. हसीना यांच्याविरोधातील आंदोलनात 'बीएनपी'ची फारशी भूमिका नव्हती. त्यामुळे 'बीएनपी' निवडणुकीच्या शर्यतीत राहणार नाही, असा एक मतप्रवाह होता; परंतु आता तारिक रहमान यांचे १७ वर्षांनंतर बांगलादेशमध्ये आगमन झाले आहे. त्यांच्या स्वागताला लोटलेला लाखोंचा जनसमुदाय पाहिला, की बांगलादेशच्या राजकारणाची समीकरणे बदलतील, असे अनेकांना वाटायला लागले आहे. १७ वर्षांपासून त्यांचा चेहरा 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी' (बीएनपी) च्या पोस्टर्सवर दिसत होता. त्यांचा रेकॉर्ड केलेला आवाज सतत ऐकू येत असे. नुकत्याच निवर्तलेल्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे पुत्र आणि एके काळी देशाच्या राजकारणाचे 'डार्क प्रिन्स' म्हणून ओळखले जाणारे तारिक रहमान यांच्या हाती पक्षाची सूत्रे जातील, असा अंदाज आहे.

तारिक रहमान पत्नी डॉ. झुबैदा रहमान आणि मुलगी बॅरिस्टर झैमा यांच्यासह ढाक्याला पोहोचले. ढाक्याला पोहोचल्यानंतर त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट केले, की ६,३१४ दिवसांनंतर बांगलादेशमध्ये आलो. हिंसाचाराचा सामना करणाऱ्या बांगलादेश आणि 'बीएनपी'साठी हा एक महत्त्वाचा क्षण आहे. फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या महत्त्वाच्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी त्यांचे पुनरागमन झाले. या निवडणुका भारताच्या प्रादेशिक सुरक्षेसाठीदेखील महत्त्वाच्या आहेत. तारिक यांचे पुनरागमन भारतासाठी विशेष महत्त्वाचे आहे. विशेषतः भारतसमर्थक अवामी लीगला निवडणूक लढवण्यास मनाई करण्यात आली आहे आणि खालिदा झिया निवर्तल्या आहेत. हे सर्व अशा वेळी घडत आहे, जेव्हा बांगलादेश एका चौरस्त्यावर आहे. युनूस यांच्या नेतृत्वाखाली कट्टरपंथी इस्लामिक घटक उघडपणे सक्रिय आहेत आणि भारतविरोधी विष पसरवत आहेत. भारताची सर्वात मोठी चिंता 'जमात-ए-इस्लामी' आहे. ती पाकिस्तानच्या 'आयएसआय'ची आघाडी मानली जाते. शेख हसीना सरकारने बंदी घातलेल्या या पक्षाने गेल्या वर्षी हसीना यांना सत्तेतून परागंदा केल्यानंतर आपले राजकीय अस्तित्व पुन्हा स्थापित केले आहे. अलीकडील जनमत चाचण्यांवरून दिसून येते, की तारिक यांच्या 'बीएनपी'ला सर्वाधिक जागा मिळण्याची शक्यता आहे, तर त्यांचा माजी मित्र 'जमात-ए-इस्लामी' आता निवडणुकांची जोरदार तयारी करत आहे.

अलिकडेच ढाका विद्यापीठाच्या विद्यार्थी संघटनेच्या निवडणुकीत 'जमात-ए-इस्लामी'च्या विद्यार्थी संघटनेच्या आश्चर्यकारक विजयामुळे भारताच्या चिंता आणखी वाढल्या. अशा परिस्थितीत भारत 'बीएनपी'ला तुलनेने उदारमतवादी आणि लोकशाहीवादी पर्याय मानत आहे. भारत आणि बांगलादेशातील संबंध ऐतिहासिकदृष्ट्या ताणलेले असताना आणि शेख हसीना यांच्या उपस्थितीत भारताला तोच चांगला पर्याय वाटत आहे. तारिक यांच्या परतण्यामुळे त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण होईल आणि 'बीएनपी' पुढील सरकार स्थापन करण्यास सक्षम होईल. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय नागरिक पक्षाने (एनसीपी) आरोप केला आहे, की 'बीएनपी' अवामी लीग नेत्यांना आपल्यात सामील करत आहे. हसीना यांच्या कार्यकाळात बांगलादेशने भारताशी जवळचे संबंध राखले आणि चीनशी संतुलन राखले, तर पाकिस्तानपासून स्पष्ट अंतर राखले. तथापि, युनूस सरकारच्या काळात परिस्थिती पूर्णपणे बदलली. बांगलादेशने स्वतःला भारतापासून दूर केले आणि पाकिस्तानच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. तरीही भारताला वाटते, की 'बीएनपी' सत्तेत आल्यास बांगलादेशचे परराष्ट्र धोरण पुन्हा बदलेल.

अलिकडेच, भारत आणि 'बीएनपी' यांच्यातील संबंधांमध्ये पुनर्बांधणीची चिन्हे दिसू लागली आहेत. १ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खालिदा यांच्या गंभीर प्रकृतीबद्दल सार्वजनिकरित्या चिंता व्यक्त केली आणि भारताकडून मदत देऊ केली. त्याला 'बीएनपी'ने कृतज्ञतेने प्रतिसाद दिला. वर्षानुवर्षे ताणलेल्या संबंधांमध्ये हे एक दुर्मिळ आणि महत्त्वपूर्ण राजकीय पाऊल मानले गेले. भारतासाठी एक स्वागतार्ह दिलासा म्हणजे तारिक यांचे युनूस सरकारशी मतभेद आहेत. त्यांनी अंतरिम सरकारच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. युनूस यांच्याकडे दीर्घकालीन परराष्ट्र धोरण निश्चित करण्याचा अधिकार नाही, अशी टीका करून त्यांनी 'जमात-ए-इस्लामी'शी निवडणूक युतीची शक्यता नाकारली. या वर्षाच्या सुरुवातीला, तारिक रहमान यांनी 'बांगलादेश फर्स्ट' नावाची परराष्ट्र धोरणाची रूपरेषा सादर केली. ती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' या घोषणेपासून प्रेरित असल्याचे म्हटले जात होते. त्यांनी घोषित केले, 'ना दिल्ली ना पिंडी, बांगलादेश प्रथम'. याचा अर्थ बांगलादेश भारत आणि पाकिस्तान यापैकी कुणाच्याही जवळ जाणार नाही. तारिक बोगुडा-६ (सदर) मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. तारिक यांच्या शक्तीप्रदर्शनामुळे कट्टरपंथी घटक नाराज आहेत. निवडणुकीपूर्वी 'बीएनपी' आणि 'जमात-ए-इस्लामी'मध्ये संघर्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बांगलादेशसोबत वेगाने बिघडणारे संबंध भारतासाठी तीनस्तरीय आव्हान उभे करतात. यामुळे चार हजार किलोमीटर लांबीच्या सीमेवर असुरक्षितता आणि घुसखोरीचा धोका वाढेल. सीमेपलिकडे भारतविरोधी शक्तींचे तळ स्थापन होण्याचा धोकादेखील आहे. भारत आणि बांगलादेशमधील तणावाचा फायदा पाकिस्तान आणि चीन घेत आहेत. बांगलादेशमध्ये पाकिस्तानचा सहभाग वाढतो आहे. या वर्षी जूनमध्ये चीनमधील कुनमिंग येथे चीनचे उपपरराष्ट्रमंत्री सन वेइडोंग आणि बांगलादेश आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिवांमधील त्रिपक्षीय बैठकीने भारतासाठी चिंता निर्माण केली. त्यानंतर २०२४ च्या अखेरीस पाकिस्तानी नौदलाच्या जहाजाने बांगलादेशच्या बंदराला अभूतपूर्व भेट दिली. चीन मुहम्मद युनूस सरकारसोबत आपले संबंध सतत मजबूत करत आहे. कोणत्याही दृष्टिकोनातून पाहिले तरी द्विपक्षीय संबंधांची सध्याची स्थिती भारतासाठी अत्यंत प्रतिकूल आहे.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# वनराई बंधारे ठरताहेत नवसंजीवनी



**अंतरा पारंगे**

रायगड जिल्ह्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. मात्र हे पावसाचे पाणी वाहून जाते. मार्चपासूनच पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी लागणारे पाणी मुबलक प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे मोठ्या भीषण पाणीटंचाई निर्माण होते. मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहावर वनराई बंधारे उभारले आहेत. यामुळे पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवले जाणार आहे. त्याचा थेट परिणाम भुजल पातळी वाढ होत असून हे बंधारे जलस्रोततांना नवसंजीवनी ठरत आहेत.

जिल्हाभरात मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत वनराई बंधारे बांधणे मोहीम राबविली जात आहे. या मोहिमेअंतर्गत नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहावर वनराई बंधारे उभारले आहेत. यामुळे पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवले जाणार आहे. त्याचा थेट परिणाम भुजल पातळी वाढ, विहिरी, बोअरवेलच्या पाणी साठ्यात वाढ होणार आहे. या पाण्याचा वापर गुरांची तहान भागविण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आणि भाजीपाल्याचे उत्पादन घेण्यासाठी करत येणार आहे. एकंदरीत वनराई बंधारे शेतकरी आणि पशू-पक्ष्यांसाठी वरदान ठरणारे आहेत.

नदी-नाल्यांमध्ये पाणी अडवून जमिनीत मुरवण्यासाठी दगड, माती, वाळू आणि सिमेंटच्या रिकाम्या पोत्यांसारख्या स्थानिक साहित्याचा वापर करून तयार केलेला एक तात्पुरता, कमी खर्चाचा बंधारा म्हणजे वनराई बंधारा. ज्यामुळे विहिरींची पातळी वाढते, रब्बी पिकांना पाणी मिळते आणि पाणीटंचाईवर मात करता येते. श्रमदान आणि लोकसहभागातून हे बंधारे बांधले जातात, जे शेती, पशुधन आणि वन्यप्राण्यांसाठी पाण्याचा स्रोत बनतात.

पशू, पक्षी, झाडे, मानव यासाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असतो. परंतु, पावसाळा संपताच विहीर, तलाव, कूपनलिका, ओढे असे पाण्याचे स्त्रोत्र तळ गाठतात. त्यामुळे गावागावात भीषण पाणी टंचाई निर्माण होते. हंडाभर पाण्यासाठी महिलांना मैलोनमैल पायपीट करावी लागते. मात्र, नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहावर वनराई बंधारे उभारल्यास पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरले जाईल आणि भुजल पातळी वाढण्यास मदत होईल.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये ग्रामपंचायती, लोकप्रतिनिधी, अधिकारी, ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडत आहे. गावोगावी श्रमदानातून हे वनराई बंधारे बांधले जात आहेत. यामुळे जलसमृद्ध होण्यास मदत होणार असून त्यांची पाण्याची समस्या दूर होणार आहे. या बांधाऱ्यांमुळे बिगर-पावसाळी हंगामात शेतीसाठी संरक्षित सिंचनाची सोय होते, पाणीटंचाईवर मात करून परिसरातील जैवविविधतेला आधार मिळतो. महत्वाचे म्हणजे श्रमदानातून या बांधऱ्यांची उभारणी केली जाते, ज्यामुळे सामाजिक बांधिलकी वाढत आहे तसेच जलसंवर्धनाबाबत जनजागृतीदेखील होत आहे.

हे बंधारे वनराई आणि जमिनीचे संरक्षण करण्यासाठी तसेच पाण्याचा साठा वाढवण्यासाठी उपयोगी ठरतो. त्याचबरोबर या बंधाऱ्यात साठलेल्या पाण्याचा शेतीला मोठा फायदा होणार आहे. बऱ्याच ठिकाणी उन्हाळ्यात ग्रामीण भागात शेतकरी वर्गाकडून भाजीपाला लागवड केली जाते. मात्र उन्हाळ्यात पाणी टंचाई असल्यामुळे त्यांना भाजी लागवडीसाठी अडचणी येत असतात. परंतु, बंधाऱ्यांद्वारे पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवले जाणार असल्याने त्याचा थेट परिणाम भुजल पातळी वाढीवर होऊन विहीरी, बोअरवेलच्या पाणी साठ्यात वाढ होणार आहे. या पाण्याचा शेतीसाठी वापर होऊन शेतीच्या उत्पादन क्षमतेत वाढ होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रोजगाराचा प्रश्नही मार्गी लागणार आहे.

उन्हाळा चालू होताच आपल्याला पाण्याचे महत्व समजते. पाणी हे आपले जीवन आहे. पाणी आडवा, पाणी जिरवा तसेच, पाणी हेच जीवन असे आपण म्हणतो. परंतु, हे आचरणात कोणीही आणत नाही. प्रत्येकांनी आपले नैतिक कर्तव्य म्हणून पाणी अडविल्यास पाणी टंचाई निर्माण होणार नाही. श्रमदानातून साकारलेले हे वनराई बंधारे केवळ तात्पुरते पाण्याचे स्रोत नसून, ते गावाला दुष्काळमुक्त करून कृषीला समृद्ध करणारे आणि भूजल पातळी वाढवणारे संजीवनी ठरणार आहेत.

लोकसंसद

## जेनेरिक औषधेही तितकीच प्रभावी!



'द लिव्हर डॉक' म्हणून ओळखले जाणारे केरळमधील सुप्रसिद्ध यकृतरोग तज्ञ (हिपॅटोलॉजिस्ट) डॉ. सिरिएक ॲबी फिलिप्स यांच्या एका संशोधन अहवालानुसार ब्रँडेड औषधे आणि जेनेरिक औषधांच्या गुणवत्तेत कोणताही फरक नसल्याचे आढळून आले आहे. या अभ्यासात सात स्त्रोतांकडून हृदयविकार, मधुमेह, यकृताचे विकार, वेदनाशामक आणि प्रतिजैविके यांसारख्या सामान्यतः लिहून दिल्या जाणाऱ्या २२ औषधांची 'औषधाचा घटक, विद्राव्यता, एकरूपता, अशुद्धी आणि भौतिक स्वरूप' या पाच घटकांची भारतीय फार्माकोपिया मानकांनुसार चाचणी करण्यात आली. त्यामध्ये असे दिसून आले की प्रत्येक जेनेरिक औषधाचा सरासरी घटक ब्रँडेड औषधांसारखाच होता. ब्रँडेड औषधांची सरासरी १०१.३५ टक्के होती तर जेनेरिक औषधांची सरासरी ९९.१० टक्के इतकी होती. तसेच औषधांच्या गुणवत्तेत कोणताही फरक नव्हता. मात्र केवळ औषधे ब्रँडेड असल्याने त्यांच्या किंमती १४ पटीने जास्त होत्या. वस्तुतः आपल्याकडे आरोग्यसेवेवरील खर्चापैकी जवळपास दोन तृतीयांश खर्च केवळ औषधांवर होतो. अशावेळी औषधे महाग असल्यामुळे रुग्ण औषधांचे डोस घेण्याचे टाळतात व उपचार पूर्णपणे थांबवतात. त्यामुळे त्यांची परिस्थिती अधिक बिकट होते. अशावेळी जेनेरिक औषधेही तितकीच प्रभावी असल्यामुळे सर्वसामान्य रुग्णांच्या औषधांवरील खर्चात मोठी कपात होईल.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

विशेष

# गोड गळ्याचे गायक येसुदास



आज १० जानेवारी हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायक आणि संगीतकार येसुदास यांची ८६ वाढदिवस. हिंदी चित्रपट सृष्टीत ज्या गायकांनी आपल्या मधुर आवाजाने ठसा उमटवला त्यात येसुदास हे एक महत्वाचे नाव. १० जानेवारी १९४० रोजी एका मल्याळम ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या येसुदास यांचे वडील मल्याळम भाषेतील शास्त्रीय संगीतकार होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी संगीतकलेचे प्राथमिक धडे गिरवले. वयाच्या सातव्या वर्षी कोची येथील स्थानिक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदक जिंकले. कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तामिळ या दक्षिण भारतातील सर्व भाषेत त्यांनी गाणी गायली तिथे त्यांनी गायलेली सर्वच गाणी हिट झाली. त्यांच्या आवाजाची परदेशातील रसिकांना देखील भुरळ पडली. १९६५ साली रशियन सरकारने त्यांना गाण्यासाठी खास आमंत्रण दिले होते. गोड, मखमली आवाज ही येसुदास यांची ओळख बनली. त्यांच्या गोड आणि मखमली आवाजाची कीर्ती हिंदी चित्रपट सृष्टी पर्यंत पोहचली नसती तरच नवल. संगीतकार सलील चौधरी यांनी त्यांना दिग्दर्शक बासू चॅटर्जी यांच्या छोटीशी बात या चित्रपटात साठी एक गाणे गायला लावले. त्यांच्या आवाजाने बासू चॅटर्जी हे ही प्रभावित झाले त्यांनी त्यांना त्यांच्यव चित्रपटात गाण्याची ऑफर दिली. १९७० सालापासून त्यांनी हिंदी गाणी गायला सुरवात केली. जानेमन जानेमन तेरे दो नयन.... या गाण्यानंतर शांत सज्जन दिसणारा अमोल पालेकर यांच्यासाठी येसुदास यांचाच आवाज सूट होतो असा असे गणित बॉलिवूडने बांधले. येसुदास यांच्या मधुर आवाजामुळे अनेक संगीतकार त्यांना त्यांच्यासाठी गाण्याची गळ घालू लागले मात्र येसुदास हे गाण्याची निवड मात्र विचारपूर्वक करत. येसुदास यांनी फक्त अमोल पालेकर यांच्यासाठीच नाही तर अमिताभ बच्चन आणि जितेंद्र यांच्यासाठीही गाणी गायली. त्यांनी रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, खय्याम, राजकमल, सलील चौधरी या संगीतकारांसमवेत अनेक सदाबहार हिंदी चित्रपटातील गाणी गायली. त्यांनी जवळपास ४५००० गाणी गायली आहेत. सध्याच्या पद्धतीची गाणी त्यांना आवडत नाहीत म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षांपासून गाणे गायचे थांबवले आहे. येसुदास यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. भारत सरकारने त्यांना २००२ सालीं पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार दिला आहे तर केरळ सरकारने त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम स्वाती पुरस्कारम या पुरस्काराने गौरविले आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत. येसुदास यांनी काही दाक्षिणात्य भाषेतील चित्रपटांची निर्मितीही केली आहे. येसुदास यांनी गायलेली गोरी तेरा गाव बडा प्यारा, सुरमई अखियों मे, दिल के तुकडे तुकडे करके, जानेमन जानेमन तेरे दो नयन, चांद जैसे मुखडे पे ही गाणी आजही लोकप्रिय आहेत.

येसुदास यांचे चाहते केवळ भारतातच आहेत असे नव्हे जगभर त्यांचे चाहते आहेत. गोड आणि मखमली आवाजाचे गायक येसुदास यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार, पुणे**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० जानेवारी

१)श्री.दामोदर लक्ष्मण वाणी गोंधळपाडा, अलिबाग, १०-१-१९५५

२) श्री.सदानंद मोरेश्वर राऊत मु.मापगाव, अलिबाग, १०-१-१९५७

३)श्रीम.मालती कमलप्रसाद जयस्वाल चेंढरे, अलिबाग, १०-१-१९५५

# कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचाफोटोकृषीवलमध्येछापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## वंदना सानप यांचे निधन

**खांब** : रोहा तालुक्यातील संभे गावच्या रहिवासी वंदना विठ्ठल सानप यांचे अल्पशा आजाराने मंगळवार दि.३० डिसेंबर २०२५ रोजी वयाच्या सुमारे ६० व्या वर्षी निधन झाले. वंदना सानप या अत्यंत प्रेमळ व शांत स्वभावाच्या होत्या. त्यांच्या निधनाने सानप परिवारासह संभे गावावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांच्यासह त्यांचे आप्तस्वकीय मित्रपरिवार सगेसोयरे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे अंतिम धार्मिक विधी रविवार दि.११ जानेवारी रोजी राहत्या निवासस्थानी होणार आहेत.



# प्रवासीसेवेवर होणार परिणाम

## • निवडणूक कामासाठी ११०० हून अधिक बसेस घेतल्या जाणार

**| मुंबई | प्रतिनिधी |**

१५ जानेवारीला होणाऱ्या महापालिका निवडणुकीची राजकीय पक्षांबरोबरच निवडणूक आयोगाकडूनदेखील जोरदार तयारी केली जात आहे. या निवडणुकीच्या कामासाठी मनुष्यबळाबरोबरच वाहनांचीदेखील आवश्यकता आहे. यापार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने सार्वजनिक वाहने ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यात बेस्टच्या बसेस, रिक्षा आणि टॅक्सी यांचा समावेश आहे. शहर आणि उपनगरांत धावणाऱ्या बेस्टच्या तब्बल ११०० हून अधिक बसेस निवडणूक कामासाठी घेतल्या जाणार आहेत. त्यामुळे निवडणूक कालावधीदरम्यान म्हणजेच दि.१३ ते १५ जानेवारीदरम्यान मुंबईतील प्रवासीसेवेवर याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



१५ जानेवारी रोजी होणाऱ्या महापालिका निवडणुकीची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी निवडणूक विभागाला मनुष्यबळाबरोबरच वाहनांचीदेखील आवश्यकता असणार आहे. मतदानासाठी थोडेच दिवस बाकी आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या कार्यवाहीला गती मिळाली आहे. आयोगाने मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक वाहने ताब्यात घेण्यास सुरुवात केली आहे. शहर आणि उपनगरांत ठिकठिकाणी मतदान केंद्रे कार्यान्वित केली जाणार आहेत. मतदानाच्या दिवशी ईव्हीएम तसेच मतदान प्रक्रियेशी संबंधित इतर साहित्य मतदान केंद्रापर्यंत पोहोचवण्याव्यतिरिक्त, विभाग इतर कामांसाठी सार्वजनिक वाहनांची मदत घेतली जाणार आहे. निवडणूक अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार त्या-त्या प्रभागांत प्रादेशिक परिवहन विभागाकडून सार्वजनिक वाहने उपलब्ध करण्यात येत आहेत. त्यानुसार १३ जानेवारीच्या रात्रीपासून १५ जानेवारीच्या रात्रीपर्यंत ११०० हून अधिक बेस्ट बसेस निवडणूक कामाच्या सेवेत धावणार आहेत. आरटीओमार्फत शुक्रवारपासून रिक्षा, टॅक्सी यांसारखी वाहने निवडणूक कामासाठी देण्यात येणार आहेत. मात्र शहराच्या अंतर्गत रस्त्यांवर छोट्या गाड्यांची आवश्यकता असते. तेथे रिक्षा, टॅक्सीसारखी वाहने उपलब्ध करून देतो. निवडणूक आयोगाच्या गरजेनुसार आम्हाला ही प्रक्रिया पार पाडणे बंधनकारक असते, असे आरटीओमधील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

### पर्यायी व्यवस्थेची मागणी

*सामान्य नागरिकांच्या गरजांचा विचार करून निवडणूक आयोग आणि संबंधित प्रशासनाने वाहने ताब्यात घेण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, पर्यायी व्यवस्था किंवा टप्प्याटप्प्याने वाहनांचा वापर करावा. लोकशाही बळकट करताना मुंबईच्या जीवनवाहिनीवर परिणाम होऊ देऊ नये, अशी मागणी मुंबईकरांकडून केली जात आहे.*

### मुंबईकरांची होणार गैरसोय

*नोकरदारांना घरापासून रेल्वे स्थानकापर्यंत जाण्यासाठी रिक्षा, टॅक्सींची मोठी मदत होते. त्यामुळे दोन हजारांहून अधिक रिक्षा, टॅक्सी निवडणूक ड्यूटीवर गेल्यास मुंबईकरांची प्रचंड गैरसोय होण्याची चिन्हे आहेत. निवडणूक संपेपर्यंत पुरेशा गाड्यांअभावी कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांचे हाल होणार असल्याने नागरिक तीव्र नाराजी व्यक्त करीत आहेत.*

# अग्रवाल विद्यामंदिर येथे वेंडीग मशीनचे वाटप

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठण्यातील प्रतिबिंब फोटो स्टुडिओचे मालक आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे रायगड जिल्हा अध्यक्ष विवेक सुभेकर यांच्या दिवंगत पत्नी श्वेता विवेक सुभेकर यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त कोएसोच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील अग्रवाल विद्यामंदिर येथे सॅनिटरी नॅपकिन वेंडीग मशीन देण्यात आली. हा कार्यक्रम शनिवारी दि.३ पार पडला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून विवेक सुभेकर यांच्या सहकार्याने आणि नागोठणे लायन्स क्लबच्या माध्यमातून हा कार्यक्रम घेण्यात आला. याच कार्यक्रमात अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्त्या ॲड. निहा राऊत यांनी उपस्थित विद्यार्थिनी, शिक्षिका यांना महिला सक्षमीकरण या विषयावर तर सपोनि गीतांजली जगताप यांनी वाहतुकीच्या नियमांवर मार्गदर्शन केले.

अग्रवाल विद्यामंदिरच्या सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या ॲड. निहा राऊत, महामार्ग वाहतूक शाखेच्या सपोनि गीतांजली जगताप, अग्रवाल विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डी. एम. पवार, अग्रवाल विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख प्रा. सविता गोळे, प्रा. मेघना म्हात्रे, प्रा. सृष्टी खांडेकर, नागोठणे लायन्स क्लबचे अध्यक्ष सखाराम ताडकर, उपाध्यक्ष विशाल शिंदे, नागोठणे लायन्स क्लबचे सेक्रेटरी डॉ. अनिल गीते, चार्टर्ड प्रेसिडेंट प्रकाश जैन, एम. जे. एफ लायन विवेक सुभेकर, एम. जे. एफ. लायन सुधाकर जवके, लायन्स सदस्य दौलत मोदी, संतोष शहासने, दीपक गायकवाड, विजय शहासने, सुजाता जवके, विजया म्हात्रे, डॉ. सलोनी सुभेकर, आदींसह शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थीनी यावेळी बहुसंख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनील देवरेंनी केले.

# श्रमदानातून साकारला वनराई बंधारा



**| तळा | प्रतिनिधी |**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना युनिटचे हिवाळी निवासी श्रमदान शिबीर तळा तालुक्यातील वाशी हवेली या गावात सुरु आहे. शाश्वत विकासासाठी युवक या मध्यवर्ती संकल्पनेला अनुसरून विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यातीलच एक महत्त्वाचा भाग म्हणजे पाणी, नदी ओढ्याद्वारे वाहणारे पाणी पुढे खाडीला जाऊन मिळते. यावर वनराई बंधारे बांधले तर ते पाणी काहींअंशी जमिनीत मुरते. यामुळे जमिनीची पाणी पातळी वाढते तर ऐन उन्हाळ्यात पशु-पक्षी यांनी तहान या वनराई बंधाऱ्याच्या माध्यमातून भागवली जाते. हे लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व वाशी हवेली ग्रामस्थांनी डोलारा ओढ्यावर वनराई बंधारा साकारला.

# भटक्या कुत्र्याचा सहा जणांवर हल्ला

**| रत्नागिरी | प्रतिनिधी|**

गेल्या दोन दिवसांपासून दापोली तालुक्यातील पंचनदी-कोळथरे परिसरात एका पिसाळलेल्या कुत्र्याने धुमाकूळ घातला आहे. त्याने आतापर्यंत ६ नागरिकांवर हल्ला करून त्यांना जखमी केले आहे. या सर्व जखमींना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर आवश्यक उपचार सुरू करण्यात आले असून वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्रतिबंधात्मक लसीकरण व उपचार करण्यात येत आहेत. हा कुत्रा अद्याप मोकाट अवस्थेत असून तो पुन्हा नागरिकांवर हल्ला करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी विशेष खबरदारी बाळगावी, एकटे बाहेर जाणे टाळावे तसेच लहान मुले व वृद्धांची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन पिसाळलेल्या कुत्र्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.



# केतन खुटलेच्या शिल्पप्रदर्शनाचे उद्घाटन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

मुंबईतील कुलाबा येथील किस्मत आर्ट गॅलरीमध्ये प्रख्यात युवा शिल्पकार केतन खुटले यांच्या शिल्पकलेच्या प्रदर्शनाचे उद्घाटन अत्यंत उत्साहात पार पडले. या प्रदर्शनाचे उद्घाटन कांतीलाल कडू यांच्या हस्ते करण्यात आले.

पनवेल तालुक्यातील चिंचवण गाव येथील केतन खुटले यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून शिल्पकलेचे धडे घेतले. शिक्षणानंतर त्यांनी दगडात सौंदर्य शोधण्याची आगळीवेगळी वाट निवडली. विशेष म्हणजे, लहान मुलांचे निरागस भाव, त्यांचे हावभाव, बसण्याची खास शैली, खोडकर नजरा आणि नजाकत केतनने अत्यंत बारकाईने टिपून दगडात साकारली आहे. त्यामुळे त्यांची शिल्पे पाहताना ती जिवंत असल्याचा भास होतो.



यावेळी कांतीलाल कडू म्हणाले की, दगडांना बोलते करण्याची किमया साधणारा हा कलाकार आपल्या मखमली बोटांतून संवेदनशीलता ओततो. लहान मुलांच्या मनातील भावविश्व इतक्या ताकदीने मांडणारी शिल्पकला क्वचितच पाहायला मिळते. केतनची कलादृष्टी मनावर गारुड घालणारी असून त्याच्या सृजनशीलतेत प्रामाणिकपणा आणि मेहनतीचा सुगंध जाणवतो.

पुढे ते म्हणाले की, आगरी समाजातील हा युवा कलाकार शिल्पकलेच्या प्रवासात निश्चितच मैलाचा दगड पार करेल, असा ठाम विश्वास आहे. केतन खुटले यांच्या कलेचा मला सार्थ अभिमान असून त्यांचे हे प्रदर्शन कला रसिकांसाठी एक पर्वणी ठरत आहे.

# जलसंधारणातून ग्रामविकासाचा नवा अध्याय

**| रसायनी | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत जिल्हाभरात एकाच दिवशी वनराई बंधारे बांधणे मोहिमेचे आयोजन करण्यात आले. पाणी अडवा पाणी जिरवा या जलसंधारण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करत वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायतीच्या मार्फत श्रमदानाच्या माध्यमातून नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहावर वनराई बंधारे उभारले आहेत.



यामुळे पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवले जाणार आहे. त्याचा थेट परिणाम भुजल पातळी वाढ, विहीरी, बोअरवेलच्या पाणी साठ्यात वाढ तसेच शेतीच्या उत्पादन क्षमतेत वाढ होणार आहे. श्रमदान व लोकसहभाग आणि शासकीय योजनेचा समन्वय साधून ग्रामपंचायत सरपंच उमाताई मुंढे, उपसरपंच दिपक कांबळे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामपंचायत कर्मचारी यांनी हा एक दिवसाचा उपक्रम पानशील, तळेगाव विभागामध्ये पूर्ण केला.

## तळा येथे रक्तदान शिबीर

**तळा** : जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे दरवर्षी रक्तदान महायज्ञाचे आयोजन केले जाते. प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी दि.४ जानेवारी ते १८ जानेवारीपर्यंत रक्तदान जीवनदान महाकुंभ आयोजन करण्यात आले होते. शहरातील ब्राम्हण समाज हॉल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकूण ७७ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले. याप्रसंगी तालुक्यातील नरेंद्रचार्य महाराज संप्रदायाचे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**नवी मुंबई** : लग्नाचे आमिष दाखवून एका ४१ वर्षीय महिलेची फसवणूक व शारीरिक शोषण करण्यात आले. याप्रकरणी कामोठे पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगेश विश्वनाथ नेने (५३), रा. नेनेपाडा, पेण, जि. रायगड असे आरोपीचे नाव आहे. त्याने लग्नाचे आमिष दाखवून पीडित महिलेचा विश्वास संपादन करत दीर्घकाळ शारीरिक अत्याचार केला, असा आरोप फिर्यादी महिलेने केला आहे.

पीडितेच्या फिर्यादीनुसार, आरोपीने पीडित महिलेशी संपर्क वाढवत एप्रिल २०२३ ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत तिच्या राहत्या घरी तसेच नवी मुंबईतील विविध ठिकाणी तिच्याशी शरीरसंबंध प्रस्थापित केले. आरोपीने महिलेला वारंवार लग्न करण्याचे आश्वासन दिले. मात्र, हे आश्वासन खोटे असल्याचे नंतर उघड झाल्याने फिर्यादीची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. लग्नाचा खोटा बनाव करून आरोपीने शारीरिक अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी कामोठे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### महाड जनकल्याण रक्तपेढीचा सहभाग

### विवाहापूर्वी तपासणी करण्याचे आवाहन

# थॅलेसेमिया जनजागृतीसाठी शासकीय स्तरावर अभियान

**| महाड | प्रतिनिधी |**

थॅलेसेमियामुक्त भारत करण्यासाठी शासकीय स्तरावर अभियान राबवले जात आहे. कै. काकासाहेब चितळे संचालित महाड जनकल्याण रक्तपेढीने देखील या अभियानामध्ये सामील होऊन रायगड जिल्ह्यामध्ये या आजाराविषयी जनजागृती अभियान राबविण्यास सुरुवात केले आहे. याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी पत्रकार परिषद घेण्यात आली. यामध्ये रायगड जिल्हा थॅलेसेमिया जनजागरण समितीच्या प्रमुख डॉ. वैशाली मिंडे यांनी या आजाराची गंभीरता, काळजी व प्रतिबंध याविषयी माहिती दिली.




थॅलेसेमिया या आजाराच्या जनजागृती व मुक्तभारत करण्याच्या चळवळीमध्ये जनकल्याण रक्तपेढीने सहभाग घेतला आहे. याप्रकरणी शुक्रवारी महाड येथील जनकल्याण रक्तपेढीमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रायगड जिल्हा थॅलेसेमिया जनजागरण समितीच्या प्रमुख डॉ. वैशाली मिंडे, जनजागरण समितीचे जिल्हा समन्वयक अविनाश घोलप, जनकल्याण रक्तपेढीचे कार्याध्यक्ष शिवराज भागवत, अध्यक्ष धनंजय परांजपे, समिती सदस्य प्रदीप आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. मिंडे म्हणाल्या की, हा रक्ताचा आजार असून या आजारामध्ये मूल जन्माला आल्यानंतर त्याच्या रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने, अशी बालके कमजोर व त्यांची वाढ मंदावलेली दिसते. या आजारामध्ये मायनर व मेजर असे दोन प्रकार असतात. मायनर हे या आजाराचे वाहक असून, हा आजार अनुवंशिक असतो. या आजारग्रस्त बालकांना दर २१ दिवसांनी त्यांना रक्त चढवावे लागते. समाजामध्ये या आजाराचे प्रमाण सध्या वाढत असून ही एक मोठी गंभीर समस्या भारतीय समाजासमोर उभी आहे. या आजारग्रस्त रुग्णांना महाडमधील जनकल्याण रक्तपेढीच्या वतीने मोफत रक्त पुरवठा केला जात आहे. शासकीय स्तरावर देखील या आजाराबाबत जनजागृती होत असून शासकीय रुग्णालयांमध्ये यासाठी मोफत रक्त तपासणी व या रुग्णांना शासकीय सवलती मिळत आहेत. या रुग्णांची अपंग म्हणून नोंद होत असून तशा सवलती देखील मिळत आहेत. या आजाराची बालके जन्माला येऊ नयेत, यासाठी समाजामधील प्रत्येक जाती धर्मामध्ये होणाऱ्या विवाहपूर्वी रक्ताची तपासणी करूनच या आजारावरती नियंत्रण आणता येईल, असे डॉ. मिंडे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जनकल्याण रक्तपेढीचे कार्याध्यक्ष शिवराज भागवत यांनी सांगितले की, या आजाराच्या अभियानामध्ये एकूण तीन टप्प्यांमध्ये काम केले जात आहे. यामध्ये जवळपास दहा हजार बालकांचा समावेश असून या बालकांची काळजी घेणे हा पहिला टप्पा आहे. दुसऱ्या टप्पा हा जनजागृतीचा असून लोकांमध्ये जनजागृती करून या आजारापासून भारत मुक्त करण्याचे अभियान राबवले जात आहे. तर तिसरा टप्पा म्हणजे याला प्रतिबंध करण्याचे प्रकार की ज्यामध्ये विवाहपूर्वी रक्त तपासणी करणे गरजेचे आहे.

# निवडक



## आदिवासींना बॅंकेटस्चे वाटप

**श्रीवर्धन** : श्रीवर्धन येथील दानशूर उद्योजक व संगम स्वीट मार्टचे मालक दुधाराम राठोड यांनी आदिवासीना ब्लँकेट्सचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यांनी भोस्ते, जसवली, गालसुरे इत्यादी आदिवासी वाड्यांवर जाऊन तेथील आदिवासींना सुमारे दोनशे ब्लँकेट्सचे वाटप केले.




## एनएसएस स्वयंसेवकांकडून चालक-वाहकांचे स्वागत

**तळा** : तळा विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या हिवाळी निवासी श्रमदान शिबीरामध्ये रस्ते सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रस्ते सुरक्षा सप्ताहानिमित्त एन.एस.एस. स्वयंसेवकांकडून राज्य परिवहन महामंडळाच्या चालक व वाहकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत आले. रस्ते सुरक्षेसाठी युवक या ग्रुपच्या माध्यमातून हा अभिनव उपक्रम हाती घेतला असल्याचे कार्यक्रम अधिकारी प्रा. भरत चाळके यांनी सांगितले.

## अनिल भोईर यांना पुरस्कार प्रदान



**हमरापूर** : पेण तालुक्यातील दूरशेत येथील सामाजिक कार्यकर्ते अनिल भोईर यांना महाराष्ट्र जीवन गौरव परिषदेचा सन २०२५ चा गर्जा महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रातील कामगिरी पाहून अनिल भोईर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. मुंबईतील बांद्रा, कलानगर येथे नीलकंठ श्रीखंडे कामगार नेते अभिजीत राणे, ज्येष्ठ वृत्तलेखक संतोष भोईर, कवी व लेखक मोहन जाधव यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमास कक्कया समाज महासंघ मुंबई प्रांताध्यक्ष राम कोकणे, कक्कया समाज गणेशोत्सव मुंबई अध्यक्ष हेमंत व्हटकर, जेष्ठ समाजसेवक ईश्वर पोळ, सामाजिक कार्यकर्ता सुरज भोईर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल अनिल भोईर यांचे दूरशेत पंचक्रोशीत अभिनंदन होत आहे.

## महावितरणचा वीजचोरांना दणका

**३४ वीज चोरांविरोधात गुन्हा दाखल**

**कल्याण** : महावितरणकडून वारंवार आवाहन करूनही चोरुन वीज वापरणाऱ्या वीज ग्राहकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या वीज ग्राहकांनी मागील तीन महिन्यांपासून ५ लाख ३२ हजार रुपयांची वीजचोरी केली असल्याचे आढळून आले. महावितरणकडून वीजचोरी रोखण्यासाठी वांरवार प्रयत्न केले जातात. यासाठी अनेकदा वीज ग्राहकांच्या मीटरची तपासणी केली जाते. महावितरणकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, टिटवाळा उपविभागात विज ग्राहक तपासणी मोहिमेअंतर्गत विजचोरांविरुद्ध महावितरणकडून ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत मोहीम राबविण्यात आली. गोवेली ग्रामीण शाखा अंतर्गत ग्राहक तपासणी मोहिमेत येथील अनेक ग्राहक चोरून वीज वापर असल्याचे आढळून आले. या ग्राहकांवर मुरबाड पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई महावितरण कल्याण परिमंडळाचे मुख्य अभियंता, चंद्रमणी मिश्रा, कल्याण-२ मंडळ कार्यालय अधीक्षक अभियंता, विजय फुंदे, कार्यकारी अभियंता विनय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. विजचोरीला आळा घालण्यासाठी व विजहानी कमी करण्यासाठी टिटवाळा उपविभाग अंतर्गत गोवेली शाखा येथे ही मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत गोवेली शाखा अंतर्गत वरप, म्हारळ, कांबा या परिसरातील ३४ विजग्राहकांवर विजचोरी बिल न भरल्याने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## लीलाबाई अंबाडे यांचे निधन

**नागोठणे** : नागोठण्यातील खडक आळी येथील रहिवासी लीलाबाई मधुकर अंबाडे (७५) यांचे गुरुवारी (दि.८) अकस्मात निधन झाले. त्या खडक आळीतील सर्व धार्मिक, सामाजिक कार्यक्रमात हिरीरीने सहभागी होणाऱ्या आणि येथील महिला मंडळाच्या प्रमुख आधारस्तंभ होत्या. ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते विनोद मधुकर अंबाडे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात विवाहित मुलगा विनोद, मुलगी मनीषा, सुना, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. लीलाबाई अंबाडे यांच्या पार्थिवावर नागोठण्यातील अंबा घाटावरील वैंकुठ स्मशानभूमीत गुरुवारी रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अंबाडे यांचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार यांच्यासह नागोठणे व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचे दशक्रिया विधी शनिवार दि.१७ जानेवारी रोजी उद्धार (ता.सुधागड) येथे तर उत्तरकार्य मंगळवार दि.२० जानेवारी रोजी खडक आळीतील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याचे त्यांचे पुत्र विनोद अंबाडे यांनी सांगितले.



# पोलीस रेझिंग डेच्या अनुषंगाने मार्गदर्शन

पनवेल : नवीन पनवेल वाहतूक शाखेतर्फे पोलीस रेझिंग डेच्या अनुषंगाने इंडिया बुल्स सोसायटी मधील रहिवाशांना मार्गदर्शन करण्यात आले.येथील इंडिया बुल्स सोसायटी मध्ये नागरिकांना पोलीस रेझिंग डे व रस्ता सुरक्षा अभियान २०२६ च्या अनुषंगाने वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत प्रबोधन करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ, पो.उपनिरीक्षक शशिकांत पवार, पोलीस हवालदार संजय गावडे, जितेंद्र कदम, ज्ञानेश्वर वाघ यांनी वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत तसेच रस्ता सुरक्षा व वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी इंडिया बुल्स सोसायटीतील पदाधिकारी तसेच २०० पुरुष व महिला उपस्थित होत्या.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे चांधई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतींच्या पैकी क्षेत्राचे मालक भगवान शंकर धस यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४/२ | ००-७०-६० हे.आर.पॉ. या एकूण क्षेत्रापैकी भगवान शंकर धस यांचे मालकीचे ००-५४-६० हे.आर.पॉ. इतके क्षेत्राची मिळकत | ७-२० |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १० जानेवारी २०२६

ॲड. शरद आर.सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड-४१०२०१
मो.नं.९५२७२८२५२५

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे मेचकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १०/३/ब | ०.२१.०० पो.ख. ०.०१.०० | ०.१८ | श्री.आशिषकुमार अनिल दास, वैगेरे. |
| १०/९ | १.०५.०० पो.ख. ०.०६.०० | ०.९५ | |
| ११/३ | १.८७.०० पो. ख ०.२६.०० | १.२५ | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा)दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १०/०१/२०२६.

सही /-
ॲड. उषा जे. कांबळे.
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविवण्यात येते की, आमचे अशिल अल्पेश भास्कर भोपी रा. सांगडे, पो. आजिवली, ता. पनवेल, जि. रायगड यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत जमिन मालक श्री. नरेश दशरथ पाटील रा. मु. हरिग्राम, मोरबे, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या कडून कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे. चांदई, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर.चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ४८ | ९ | ०-०७-० | ०=०६ |

सबब वरील मिळकतीबाबत कोणाचेही कसलेही गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, ट्रस्ट पोटगी, वारस, भाडेपावती, वहीवाट वा तत्सम कोणतेही हक्क हितसंबंध असतील तर आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीखत लिहुन घेणार यांचे वकील यांच्याकडे स्वतः येऊन लेखी कळवाव्यात. वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजण्यात येऊन विद्यमान मालकांबरोबर सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्या अशिलांच्यावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०१/२०२६

ॲडव्होकेट गितेश मोतीराम सावंत
मु.शिरसे, पो.कोंदिवडे,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१० २०१
मो.नं.९६८९६८८२७२

जावक क्रमांक/८०/१२२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,रायगड
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, रायगड विभाग, कल्पतरु
इमारत, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, रायगड, रायगड, रायगड, रायगड
दि. ०९/०१/२६
चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक: RGD/०४६२६/१८/२५
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक: ६१६/२५
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक राधा फाउंडेशन वावंजे तालुका पनवेल जिल्हा रायगडबाबत
न्यासाचा पत्ता :- प्लॉट क्रमांक १०६, डेझी बी, फेज-१, एन के पब्लिक स्कूल जवळ, रायगड, पनवेल, वाव्हांजे
अर्जदार - श्री. राजेश चेंबरा लाहिथाक्षण,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | ENROLLMENT FEES | ५०००.०० |

(अ) जंगम मिळक त: रोख रु.५०००/- मात्र
(अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

(ब) स्थावर मिळकत: रोख रु./- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी.त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ०९-०१-२०२६ रोजी दिली.

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय रायगड

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मौजे- कोषाणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र स्वे.मीटर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| दुर्गाशंकर कालूलाल त्रिवेदी | ५५/१अ | ७ | ३०० | ३०=०० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- १०/१/२०२६

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं -१०१ नेरळ
ता. कर्जत जि. रायगड
मो. ९८८१२७९८१७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे - कळंब, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेल्या खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेल्या जमीन मिळकती आमचे अशील १. श्री. निलेश प्रकाश चव्हाण, २. श्री. सचिन प्रकाश चव्हाण, ३.श्री. परेश मोहन भोगले, यांनी या जमीन मिळकतींचे विद्यमान मालक अ. रऊफ मोहसीन खोत, यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे. सदरील मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| अ.न | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | १६३/२/ब/२ | ०.२८.०० | ३.३४ |
| २ | १६४/४/ब | ०.२७.५० | ०.३० |

सदरहू जमीन मिळकती ह्या मिळकतींचे विद्यमान मालक यांच्या मालकीच्या व कब्जा वहिवाटीच्या आहेत, ते सांगतात, आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकती त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमीन मिळकतीमध्ये कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचविणे. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकती निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनींच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही. याची नोंद घ्यावी,

कर्जत दि. १०/०१/२०२६

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
ॲड. संदिप मारूती घरत
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत,
जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक मोनामी विशाल राजन व विशाल राजन, दोघे रा. मुंबई यांच्या सामाईक मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १.म्हात्रोळी ता. अलिबाग | २३५/२१ | ०-३२-९८ पो.ख.०-०८-०२ एकूण ०-४१-०० | १.२८ |
| म्हात्रोळी ता. अलिबाग | २३५/२२ | ०-३२-९८ पो.ख. ०-०८-०२ एकूण ०-४१-०० | १.२८ |

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०१/२०२६

सही/-
ॲड. धिरज जयवंत म्हात्रे
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमच्या आशिलांनी सांगितल्यावरुन आम्ही, **श्रीमती सुचिता उमेश साळुंके आणि श्री उमेश दत्तात्रेय साळुंके** रा. सदनिका क्र. ०३, तळमजला, सागर दर्शन, रामनाथ रोड, ता. अलिबाग, जि. रायगड, महाराष्ट्र, यांचे खालील परीशिष्टात वर्णन केलेल्या निवासी सदनिकेच्या (ज्यांस यापुढे **''सदर सदनिका''** असे संबोधले आहे) संदर्भातील हक्क, स्वामित्व व हितसंबंध तपासत आहे.

तरी सदर सदनिका किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत अगर तिच्या हिश्श्याच्या बाबत कोणत्याही व्यक्ती/व्यक्तींचा अथवा इसम/इसमांचा कोणताही कोणत्याही प्रकारचा विक्रीच्या मार्गाने, अदलाबदल, तारण, गहाण (संपाश्विक/कोलॅटरल किंवा अन्य कोणतेही), चार्ज, बक्षिस, न्यास, वारसा, टेनन्सी, ताबेकब्जा, भाडेपट्टा, पोट भाडेपट्टा, लायसन्स, लिन, वहिवाटीचा हक्क, भोगवटा हक्क, कुलमुखत्यापत्र, कंत्राट, सामंजस्याचा करार, कौटुंबिक व्यवस्थापन, समझोता, कोणत्याही कोर्टाचा ॲवार्ड अथवा हुकुम, लिसपेंडन्स, मनाई हुकुम, स्थगिती आदेश, जैसे थे परिस्थिती, ॲटॅचमेंट, आरक्षण, पुर्नविकसन, भागिदारी, सह उदयोग, सह विकसन, किंवा इतर कोणतेही देणे किंवा वचनबध्दता किंवा कोणतीही व कोणत्याही प्रकारची मागणी किंवा अन्य कोणतीही हरकत/हरकती असतील तर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत लेखी हरकती संबंधीत कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्या १२०१, गिरिराज टॉवर्स, प्लॉट क्र.५, सेक्टर २०, रोडपाली, नवी मुंबई ४१०२१८ व/किंवा shrikant.kherkar@gmail.com या पत्त्यावर कळवाव्यात ही विनंती. याप्रमाणे मुदतीत हरकती कळविण्यात असफल ठरल्यास सदर नोटीसीत नमुद सदर सदनिके संबंधी जे कोणते क्लेम/हरकती असतील ते अशा व्यक्तीने/व्यक्तींनी सोडले व/किंवा त्यागले आहेत असे समजणेत येईल व सदर सदनिकेचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल.

**संदर्भित परिशिष्ट:**

''सागर दर्शन प्लाझा सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड'' यांनी शेअर सर्टीफिकेट क्र.१ ता.२८ सप्टेंबर २००९ चे अंतर्गत अदा केलेले प्रत्येकी रु.५०/- दर्शनी मुल्याचे, अनुक्रमांक ०१ ते ०५ (दोन्ही समाविष्ट) असलेले एकुण चे ५ (पाच) पुर्णपणे भरलेले शेअर्स सलग्न अलिबाग नगर पालीकेच्या हद्दीतील, अलिबाग रामनाथ रोड, शहर आणि तालुका अलिबाग व जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य, अलिबाग शहर येथील फ्रिहोल्ड जमिन मिळकत सिटीएस क्रं. १०२३/४, क्षेत्रफळ ७८५.९७ चौ मी वर स्थित **''सागर दर्शन''** या नावाच्या इमारतीच्या तळ मजल्यावर असलेली **सदनिका क्रं. ०३** क्षेत्रफळ ५८५ चौ. फुट (बिल्टअप क्षेत्र) चे मालकीहक्का सहीत समायिक जागेवरील प्रमाणानुसार हक्क.

तारीख : १० जानेवारी, २०२६

श्री. श्रीकांत म. खेरकर
ॲडव्होकेट

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल आकाश विलास हुलसुरे, गिरीश रमेश ज्योती, हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक जतिंदर जगदीशराय अगरवाल, जगदीशराय जसवंतराय अगरवाल मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे वावे तर्फे आसरे ; तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|
| ३३/१ | ८-०१-०० पैकी लिहून देणार याच्या हिस्साचे क्षेत्र १-००-०० पैकी ०-५०-० | २-५० |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली सुधागड
दि. १०/०१/२०२६

सही /-
ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे
कार्यालय अभ्यंकर फार्म, कळंब रोड कॉर्नर,
जवळ हॉटेल अन्नपूर्णा, जांभुळपाडा, तालुका सुधागड,
जिल्हा रायगड पिन-४१०२०५,
मोबाईल नंबर-९१६८८०१०४८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. कुंडलिक जनार्दन भोपी यांनी खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री. सचिन महादेव ठाकूर राहणार पडले गाव, कल्याण शिळ रोड, कल्याण, जि. ठाणे ४२१२०४ यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे शेणगाव, ता. खालापूर, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ३२८ | २ | ०-१८-०० | १-३५ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतींबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. ०९/०१/२०२६

ॲड. यज्ञेश अनंत भागवत
रा. पाल टॉवर भिसेगाव ता. कर्जत
जि. रायगड. मो. ९३०७८८५७११

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-९५, टी-९६, टी-९७, टी-९८, टी-९९ आणि टी-१०० (२०२५-२६) अशा एकुण **सहा** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. १०.०१.२०२६ पासून ते दि. १८.०१.२०२६** पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. १९.०१.२०२६** ला **दुपारी १.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा / इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईटवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**
**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**

## तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण, कर्जत यांचे न्यायालयात

**पत्ता : प्रशासकिय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत, ता. कर्जत जि. रायगड- ४१०२०१**

(Tenancy Mannual, Form VIII)

**महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ पोटकलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस**

**जाहीर नोटीस**

३२ग दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/३३-२०२५

बारकू रामा दिसले मयत वारस
१. कृष्णा उर्फ किसन बारकू दिसले मयत वारस
१.१.जगदिश किसन दिसले
रा. पिंगळस पो आंबिवली ता. कर्जत जि. रायगड
१.२. राजेश्री रमेश रौदळ
रा. धामणी पो. आंबिवली ता. कर्जत जि.रायगड
२. भिका उर्फ भिकाजी बारकू दिसले (मयत वारस)
२.१. मंजुळा भिकाजी दिसले
रा.वावे पो कोषाणे ता. कर्जत जि.रायगड
२.२. रंजना रामचंद्र शेळके — अर्जदार
रा. आर्ढे-वांगणी रोड पो.मानिवली ता.कर्जत जि.रायगड
२.३. बाळू भिका दिसले
२.४.दत्ता भिकाजी दिसले
अ.क्र.२.३ व २.४ रा. पिंगळस पो.आंबिवली ता. कर्जत
३. सुमन दत्तू सावंत
रा.जाबरुंग ता.कर्जत जि.रायगड
४. जमना एकनाथ शेळके
मु.पो.कशेळे ता.कर्जत जि.रायगड

विरुद्ध

१. श्री.अब्दुलसलाम गुलाम रबानी — सामनेवाले
रा.मोग्रज ता.कर्जत जि.रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोग्रज, ता. कर्जत, जि.रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक १३/१०/२०२५ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक २९/०१/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी तहसिलदार तथा शेतजमिन यांचे न्यायालयात समक्ष आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| तालुका | गावाचे नाव | गट नं./स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| कर्जत | मोग्रज | ६२/१ | ०-१४-४० | ०-१० |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०५/१/२०२६

सही/-
**तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत, रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिल सौ. भाग्यश्री प्रभाकर शेळके, रा.किरवली, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-मोठे वेणगाव, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड**

| जमिन मालकाचे नाव | स.न/हिन | क्षेत्र, हे आर प्रति | आकार रू पै |
|---|---|---|---|
| श्वेता गणेश मुंढे | १५/१ | ००-५१-१० पोख ००-०६-१० ------------ ००-५७-२० हे.आर.प्रति यापैकी श्वेता गणेश मुंढे यांचे मालकीचे क्षेत्र ००-१८-०० हे आर प्रति विक्री क्षेत्र | २ रु ६४ पैसे |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची स्वकष्टाची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. ०९/०१/२०२६

सही/-
ॲड सतीश अर्जुन शेळके
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता- नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत- रायगड मो. नं. ९८८११३२२४८

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे चेंढरे, ता.अलिबाग जि.रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती मिळकत श्री.धुंडीराज विष्णू माटे व सौ.माधुरी धुंडीराज माटे, दोघेही राहणार कॉलेज रोड, नाशिक, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाला आहे. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लिएन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वास कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता.अलिबाग | ५०/२/ब/२६ | २-९४-०० एकूण | २९-४० |

अलिबाग
दिनांक : ०९/०१/२०२६

सही/-
(ॲड.संजय म.भगत)
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड
मो.नं.९८२२२७४५९५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे काकळघर, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या-त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**परिशिष्ट**
**मिळकतींचे वर्णन**
**मौजे काकळघर, ता. मुरुड, जि. रायगड**

| विद्यमान मालकांची नावे (७/१२ प्रमाणे) | गट नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मिटर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| फिरदोस होमी मसानी, फरीदा फिरदोस मसानी, राजेश सतींदरपाल जग्गी, राजेश जग्गी | २४७ | २-९३-०० पो.ख.०-४१-०० एकुण ३-३४-०० | २.३१ |
| फिरदोस होमी मसानी, फरीदा फिरदोस मसानी, राजेश सतींदरपाल जग्गी, राजेश जग्गी | २५३ | ३-१३-०० पो.ख. ०-३१-०० एकुण ३-४४-०० | २.५६ |
| | २५५/१ | एकूण क्षेत्र ४-००-०० | २.१२ |
| फिरदोस होमी मसानी, फरीदा फिरदोस मसानी, राजेश सतींदरपाल जग्गी, राजेश जग्गी | | पैकी १-६०-०० | ०.८५ |
| राजेश सतींदरपाल जग्गी | | पैकी २-४०-०० | १.२७ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ९/१/२०२६

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील.
अे/१, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- अलिबाग कोकोनट रिसॉर्टसाठी वेटर व हाऊसकीपिंग कामासाठी मुलांची गरज आहे. इच्छुकांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.+९१९९७००४१५७९ पत्ता: अलिबाग कोकोनट रिसॉर्ट, हॉटेल शालीमारच्या समोर, अलिबाग, रायगड.
- For office in Alibag Vacancy for office staff Attractive salary For interview call 9923750549
- पाहिजेत- अलिबाग येथे ऑफिसमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर/ऑफिस असिस्टंट पाहिजे. संपर्क : श्री. मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६
- अलिबागमधील दुकानात कामासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. (पार्टटाईम अथवा फुलटाईम) संपर्क : ९४२२६९६२३५
- विकणे आहे : अलिबाग-कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- किहीम-चोंढी येथील हॉटेलमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. Cook-Waiter-Helper-etc. 9152990991 Email: csskshirishkar@gmail.com
- नागाव येथे रिसॉर्ट मध्ये कामासाठी मुलगा व जोडपे पाहिजे आहे तरी संपर्क साधावा. मोबाईल नंबर.९३७१७१४५५२/९३७१७१४५५६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : खेळाडू, कलाकारांना उत्तम संधी लाभतील. नोकरीत अडचणी निर्माण होतील. प्रवासात काळजी घ्या.
- **वृषभ** : प्रकृतीच्या तक्रारी निर्माण होतील. आर्थिक स्थिती साधारण राहील. कायदेशीर बाबतीत विचार करा.
- **मिथुन** : नोकरीत बदली, बढतीचा विचार होईल. उच्च शिक्षणात प्रगती होईल. किरकोळ दुखापत संभवते.
- **कर्क** : धनचिंता दूर करता येईल. महत्त्वाची कामं ओळखीतून मार्गी लागतील. भागीदारीत अडचणी येतील.
- **सिंह** : नोकरी-व्यवसायात उत्साह राहील. संमिश्र फलदायी कालावधी आहे. शिक्षणक्षेत्रात प्रगती होईल.
- **कन्या** : ओळखीतून नोकरीच्या संधी लाभतील. आई-वडिलांची चिंता राहील. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **तूळ** : व्यवसायातील येणी वसूल होतील. मित्रांशी वाद-विवाद संभवतात. विवाहाच्या प्रयत्नांना वेग येईल.
- **वृश्चिक** : ग्रहांची उत्तम साथ लाभेल. आज तुम्ही म्हणाल ती पूर्व दिशा असणार आहे. समाधानी रहाल.
- **धनु** : सार्वजनिक क्षेत्रात विचारानं रहावं. उपजत कला-गुणांचा विकास होईल. प्रेम प्रकरणात वाद टाळावे.
- **मकर** : कौटुंबिक बाबतीत वाद टाळावेत. नोकरीत वेतनवाढीबाबत अनुकूलता राहील. बाकी चिंता नसावी.
- **कुंभ** : आपापल्या क्षेत्रात वैयक्तिक प्रभाव राहील. महत्त्वाची कामं मार्गी लागतील. जुनी येणी वसूल होतील.
- **मीन** : अचानक अधिक खर्च करावा लागेल. जोडीदाराशी वाद टाळावेत. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.

## १० जानेवारी

दिनविशेष

- **१९४६** : लंडनमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाचं पहिलं अधिवेशन सुरू झालं.
- **२००२** : आर्थिक गैरव्यवहाराबद्दल अमेरिकेत एन्रॉन कंपनीची चौकशी सुरू.
- **२००४** : सद्दाम हुसेन युद्धकैदी असल्याचं घोषित करण्यात आलं.
- **२०१३** : नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासोबत लढलेल्या कॅप्टन गोविंदराव किरडे यांचं निधन.
- **२०१४** : सराफी व्यवसायाला सोनेरी झळाळी प्राप्त करून देणाऱ्या दाजीकाका गाडगीळ यांचं निधन.

## कंबरदुखीनं हैराण?

आरोग्यमंत्र

अनेकांना कंबरदुखीचा त्रास असतो. वेळीच उपाय न केल्यास त्याची तीव्रता वाढत जाते आणि पुढे आयुष्यभर हा त्रास सहन करावा लागतो. नेहमी वाकून काम करणं, सतत खुर्चीवर बसून काम करणं, जड वस्तू उचलणं आदी कारणांमुळे कंबरदुखीचा त्रास होवू शकतो. दररोज व्यायाम करणं, मोकळ्या हवेत फिरायला जाणं, नियमित योगासने आणि संतुलित आहार घेणं ही पथ्य पाळल्यास कंबरदुखीपासून सुटका होऊ शकते. यासंबंधी आणखीही काही बाबी साह्यभूत ठरु शकतात.



✽ रात्री झोपताना गरम पाण्याच्या पिशवीने कंबर शेका. ✽ रोज एक चमचा सुंठवडा खाल्ल्याने कंबरदुखीवर फरक पडतो. ✽ मोहरीचे तेल किंवा खोबऱ्याच्या तेलात लसूण घालून चांगले उकळावे आणि त्या तेलाने कंबरेवर मसाज करावा. यामुळे आराम मिळतो. ✽ आहारात खनिजे, जीवनसत्वयुक्त घटक असणं आवश्यक आहे. यामुळे कबरेची झीज भरून निघते आणि कामाचा ताण सहन करण्यासाठी शरीर सज्ज होते. ✽ योगासने केल्यामुळे कंबरदुखीवर खूप फरक पडतो. नियमितपणे चक्रासन केल्यामुळे कंबरेसंदर्भातील तक्रारी दूर होतात. ✽ जेवण झाल्यावर जवस चावून खावे. यामुळे कंबरदुखी आणि गुडघेदुखीवर फरक पडतो. ✽ पांढरे तीळ खाल्ल्याने हाडं मजबूत होतात आणि कंबरदुखी थांबण्यास मदत होते. तिळाच्या तेलानं केलेला मसाजही परिणामकारक ठरतो.

## व्हायरस घालवण्यासाठी...

स्मार्ट टिप्स

स्मार्टफोन, कॉम्प्युटरमध्ये व्हायरसच्या घुसखोरीचा धोका बराच जास्त असतो. गुगल प्ले स्टोअरवरून काही अ‍ॅप्स डाउनलोड केल्यामुळे फोनमध्ये व्हायरस येऊ शकतो. यामुळे तुमचा डाटा लोकांपर्यंत पोहचू शकतो. माहितीची गोपनीयता धोक्यात येऊ शकते. फोन मंद गतीने काम करू लागला की त्यात व्हायरस आला आहे असं समजावं. पण यामुळे घाबरून जाण्याचं कारण नाही. फोनमधले हे व्हायरस अगदी सहज काढता येतात. त्यासाठी काय करता येईल? जाणून घेऊ या.

**पद्धत क्रमांक १**

स्मार्टफोनचा सेफ मोड सुरू करण्यासाठी पॉवर बटण बराच वेळपर्यंत दाबून धरावं लागेल. आता पॉवर ऑफचा ऑप्शन निवडला की तुमचा फोन सेफ मोडमध्ये जाईल.

**पद्धत क्रमांक २**

पॉवर बटण दाबून फोन ऑफ करू शकता. यानंतर पुन्हा पॉवर बटण दाबा. फोनच्या कंपनीचा लोगो येईपर्यंत हे बटण दाबून ठेवा. **(क्रमशः)**

## सौंदर्यप्रसाधनांचा असाही वापर

मेक अप मंत्रा

आपल्याकडे बरीच सौंदर्यप्रसाधनं असतात. कोणी सांगितलंय म्हणून किंवा प्रदर्शनात सहज फेरफटका मारताना मॉईश्चरायझर, लिपस्टिक्स, लिप बाम अशा वस्तू घेतल्या जातात. कधी भेट म्हणून एखादी वस्तू मिळते. आपला ब्रॅण्ड नाही म्हणून आपण त्याचा वापर करत नाही. काही वस्तू तशाच पडून राहातात तर काहींचा कालावधी संपतो. वापरात नसलेली सौंदर्यप्रसाधनं कचऱ्यात टाकण्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने कशी वापरता येतील याविषयी...

✽ एखादी लिपस्टिक ओठांवर शोभून दिसत नसेल तर क्रीम ब्लश म्हणून वापरता येईल. हा रंग गालांवर नक्कीच छान दिसेल. पडून असलेल्या वेगवेगळ्या रंगांच्या लिपस्टिक्सपासून तुम्ही तुमची अनोखी शेड बनवू शकता. यासाठी काय करायचं तर सगळ्या लिपस्टिक्स वितळवून घ्यायच्या. एका कंटेनरमध्ये भरून तो फ्रिजमध्ये ठेवायचा. वेगळ्या शेडची लिपस्टिक तयार होईल.

✽ अगदी थोडंसं उरलेलं परफ्युम बॉडी लोशनमध्ये घालता येईल. **(क्रमशः)**

## पंचांग

**शनिवार, १० जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
पौष कृ. ७, चंद्रराशी : कन्या,
नक्षत्र : हस्त, योग : अतिगंड,
सूर्योदय ७.१६, सूर्यास्त ६.१६

## फॉरवर्डस

**इन दिनों ताल्लुक़ हमसें थोड़ा मज़बूत ऱखना...**

**सुना हैं दिसंबर क़े बिछड़े फ़िर नहीं मिलतें...!**

## सेव्हिंग मंत्रा

✽ मालमत्ता खरेदी करण्यासाठी कर्ज घ्या. याला चांगलं कर्ज म्हणता येईल. भविष्यात मालमत्तेची किंमत वाढणार आहे. इतकंच नाही तर ती भाड्याने देऊन उत्पन्न मिळू शकतं. महागडा टीव्ही खरेदी करण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या कर्जाला काहीच अर्थ नाही. कारण या मालमत्तेतून कोणताही आर्थिक लाभ होणार नाही हे लक्षात घ्या.

✽ भरपूर पैसे असले तरी जीवन आणि आरोग्य विमा घ्यायला विसरू नका. वाढता आरोग्य खर्च पाहता आरोग्य विम्याला पर्याय नाही. कुटुंबाच्या सुरक्षेसाठीही जीवन विमा करून घ्यायला हवा.

## रोवा व्यवसायाची मुहुर्तमेढ

करिअरवाटा

दोस्तांनो, आजकाल खूप शिकूनही मनासारखी नोकरी मिळत नाही, अशी तक्रार ऐकायला मिळते. त्यातूनही एखादी नोकरी मिळालीच तर पगार कमी असतो. अशा वेळी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची कल्पना महत्त्वाची ठरते. परंतु उद्योग-व्यवसायाची सुरूवात करताना संघर्ष करण्याची तयारी ठेवायला हवी. तुम्हाला लगेच यश मिळत नाही. पण एकदा यश मिळाल्यावर तुम्ही चांगलं उत्पन्न मिळवू शकता. या पार्श्वभूमीवर ट्रॅव्हल्स अँड टूरिझमचा व्यवसाय विचारात घेण्याजोगा आहे. या व्यवसायाला सध्या चांगले दिवस आले आहेत. तुम्ही वाहन चालवू शकत असाल तर हा व्यवसाय सुरू करता येईल. लोकांना एका शहरातून दुसऱ्या शहरात जाण्यासाठी गाडी लागते. सहलींसाठीही गाड्यांची गरज असते. त्यामुळे तुमच्याकडच्या गाडीने सुरूवात करू शकता. चांगलं नाव झाल्यावर पुढे जाऊ शकता. नव्या गाड्या खरेदी करून व्यवसायवृद्धी करता येईल. वाहतूक सेवा क्षेत्र वेगाने विस्तारत आहे. व्यवसायिक कारणांमुळे प्रवास करणाऱ्यांची संख्याही खूप मोठी आहे. या माध्यमातून चांगलं उत्पन्न मिळवू शकता. छोट्या प्रमाणावर सुरूवात करून विस्तार करू शकता. ओला, उबेरसारख्या कंपन्याही संधी देत आहेत. या माध्यमातून तुम्ही प्रवासी जोडू शकता आणि स्वतंत्र व्यवसायाची मुहुर्तमेढ रोवू शकता.



## खेचाखेची

### एसीसाठी

एक दुकानदार एका महिलेला साड्या दाखवून थकला आणि शेवटी स्वतःचा राग आवरत त्या महिलेला बोलला, 'मला माफ करा मी तुम्हाला एकपण चांगली साडी दाखवू शकलो नाही.'

.

.

.

**बाई:** जाऊद्या एवढं काय त्यात. मी तर अशीपण भाजी घ्यायला चालले होते. तुमच्या दुकानात एसी आहे म्हणून थांबले.

## वेगळं काही

हा स्मार्ट टूथब्रश दातांमध्ये बसवता येतो. बटण दाबल्यावर तो सुरू होतो आणि दात स्वच्छ करतो. यात नायलॉनचे छोटे ब्रिसल्स असून दातांमध्ये सहज बसवता येईल या पद्धतीने त्याची रचना करण्यात आली आहे. ब्रशला टूथपेस्ट लावून तो दातांमध्ये बसवायचा. यानंतर पाच सेकंदात तो वरचे आणि खालचे दात स्वच्छ करतो. सर्वसाधारण टूथब्रशच्या तुलनेत हा स्मार्टब्रश १५ टक्के जास्त जंतू मारतो, असा कंपनीचा दावा आहे. याची किंमत तब्बल १२५ डॉलर म्हणजे नऊ हजार रुपये असून लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत कोणीही तो वापरू शकतो. हा ब्रश चार्ज करता येतो.

## दूर करा त्वचेचा कोरडेपणा

सौंदर्यसाधना

सद्यस्थितीत थंडीचा कडाका जाणवत असला तरी दुपारी उकाडा सहन करावा लागत आहे. एकंदरच वातावरणात हा बदल त्रासदायक ठरत आहे. या काळात अनेकींना कोरड्या त्वचेची समस्या जाणवते. काहींची त्वचा मुळातच कोरडी असते. अशा वेळी काही 'इसेंशियल ऑईल्स'चा वापर करता येईल. हे ऑईल घरच्या घरी कसं करावं या विषयी...



✽ बदामाच्या किंवा खोबरेल तेलात गुलाबाच्या पाकळ्या बुडवून ठेवा. हे तेल गुलाबाच्या पाकळ्यांसह काचेच्या बाटलीत भरून बाटली उन्हात ठेवा. दुसऱ्या दिवशी तेल गाळून पाकळ्या वेगळ्या करा. त्याच तेलात ताज्या गुलाबपाकळ्या बुडवून आधीची प्रक्रिया पुन्हा करा. दोन ते तीन वेळा ही कृती केल्यानंतर तेल गाळून घ्या. हे तेल नियमितपणे चेहऱ्याला लावल्याने त्वचेचा कोरडेपणा दूर होईल.

✽ चार ते पाच लिंबांचं साल काढा. वाटीत खोबरेल, बदाम किंवा आवळा तेल घेऊन लिंबाची सालं बुडवून ठेवा. एका भांड्यात थोडं पाणी ठेऊन त्यात वाटी ठेवा. भांडं गॅसवर मंद आचेवर ठेवा. अधूनमधून वाटीतल्या लिंबाची सालं हलवा. सुगंध पसरल्यावर गॅस बंद करा. हे तेल गाळून प्लास्टिक किंवा काचेच्या बाटलीत ठेवा.

## सुडोकू ५२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | | | | ८ | | ३ |
| | ३ | २ | | | | | १ | |
| | | ६ | ३ | १ | | | ९ | |
| ३ | | | १ | | | ९ | | |
| | | ९ | ५ | ८ | ७ | ३ | | |
| | | ८ | | | ९ | | | ४ |
| | १ | | | ७ | ५ | ४ | | |
| | ८ | | | | | २ | ३ | |
| ५ | | ४ | | | | | | ६ |

**टीप -**

✽ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✽ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✽ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ५१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ६ | ५ | ३ | ४ | ७ | ९ | ८ |
| ५ | ४ | ७ | ९ | १ | ८ | २ | ३ | ६ |
| ३ | ८ | ९ | २ | ६ | ७ | १ | ५ | ४ |
| ७ | ६ | ३ | ८ | ९ | २ | ५ | ४ | १ |
| ९ | १ | ४ | ३ | ५ | ६ | ८ | ७ | २ |
| २ | ५ | ८ | ४ | ७ | १ | ९ | ६ | ३ |
| ८ | ७ | ५ | ६ | २ | ३ | ४ | १ | ९ |
| ४ | ३ | १ | ७ | ८ | ९ | ६ | २ | ५ |
| ६ | ९ | २ | १ | ४ | ५ | ३ | ८ | ७ |

## शब्दकोडे क्रमांक ५२



**आडवे शब्द :-**

१) -------------
निंबोणीच्या झाडामागे लपलास कां ? एक बालगीत
९) थरथर
११) दुबळा, गरीब
१२) नड
१३) कप्पा, खण
१५) यजमान
१७) वागण्याची पद्धत
२०) कमळ
२३) धुलीकण
२४) किरकोळ सामान
२७) अवास्तव
२९) अंतःकरण
३०) स्तर, एकावर एक रचलेले
३१)विश्व
३२) पर्वत, माल
३३) सदोदित
३५) खाटिक
३८) गोसावी, भटक्या
४१) डावा
४३) प्रत्येक महिन्यास
४४) लोकांचे विचार
४५) पुन्हा
४६) टीका करणारा
४८) टरफल
४९) घशाला आलेली तृष्णता
५०) मान्यतेचा शब्द
५१) नासलेला
५३) इलाज
५५) अरण्य
५७) पोरका
५९) बारा वर्षांचा काळ
६१) नृत्यकलेचे दैवत
६३) रांग
६४) कर्ज देणारा
६६) शुभ्र, पांढरा
६९) धमनी
७०) वंदनाचा एक शब्द
७१) त्वरित, लगेच, तात्काळ

**उभे शब्द :-**

१) रौप्य
२) दोन वेळा
३) भला
४) जाड धागा
५) भाकरीचे एक धान्य
६) एक शेंगभाजी
७) श्रेष्ठ, वरचढ
८) चुलता
१०) बदल
१४) निराश, खिन्न
१६) श्रीरामाच्या वडिलांचे नाव
१८) वृक्ष
१९) गतिमान
२१) आजूबाजूस
२२) स्तुती करणारा
२३) दही, वरण घुसळण्याचे साधन
२५) तफावत, अंतर
२६) दुलई
२८) जगाचे कालचक्र
२९) दारु
३४) वणवा
३६) मलई
३७) हिन्दुस्थान
३९) चंद्र
४०) वाळवंट
४२) अंतःकरण
४३) खाचखळग्याची जमीन
४४) हुबेहूब
४५) पंख
४७) द्रव पदार्थ
४९) आंब्याची बी
५२) अंजन
५४) भेग बुजविणारी निमुळती पट्टी
५६) अत्यंत दुष्ट माणूस
५८) विविध, अनेक
६०) वारा, मरुत
६१) मऊ
६२)एक बारीक धान्य
६५) कैराचा चीक, काथ
६७) वेल
६८) विहीर

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

रंगबहार

**शरद कोरडे**

# वसंत देसाई

## शास्त्रीय संगीताचा नजराणा



मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील सुवर्ण युगाचे मानकरी असलेले मराठी संगीतकार वसंत देसाई यांचा २२ डिसेंबर हा स्मृतिदिन. 'प्रभात' चित्र संस्थेतून आपल्या संगीत प्रवासास सुरुवात करणाऱ्या वसंतरावांनी पुढे व्ही शांताराम यांच्या मराठी व हिंदी चित्रपटांना सातत्याने संगीत साज चढवला. आचार्य अत्रे, ऋषिकेश मुखर्जी, विजय भट्ट, बाबुभाई मिस्त्री मनोहर देसाई, गुलजार आदी ख्यातनाम निर्माते दिग्दर्शकांच्या चित्रपटांना संगीत देण्याची संधी वसंत देसाई यांना मिळाली. मुख्यतः त्यांच्या रचना शास्त्रीय संगीतावर आधारित होत्या व समीक्षाकांनी कायम त्यांच्या संगीताचे प्रशंसा केली होती. वसंत देसाई यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जवळील सोनावणे या गावी ९ जून १९१२ साली झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कुडाळ येथे झाले. लहानपणापासून त्यांना पोवाडे व लावण्या, तसेच लोकगीते गाण्याची आवड असल्याने ते सार्वजनिक कार्यक्रमांतून व गणेशोत्सवात गाण्यांचे कार्यक्रम करीत असत. खेड्यांतून होणाऱ्या नाटकांतूनही ते काम करीत असत. त्यांचे हे गुण हेरून त्यांच्या मामाने त्यांना कोल्हापूरला जाऊन प्रभात फिल्म मध्ये प्रवेश करण्याचा सल्ला दिला. वसंतराव आपल्या मामासह कोल्हापूरला जाऊन व्ही. शांताराम यांना भेटले. त्यांनी त्यांना प्रभात मध्ये ठेवून घेतले. वसंत रावांचे देखणे रूप, भरदार शरीरयष्टी पाहून शांताराम बापूंनी प्रभातच्या 'खूनी खंजीर' या १९३० साली निर्मिती केलेल्या मूकपटात त्यांना भूमिका दिली. पुढे त्यांची प्रभातच्या संगीत विभागात बदली करण्यात आली. 'प्रभात' च्या 'अयोध्येचा राजा' या चित्रपटात त्यांना ''जय जय राजाधिराज'' ही नांदी गायची संधी मिळाली. हे गाणे संगीतकार गोविंदराव टेंबे यांना आवडले व त्यांनी वसंतरावांना आपला सहाय्यक म्हणून घेतले. त्यांचा गोड गळा, हार्मो नियम वाजविण्याचे कौशल्य व जाण त्यांनी हेरली व त्यांचे कौतुक करून त्यांना परिपूर्ण संगीताची शिकवणी दिली. त्यानंतर 'प्रभात' मधील केशवराव भोळे, मास्टर कृष्णराव यांनी त्यांना, गीतांची चाल लावण्याची कसब, संगीतातील प्रतिभा, कामांतील काटेकोरपणा यांचे शास्त्रीय शिक्षण दिले. आपल्या या गुरूंकडून वसंतरावांनी कठोर साधना करून ज्ञान प्राप्त केले व त्याचा उपयोग त्यांना पुढील संगीताच्या वाटचालीसाठी झाला. देवल क्लब मध्ये असताना अल्ला दिया खान व मंजी खान यांच्यासारख्या गायकांची गाणी ऐकण्याची संधी त्यांना मिळाली व त्यांचे कान तयार झाले.

वसंत देसाई यांनी व्ही शांताराम यांच्या 'राजकमल' संस्थेतर्फे शकुंतला, सुभद्रा, जीवन यात्रा, डॉक्टर कोटणीस की अमर कहानी 'पर्बत पे अपना डेरा, 'मतवाला शायर राम जोशी, 'झनक झनक पायल बाजे' 'तुफान और दिया', 'दहेज', : दो आखे बारा हात', आदी चित्रपटांना संगीत दिले आणि ते गाजलेही. या चित्रपटांतील गाणी खूप लोकप्रिय झाली, तसेच 'अमर भूपाळी', 'श्यामची आई', आदी राजकमलच्या मराठी चित्रपटांना संगीत दिले, तसेच 'मोलकरीण', 'स्वयंवर झाले सीतेचे', 'लक्ष्मण रेखा', 'तूच माझी राणी', 'कांचनगंगा', 'छोटा जवान' आदी अन्य चित्रपटांनाही संगीत दिले, त्यामुळे वसंत देसाई यांना खूप लोकप्रियता मिळाली.

प्रकाश पिक्चरच्या १९५९ सालच्या 'गुंज उठी शहनाई' मध्ये वसंत देसाई यांनी ख्यातनाम शहनाई वादक बिस्मिल्लाखान यांच्या शहनाई वादनाचा चित्रपटभर चांगला उपयोग करून घेतला आहे. नायक राजेंद्र कुमार हा शहनाई वादक असल्याने तो ज्या वेळी शहनाई वाजवतो ते सारे वादन व 'तेरे सूर और मेरे गीत', 'तेरी शहनाई बोले', 'कह दो कोई ना करे यहा प्यार' आदी गाण्यांत व पाश्वसंगीतातही वसंत देसाई यांनी बिस्मिल्ला खान यांच्या शहनाई वादनाचा सुरेख सुर साधला आहे. हिंदी चित्रपटसृष्टीत इतक्या मोठ्या प्रमाणात प्रथमच शहनाईचा वापर करून घेण्यात आला आहे.

व्ही. शांताराम यांच्या 'दो आँखें बारा हात' या १९५७ सालच्या चित्रपटात व्ही. शांताराम यांना अशी एक प्रार्थना हवी होती, जी सर्व धर्मीयांना आपलीच वाटेल व तसे त्यांनी गीतकार भरत व्यास यांना सांगितले, त्यांनी सर्व धर्मांच्या शिकवणीचा अभ्यास करून 'कर्मयोग' हा सर्व धर्मांमध्ये महत्त्वाचा घटक आहे, असे जाणून त्यांनी 'ऐ मालिक तेरे बंदे हम, ऐसे हो हमारे करम, नेकी पर चले और बदी से टले, ताके हसते हुए निकले 'दम' हे गीत त्यासाठी लिहिले. वसंत देसाई यांनी त्याला संगीतबद्ध केले. हे गीत त्याकाळी इतके लोकप्रिय झाले होते की लाहोर व कराची आकाशवाणीवर ते सतत प्रसारित होत होते. तेथील नेत्यांना व नागरिकांना ते आपल्या धर्माचे गीत आहे असे वाटत होते. पाकिस्तानातील अनेक शाळांमधून ते गीत प्रार्थना म्हणून गायले जात होते. सर्व धर्मांना कर्मवादाची प्रेरणा देणारे हे गीत पाकिस्तानात मात्र मुस्लिम धर्माचे गीत म्हणून लोकप्रिय होते.

'दो आखे बारा हात' या चित्रपटानंतर व्ही. शांताराम यांनी आपले संगीतकार बदलण्याचा विचार केला. त्यानुसार त्यांनी प्रथम नौशाद यांना आपल्या चित्रपटाचे संगीत देण्याची विनंती केली, नौशाद हे वसंतरावांचे मोठे चाहते होते. त्यांनी शांताराम बापूंना आपणाकडे वसंत देसाईंसारखे संगीतकार असताना मी कसा आपल्या चित्रपटाला संगीत देऊ शकतो. असे उद्गार काढले. शेवटी व्ही. शांताराम यांनी आपल्या नवीन 'नवरंग' या चित्रपटासाठी सी. रामचंद्र यांना बोलावले. त्यांनी 'नवरंग' व 'स्त्री' या चित्रपटांना पुढे संगीत दिले. त्यानंतर वसंत देसाई यांनी मनोहर देसाई यांच्या 'हैदराबाद की नाझनीन', ''विजय भट्ट यांचे 'गुंज उठी शहनाई ' गुलजार यांच्या 'अचानक' ऋषिकेश मुखर्जींच्या 'गुड्डी' व सुनील दत्त यांच्या 'यादे' या चित्रपटांना संगीत दिले. यांतील सुनील दत्त यांचा १९६४ सालचा 'यादे' व गुलजार यांचा १९७३ चा 'अचानक' या चित्रपटात एकही गाणी नव्हते, परंतु यातील पार्श्वसंगीत तयार करणे हे मोठे अवघड काम होते व वसंत देसाई यांनी या चित्रपटांना समर्पक असे पार्श्वसंगीत दिले होते व त्याचे सीनेवर्तुळात खूप कौतुक झाले होते.

वसंत देसाई यांनी 'शेजारी', 'कुंकू', 'अमृत मंथन', 'संत ज्ञानेश्वर, 'अमर ज्योती', 'पडोसी', 'दुनिया ना माने' आदी चित्रपटांसाठी पार्श्वगायन केलेले आहे. 'दुनिया ना माने' मध्ये त्यांनी शांता आपटे यांच्यासोबत युगलगीत ही गायलेले आहे. मुंबईत आल्यावर त्यांनी शास्त्रीय संगीताचे पुढील शिक्षण उस्ताद इनायत खान व उस्ताद आलम खान यांच्याकडे घेतले होते. काही काळ त्यांनी मुंबई आकाशवाणीवर पार्श्वगायक म्हणूनही काम केले आहे. मुंबईतील संत स्टुडिओचे मालक होमी वाडिया यांच्या 'बिजली चमक गई' या चित्रपटाला त्यांनी संगीतही दिले होते ते वाडीया यांना खूप आवडले .१९४३ मधील 'आँख मिलते ही मोहब्बत हो गई' या चित्रपटाचे संगीतही प्रेक्षकांना पसंत पडले होते.

ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक व संशोधक अमरेंद्र धनेश्वर यांनी वसंत देसाई यांनी संगीत दिलेल्या रचना व त्यातील राग यांचा अभ्यास करून एक सूची तयार केलेली आहे. त्यातील काही निवडक गीते खालील प्रमाणे आहेत. राग देसकार -'घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला' चित्रपट -अमर भूपाळी. राग तोडी 'एक था बचपन' चित्रपट- आशीर्वाद. राग जोगिया 'केहदो कोई ना करे यहा प्यार' चित्रपट -'गुंज उठी शहनाई'. राग आसावरी 'पिया ते कहा गये' चित्रपट- तुफान और दिया. राग दरबारी कानडा ' हे राम तुम्हारी रामायण कब तक ना संपूर्ण होगी' चित्रपट- संपूर्ण रामायण. राग मांड 'सांगा मुकुंद कुणी हा पाहिला' चित्रपट -अमर भूपाळी. राग मिश्र खमाज 'अपने सय्यासे नयना लगाये' चित्रपट- अर्धांगिनी. राग हिंदोल बहार 'स्वयंवर झाले सीतेचे' चित्रपट -'स्वयंवर झाले सीतेचे'. राग कलावती, 'काली परी रंग भरी किसने पुकारा' चित्रपट- 'दो फुल.' राग शिवरंजनी, 'याल कधी हो घरी घरधनी' चित्रपट- छोटा जवान. राग केदार, 'हमको मन की शक्ती देना' चित्रपट -गुड्डी. राग बिहाग, 'तेरे सुर और मेरे गीत' चित्रपट- गुंज उठी शहनाई. राग मालकंस, 'ए मालिक तेरे बंदे हम' चित्रपट-' दो आखे बारा हात'. राग यमन, 'चंद्रमा ओ उनसे कह दो' चित्रपट -'भारत मिलाप'. राग नियार मल्हार, 'बोले रे पपीहरा' चित्रपट -गुड्डी. राग भैरवी, 'जो तुम तोडो पिया' चित्रपट- गुंज उठी शहनाई. अशा एका पेक्षा एक सुंदर गाण्यांचा नजराणा वसंत देसाई यांनी आपणास दिला आहे.

२२ डिसेंबर १९७५ मध्ये आकाशवाणी वरील 'हम होंगे कामयाब' या गीताचे ध्वनिमुद्रण करून ते मुंबई मधील 'केंब्रिज कोर्ट' या इमारतीमधील आपल्या घरी जेव्हा परत आले, त्यावेळी इमारतीची लिफ्ट बंद होती, त्यांना हे माहित नव्हते. ●

**सुधाकर लाड**

# सरनोबत सरदार जावजी लाड यांच्या शौर्यशाली इतिहासाचे, स्मृतिंचे जतन करावे



**छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या धगधगत्या महायज्ञात किल्ले रायगडचे सरनोबत सरदार जावजी लाड यांनी स्वतःच्या प्राणांची आहुती दिली. किल्ले रायगडच्या दक्षिणेला असलेल्या काळकाईंच्या खळग्यात (खिंडीत) जावजी लाड यांच्या पराक्रमाच्या स्मृती चिरंतन रहाव्यात यासाठी उभारलेला दगडी चिरा (वीरगळ) व या दगडी चियाभोवती केलेले दगडी बांधकाम आज पडझड झालेल्या स्थितीत जावजी लाड यांनी केलेल्या पराक्रमाची साक्ष देत उभे आहे. त्यांनी केलेल्या पराक्रमातून तरूण पिढीला, इतिहासप्रेमींना, पर्यटकांना राश्ट्र प्रेमाची प्रेरणा सतत मिळत रहावी यासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने सरदार जावजी लाड यांच्या पडझड झालेल्या दगडी चियाच्या बांधकामाचे पुर्नबांधकाम करावे आणि सरदार जावजी लाड यांच्या षौर्यषाली इतिहासाचे, स्मृतींचे जतन करावे.**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मराठी स्वराज्यासाठी प्राण देणाया 'लाड' घराण्यांना दैदिप्यमान, षौर्यषाली असा इतिहास आहे. राजधानी किल्ले रायगडचे सरनोबत सरदार जावजी लाड, सरदार विठोजी लाड यांनी शिवकाळात आपल्या तलवारीचे पाणी पाजून स्वराज्याच्या शत्रूंवर मोठा पराक्रम गाजवल्याच्या नोंदी इतिहासातील साधनात आढळतात.

आधुनिक काळात 'लाडिलीदास' या विद्वान कवीने 'सुधर्मबोधिनी प्रश्नोत्तरी' 'पदावली', 'कामवनविलास' इत्यादी मौल्यवान ग्रंथांची रचना केलेली आहे. त्याच बरोबर महात्मा जोतिबा फुले यांच्या सत्यषोधक चळवळीचे खंदे पुरस्कर्ते, शेकापक्षाचे एक संस्थापक नामवंत पत्रकार, संपादक, लेखक रामचंद्र नारायण लाड यांनी 'मराठ्यांचे दासीपुत्र पायपोस किंमतीचे पेशवे' हे वादळी पुस्तक लिहून विचारांच्या रणांगणात तलवारीसारखी लेखणी चालवली आणि 'लाड' घराण्यांना 'ग्रंथकार' म्हणूनही दैदिप्यमान असा इतिहास असल्याची नोंद आधुनिक इतिहासात केलेली आहे.

'लाड' हा शब्द देशवाचक आहे. लाड म्हणजे लाट देष होय. गुजरातच्या दक्षिण व महाराश्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीला प्राचिनकाळी 'लाट' देष म्हणत. या 'लाट' चाच अपभ्रंश होवून 'लाड' झाले. लाड शाखीय लोक खानदेष व नाशिक या जिल्ह्यात बहुसंख्येने आढळतात. लाड शाखीय लोकांची वस्ती इ.स.नवव्या किंवा दहाव्या शतकात महाराष्ट्रात झाली असावी. लाड शाखीय लोकांची मातृभाशा अहिराणी असून ती संस्कृत प्रचुर आहे. लाड शाखीय लोक उच्चवर्णियांत गणले गेले आहेत. त्यांचे आचार-विचार मराठयांसारखेच दिसतात.''

**(संदर्भ: भारतीय संस्कृतीकोश खंड आठवा)**

इ.स. १६८२ च्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात टेंभुर्णी येथे शाहजादा आज्जमचा सरदार कुलीच खान हा छत्रपती संभाजी महाराजांच्या मुलखात आला असता छत्रपती संभाजी महाराजांचे सेनापती हंबीरराव मोहिते व सरदार विठोजी लाड वीस हजार घोडेस्वार व पायदळासह कुलीच खानच्या सैन्यावर चालून गेले. संभाजी महाराजांचे सैन्य आणि कुलीच खानाचे सैन्यात तुंबळ युध्द झाले. या लढाईत अनेक मोगल ठार झाले. शेवटी कुलीच खान रणमैदान सोडून माघारी फिरला आणि स्वतःचा जीव वाचविण्यासाठी शाहजादा आज्जमकडे पळत सुटला. या लढाईत सेनापती हंबीरराव मोहिते व सरदार विठोजी लाड यांच्या बहाद्दर सैनिकांनी मोगली सैनिकांना पळता भूई थोडी केली.

फेब्रुवारी १६८२ रोजी औरंगजेब बादशहाने कासिमखान व रूहुल्लाह खान या दोन सरदारांना त्यांच्या सैन्यासह तळ कोकणातील तोंडषी जावे असा हुकूम केला होता. औरंगजेब बादषहा असा हुकूम करण्याच्या मनःस्थितीत असल्याचा अंदाज छत्रपती संभाजी महाराजांना आला होता. म्हणून त्यांनी सरदार विठोजी लाड यांना कल्याण-भिवंडीकडे जाणाया वाटा रोखण्यासाठी चार हजार घोडेस्वार व पायदळ देवून पाठवले. त्यावेळी कासिम खान व रूहुल्लाह खान यांना सरदार विठोजी लाडयांनी आपल्या युध्द कौषल्याचा चांगलाच दणका दाखवला. सरदार विठोजी लाडांनी मोगली सैन्यावर पुढील व मागील बाजूने हल्ला करून मोगली सैन्याला खिंडीत गाठले. मोगलांविरूध्दच्या कल्याण-भिवंडीच्या या रणसंग्रामात स्वतः छत्रपती संभाजी महाराज सहभागी झाले होते. या रणसंग्रामात बहुतेक मोगल ठार झाले. छत्रपती संभाजी महाराजांच्या सैन्याने रूहुल्ला खान व कासिम खान यांना पराभूत केले. मराठयांनी दणदणीत विजय मिळवला.

(संदर्भ: अद्वितीय श्री छत्रपती संभाजी महाराज खंड ३रा, चिटणीस बखर, विठोजी लाड यांचा 'पायदळातील सरदार' असा सभासद बखरीत उल्लेख आहे.) छत्रपती षिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठी स्वराज्याच्या संरक्षणासाठी छत्रपती संभाजी महाराजांनी पराक्रमाची पराकाश्टा केली. छत्रपती संभाजी महाराजांनी मराठी स्वराज्याच्या राज्यकारभाराचे अधिकार हातात घेतल्यानंतर नऊ वर्शांच्या कालखंडातील प्रत्येक क्षण रणांणात आणि राज्यकारभार पाहण्यात घालवला होता.

पण पुढे संगमेष्वर येथे बादषहा औरंगजेबचा सरदार मुर्कबखान याच्या सैन्याच्या तुकडीच्या आणि रंगनाथ गोसावी व त्याच्या गोसावी सहकार्यांच्या तुकडीच्या हाती षुक्रवार दि. १ फेब्रुवारी १६८९ रोजी मराठी स्वराज्याचे युवराज छत्रपती संभाजी महाराज पकडले गेले. त्यानंतर सोमवार दि. ११ मार्च १६८९ रोजी तुळापूर येथे युवराज छत्रपती संभाजी महाराजांचा औरंगजेबच्या आज्ञेने वध करण्यात आला. मराठी स्वराज्य उखडून टाकण्यासाठी औरंगजेबाने या अस्थिर परिस्थितीचा फायदा घेण्याकरीता इतिकादखानाला सैन्य देवून किल्ले रायगडची मोहिम आखली. २५ मार्च १६८९ रोजी दुसयांदा इतिकादखानाने किल्ले रायगडच्या परिसरात येवून मराठयांच्या राजधानीला वेढा घातला. त्यावेळी या कठिण परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी संभाजी महाराजांच्या पत्नी येसूबाईंनी राजाराम महाराज व अन्य सरदारांनी रायगड किल्ल्यातून बाहेर पडावे व मोगली सैन्याला उपद्रव देवून वेढयाचा ताण कमी करावा असा सल्ला दिला. त्याप्रमाणे या संकटाच्यावेळी ५ एप्रिल, १६५९ रोजी किल्ले रायगडच्या वाघ दरवाजातून दोरांच्या सहाय्याने राजाराम महाराज त्यांच्या तीन पत्न्या, रामचंद्र अमात्य, प्रल्हाद निराजी, षंकराजी नारायण हे सरदार किल्ले रायगडावरून निसटले. आणि ठरल्याप्रमाणे राजाराम महाराजांचे सरदार संताजी घोरपडे, धनाजी जाधव यांनी औरंगजेबच्या सैन्यावर धावते हल्ले करण्यास सुरूवात केली. त्यामुळे किल्ले रायगडचा वेढा चालविण्यात इतिकातखानाला अडथळे येवू लागले. षेवटी सात महिने राजधानी किल्ले रायगड भोवती वेढा घालून बसलेल्या मोगली सैन्याला शरण जात छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी महाराणी येसूबाईंनी ३ नोव्हेंबर, १६८९ रोजी राजधानी किल्ले रायगड औरंगजेबचा सरदार इतिकादखानाच्या स्वाधीन केला.

महाराणी येसूबाईंबरोबर छत्रपती संभाजी महाराजांचे सुपूत्र छत्रपती शाहू, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्नी सकवारबाई आणि किल्ले रायगडावर राहणाऱ्या सरदारांच्या कुटुंबियांना कित्येक विश्वासू नोकरांना इतिकादखानाने कैद केले. किल्ले रायगडावर मिळालेली अमाप संपत्ती व या राजकैद्यांना सोबत घेवून इतिकादखान कोरेगांव येथे औरंगजेबच्या छावणीत दाखल झाला. इतिकादखानाने केलेल्या पराक्रमावर औरंगजेब बेहद खुश झाला. संतुष्ट होऊन त्याने इतिकादखानास 'झुल्फीकारखान' हा किताब दिला. इतिकादखानाने कैद करून आणलेल्या ९ वर्शांच्या छत्रपती षाहू महाराजांना औरंगजेबने सप्त हजारी मनसबदार केले. किल्ले रायगडावरून जिंकून आणलेली छत्रपती शिवाजी महाराजांची 'भवानी तलवार' शाहू महाराजांना भेट म्हणून दिली. मराठयांची राजधानी किल्ले रायगड मोगली सैन्याच्या ताब्यात गेला. याच दरम्यान मोगलांना आपल्या सैन्याचा पसारा आवरून मराठी प्रदेश सोडून दिल्लीकडे निघण्याचे ठरवावे लागले.

९ वर्षांचे छत्रपती शाहू महाराज, महाराणी येसूबाई, छत्रपती शिवाजी महाराजांची पत्नी सकवारबाई यांना ओलीस ठेवण्यासाठी मोगलांनी आपल्या बरोबर दिल्लीला नेले. इ.स. १७०३ मध्ये औरंगजेबने शाहू महाराजांचा जाधवराव यांच्या मुलीषी विवाह लावून दिला. पुढे स.स. १७०७ साली औरंगजेबचा मृत्यू झाला.

आणि मराठयांवरील मोगली आक्रमण संपले. दिल्लीला दिडतप मोगलांच्या नजर कैदेत घालविलेल्या छत्रपती षाहू महाराजांची, महाराणी येसूबाईंची व सकवारबाईंची सुटका झाली. २५-२६ वर्षांच्या छत्रपती शाहू महाराजांनी महाराश्ट्रात आल्यावर मराठी स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड ताब्यात घेण्यासाठी हालचाली सुरू केल्या. विखुरलेल्या सैन्याला एकत्र केले आणि आपले प्रतिनिधी म्हणून गदाधर प्रल्हाद, फत्तेसिंग भोसले यांना आपले सैन्य देवून किल्ले रायगडावर स्वारी करण्यासाठी पाठवले. ५ जून, १७३३ रोजी छत्रपती षाहू महाराजांच्या सैन्याने सिद्दी याकूतखानच्या सैन्याषी लढाई करून किल्ले रायगड जिंकला. मराठी स्वराज्याची राजधानी तब्बल ४४ वर्शांनी मराठयांच्या ताब्यात आली. सिद्दी याकूतखानचा पराभव करून राजधानी किल्ले रायगड ताब्यात घेतल्याचे पत्र छत्रपती षाहू महाराजांना पाठविण्यांत आले. किल्ले रायगड जिंकल्याचे श्रेय सरदार गदाधर प्रल्हाद या छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिनिधीला आणि फत्तेसिंग भोसले यांना मिळाले. या लढाईत सरदार नारायण झुंजारराव देशमुख, सरदार जावजी लाड इत्यादी अनेक शूरवीर लढले. किल्ले रायगड जिंकण्यासाठी मराठ्यांनी केलेल्या पराक्रमाची किर्ती निजामशाह व दिल्लीचा बादशहा बहादुरशाह (प्रथम) पर्यंत पोहचली. मराठी स्वराज्याच्या संरक्षणासाठी छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत १७ व्या शतकाच्या आरंभी थोरले बाजीराव पेषवे, सरखेल कान्होजी आंग्रे, बाजीरावांचा भाऊ अनंत बाळाजी भट उर्फ चिमाजी अप्पा, फत्तेसिंग भोसले, गदाधर प्रल्हाद प्रतिनिधी इत्यादी पराक्रमी विरांच्या तलवारी पराक्रम गाजवीत असतांना सरनोबत सरदार जावजी लाड यांनी किल्ले रायगड जिंकताना गाजविलेल्या पराक्रमावर खूश होवून छत्रपती षाहू महाराजांनी सरदार जावजी लाड यांचेवर राजधानी किल्ले रायगडच्या सरनोबत पदाची जबाबदारी सोपवली. सरदार जावजी लाड सरनोबत झाले. पराभूत झालेला सिद्दी याकूत डिवचलेल्या नागासारखा फणा काढून पुन्हा राजधानी किल्ले रायगड ताब्यात घेण्यासाठी तयारीला लागला. छत्रपती शाहू महाराजांचे सरखेल कान्होजी आंग्रे यांना सागरी लढाईत गुंतवून ठेवण्यासाठी सिद्दी याकूतने इंग्रजांचे आरमार आणि सैन्य इंग्रजांषी यशस्वी मसलत करून आपल्या बाजूने उभे केले. सिद्दी याकूतचा सरदार शामल जंजिरकरने इ.स. १७३३ ला बाणकोट घेतले. किल्ले रायगड परिसरातील गोरेगांव, गोवले, विन्हेरे, तुडील या गावांवर सिद्दी याकूतच्या सैन्याचा अंमल सुरू झाला. किल्ले रायगडावरून सिद्दी याकूतच्या सैन्यावर स्वाऱ्या करणाऱ्या मराठी सैन्याच्या स्वायांना शामल जंजिरकर जुमानेसा झाला.

किल्ले रायगड परिसरातील रयतेला उपद्रव देणारे सिध्दीचे सैन्य किल्ले रायगड ताब्यात घेण्याच्या जोरदार तयारील लागले. परत पूर्वीसारखीच परिस्थिती उत्पन्न झाली. मराठी स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड परत पारतंत्र्यात जाणार की काय? आणि नामुश्कीचा प्रसंग परत येणार की काय? अशी परिस्थिती उद्भवली. अशा बिकट प्रसंगी छत्रपती शाहू महाराजांनी गदाधर प्रल्हाद या आपल्या प्रतिनिधीशी किल्ले रायगडच्या सुरक्षिततेबाबत चर्चा केली आणि त्यांनी थोरले बाजीराव पेशवे, चिमाजी अप्पा यांना मातब्बर सरदारांसोबत किल्ले रायगडच्या संरक्षणासाठी फौज पाठवा अशी आज्ञापत्रे पाठवली.

**मो. ९२२४२३२९६३** ●

# सुनील ग्रोवर : अभिनय जिवंत करणारा अवलिया



**धनंजय शेटये**

सुनील ग्रोवर म्हणजे केवळ एक नाव नसून, अभिनयाच्या अथांग आकाशात स्वयंप्रकाशित असणारे एक लखलखते नक्षत्र आहे. ते केवळ अभिनय करत नाहीत, तर ते अभिनय 'जगतात' आणि प्रत्येक श्वासासोबत तो 'अनुभवतात'. एखाद्या कलाकाराने कलेशी इतके एकरूप व्हावे की, मूळ व्यक्ती आणि पात्र यातील पुसटशी रेषाही नाहिशी व्हावी, याचा जिवंत वस्तुपाठ म्हणजे सुनील ग्रोवर! 'कौन बनेगा करोडपती'च्या मंचावर त्यांनी साकारलेले महानायक अमिताभ बच्चन असोत किंवा 'द कपिल शर्मा शो'मध्ये हुबेहूब उभे केलेले आमीर खान; त्यांचा हा अभिनय पाहताना प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटते. काही क्षणांसाठी असे वाटते की, खुद्द अमिताभ किंवा आमीर यांनाही स्वतःची इतकी तंतोतंत प्रतिकृती साकारणे कदाचित जड जाईल. ही किमया केवळ निसर्गदत्त देणगी नसून, त्यामागे अफाट मेहनत, सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि कलेप्रती असलेली अढळ निष्ठा दडलेली आहे.

भारतीय मनोरंजन विश्वात आजवर अनेक नकलाकार (मिमिक्री आर्टिस्ट) झाले, पण सुनील ग्रोवर हे 'एकमेवाद्वितीय' ठरले. जेव्हा खुद्द आमीर खान त्यांची नक्कल पाहून भारावून जातो आणि कौतुकाची थाप देतो, तेव्हा तो सुनीलच्या कारकिर्दीतील कोणत्याही ऑस्करपेक्षा मोठा सन्मान ठरतो. कपिल शर्मा शोचे खरे 'प्राण' सुनीलच होते, हे त्रिवार सत्य आहे. यशाची शिखरं सर करताना संयम सुटलेल्या कपिलने त्यांचा अपमान केला, पण त्या वादात सुनीलने दाखवलेला समजूतदारपणा आणि सोशिकपणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची वाढवून गेला. या वादात नुकसान कपिलचे झाले, पण सुनीलने मात्र कधीही मागे वळून पाहिले नाही. आपल्या प्रतिभेच्या बळावर त्यांनी यशाचे नवे क्षितीज गाठले.

सुनील ग्रोवर यांच्या विनोदाचे सर्वात मोठे गमक म्हणजे त्यांचे अचूक 'कॉमिक टायमिंग'. शब्दांमधील 'पॉज' कधी घ्यायचा आणि प्रेक्षकांच्या मर्मावर घाव कधी घालायचा, याचे त्यांना उपजत ज्ञान आहे. कोणताही विनोद ओढून-ताणून न करता साधेपणातून हसवण्याची त्यांची शैली कमालीची आहे. त्यांनी अजरामर केलेली 'गुत्थी', वेडावाकडा पण अत्यंत प्रेमळ 'डॉ. मशहूर गुलाटी' आणि 'मेरे हसबंड मुझे प्यार नही करते' म्हणणारी 'रिंकू भाभी' ही पात्रे केवळ पडद्यापुरती मर्यादित न राहता प्रत्येक रसिकाच्या घराघरात आणि मनात स्थिरावली आहेत. केवळ विनोदवीर म्हणून एका चौकटीत अडकून न पडता, त्यांनी आपल्या अभिनयाची व्याप्ती वाढवली. 'तांडव' सारख्या वेब सीरिजमधील धूर्त 'गुरपाल सिंग' असो किंवा 'भारत' आणि 'जवान' सारख्या चित्रपटांमधील महत्त्वाच्या भूमिका; सुनील ग्रोवर यांनी प्रत्येक ठिकाणी आपल्या अभिनयाचा अमीट ठसा उमटवला आहे. माणसांच्या सवयी आणि देहबोलीचे सूक्ष्म निरीक्षण करून ते जेव्हा कॅमेऱ्यासमोर उभे ठाकतात, तेव्हा ते स्वतःला विसरून त्या पात्राचा आत्मा बनतात. थोडक्यात सांगायचे तर, सुनील ग्रोवर हे केवळ हसवणारे कलाकार नाहीत, तर ते अभिनयाच्या क्षेत्रातील एक प्रतिभावान आणि ऋषितुल्य व्यक्तिमत्व आहेत, ज्यांनी विनोदाच्या पलीकडे जाऊन कलेची एक वेगळीच उंची प्रस्थापित केली आहे.



# सिएरा नेव्हाडा पर्वतरांग

सिएरा नेव्हाडाही जगातील प्रसिद्ध पर्वतरांगांपैकी एक आहे. कॅलिफोर्निया आणि नेवाडा या दोन राज्यांमधून ही पर्वतरांग जाते. नेव्हाडा या शब्दाचा अर्थ बर्फाने झाकलेले पर्वत असा होतो. खरोखरच या रांगेतील उंच शिखरांवर वर्षभर पांढरा बर्फ असतो.माउंट व्हिटनीहे या पर्वतरांगेतील सर्वात उंच शिखर आहे. हे शिखर अमेरिकेतील सर्वात उंच पर्वतांपैकी एक मानले जाते. या पर्वतरांगेतून अनेक ओढे आणि नद्या उगम पावतात.

**ओळख पर्वतांची**

बर्फ वितळल्यावर तयार होणारे पाणी आसपासच्या राज्यांना पिण्यासाठी व शेतीसाठी वापरले जाते. सिएरा नेव्हाडाच्या उत्तरेकडील भागातून बर्फ वितळून सॅक्रामेंटो नदी तयार होते. कॅलिफोर्नियातील ही सर्वात महत्त्वाची नदी मानली जाते.अमेरिकन नदी,ट्रकी नदी,वॉकर नदी,कार्सन नदी, किंग्ज नदी यासारख्या अनेक महत्वाच्या नद्या सिएरा नेव्हाडा पर्वतरांगेतउगम पावतात. त्यामुळे ही पर्वतरांग पाण्याचा मोठा स्त्रोत मानली जाते.हवामान थंड असल्यामुळे येथे जायंट सिक्वॉया,पाईन, सिडार,ज्युनिपर,ओक यासारखी काटेरी पाने असलेली किंवा बर्फ सहन करणारी झाडे आढळतात. असतात. तर काळी अस्वले, हरणे, लांडगे, कोल्हे, गरूड, असे विविध प्राणी सिएरा नेव्हाडातील जंगलांत आढळतात. उंच डोंगर उतारांवर कधीकधी बर्फात खेळणारे छोटे प्राणीही दिसतात. येथील उंच भागात वर्षभर गार वारा असतो. हिवाळ्यात बर्फवृष्टी मोठ्या प्रमाणात होत असल्याने लोक स्कीईंग, बर्फात घसरत खेळणे, अशा खेळांचा आनंद घेतात. उन्हाळ्यात तापमान मध्यम असते.त्यामुळे पर्यटक, प्रवासी आणि पर्वत चढाई करणारे लोक मोठ्या प्रमाणात येतात.सिएरा नेव्हाडा भागात नैसर्गिक तलावही प्रसिद्ध आहेत. त्यातील लेक टाहो हा अतिशय सुंदर आणि जगभरातील पर्यटकांना आकर्षित करणारा



तलाव आहे. निळसर पाण्याने भरलेला हा तलाव उंच पर्वतांनी वेढलेला असल्यामुळे अधिक मोहक दिसतो.ही पर्वतरांग नैसर्गिक संपत्ती, जंगलांचे रक्षण, पाण्याचा पुरवठा आणि पर्यटन या सर्वांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळेच सिएरा नेव्हाडा हे अमेरिकेतील एक खास आणि अद्भुत नैसर्गिक स्थळ मानले जाते.

# बना सोशल मिडिया मॅनेजर

सध्या सगळीकडे सोशल मिडियाचा जबरदस्त प्रभाव आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातले लोक सोशल मिडियावर असतात. सोशल साईटवर उत्पादनांचं प्रमोशन केलं जातं. म्हणूनच सोशल मिडिया स्पेशलिस्ट किंवा सोशल मिडिया मॅनेजर म्हणून तुम्ही करीअर करू शकता. जगातल्या लोकसंख्येत युवावर्ग खूप मोठा आहे. तरूणमंडळींना सोशल मिडिया खूप आवडतो. म्हणूनच तरूणांशी संवाद साधण्याचं,

**कोण होणार?**

त्यांच्यापर्यंत आपलं उत्पादन पोहोचवण्याचं प्रभावी साधन म्हणून सोशल मिडियाकडे पाहिलं जातं. कंपनीच्या उत्पादनाचं कमीत कमी शब्दात प्रभावी वर्णन करून लोकांना त्याच्या प्रती आकर्षित करण्याचं काम सोशल मीडिया मॅनेजर करतो. कंपनी आणि ग्राहक यांच्यातल्या संवादाचं माध्यम म्हणजे सोशल मिडिया मॅनेजर.

सोशल मिडिया स्ट्रॅटेजिस्ट म्हणूनही तुम्ही काम करू शकता. हा स्ट्रॅटेजिस्ट कंपनीची मार्केटिंग मोहीम सांभाळतो तसंच कंपनीचं सोशल मिडिया अकाउंट सांभाळण्याची जबाबदारीही त्याच्यावर असते. सोशल मिडियावर अनेक सेलिब्रिटी असतात. या सेलिब्रिटींच्या सोशल अकाउंटचं व्यवस्थापन करण्याची जबाबदारी सोशल मिडिया मॅनेजरवर असते. या क्षेत्रात काम करण्यासाठी तुम्हाला सोशल मिडियाचं



सखोल ज्ञान असणं गरजेचं आहे. शिवाय नव्या तंत्रज्ञानाची ओळख असायला हवी. सतत काही तरी नवं शिकत राहायची इच्छा असायला हवी. या क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी आहेत. विविध संस्था सोशल मिडियाशी संबंधित अभ्यासक्रमही चालवतात. असे अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही तुमच्या आवडीच्या क्षेत्रात करीअर करू शकता.

# हत्तींचे माणसाशी नाते

हत्ती हा प्राणी खूप रुबाबदार दिसतो. आपले मोठाले कान पंख्यासारखे हलवीत सोंड डौलदारपणे खाली वर करत बारीक डोळ्यांनी बघणारा हत्ती पहायला तुम्हाला आवडतं खरे ना? त्याच्या पाठीवरच्या अंबारीत बसून चक्कर मारायची संधी मिळाली तर आणखी आनंद होते. पण एखाद्या मोठ्या उद्यानात गेल्याशिवाय अशी संधी क्वचितच मिळत असते. पूर्वीच्या काळी कोल्हापूरचे शाहूराजे होते त्यांनी असे दहा-



**जाणून घ्या**

बारा हत्ती पाळले होते. त्या हत्तींसाठी खास मोठी घरे बांधली होती त्यांना 'पीलखाना' म्हणत असत.

शाहूमहाराजांचे हत्तींवर फार प्रेम होते. त्यामुळे ते या हत्तींची खूप चांगली देखभाल करत असत. त्यासाठी नोकर-चाकर होतेच पण रानटी हत्तींना काबूत ठेवण्यासाठी, त्यांना माणसाळून शिकवण्यासाठी खास माहुत ठेवले होते. या गोष्टींचे ज्ञान त्याकाळी माहुताप्रमाणे राजालाही असणे आवश्यक होते. असा दंडक होता. कारण अगदीपूर्वी युद्धात सुद्धा हत्तींचा उपयोग होत होता.

शाहूमहाराजांकडे जे दहा-बारा हत्ती होते त्यातले चार-पाच हत्ती फार देखणे होते. महाराजांनी त्यांची नावे 'गजराज', 'मोती', 'रामप्रसाद' व 'यशवंत' अशी होती. दसरा, दिवाळी अशा मोठ्या सणावारी या हत्तींना भरजरी वस्त्रे घालून व सोन्याम त्यांचे दागिने घालून त्यांनी रस्त्यावरून मिरवणूक काढली जायची. तेव्हा हत्ती इतके देखणे दिसत की हा भव्य मिरवणूक सोहळा लोक पहातच रहात असत! कोल्हापूरमध्ये अशा ताकदवान हत्तींशी खेळणे या धाडसी खेळाला 'साटमारी' असे म्हणत. त्यासाठी दगडी गोलाकार उंच भिंती बांधलेल्या होत्या, त्या आजही कोल्हापूर शहरात पहायला मिळतात. खासबाग, राधानगरी, पन्हाळा, सोनतळी या चार ठिकाणी या साटमारी पहायला मिळतात! तसा हत्ती हा प्राणी लोकप्रिय आहे. कारण तो बुद्धीमान प्राणी आहे. माणसाच्या मनातल्या भावना व विचार त्याला आपोआप समजतात. एकदा एक गोष्ट अशी घडली, की एका माणसाला हत्तीवर बसायचे होते, पण तो घाबरला आणि हत्तीविषयी वाईट विचार त्याच्या मनात आले. हत्ती त्या माणसाला मुळीच अंबारीत बसू देईना. शेवटी माहूताने कारण ओळखले व त्या माणसाला सांगितले, 'लगेच हत्तीची क्षमा माग!' त्याप्रमाणे त्या माणसाने क्षमा मागताच लगेच हत्तीने त्याला अंबारीत चढू दिले. उगीच नाही म्हणत बरं का हत्तीला गजराज! १२० वर्षांचे आयुष्य त्याला असते. लक्ष्मी देवतेच्या पाठीमागे हत्तीचे चित्र नेहेमी पहाता ना तुम्ही? गणपतीबाप्पांनाही हत्तीचेच तोंड आहे!

# फेसबुक हॅक होऊ नये म्हणून



तुमच्यापैकी अनेकजण फेसबूक वापरत असतील. युजर्सच्या सुरक्षेसाठी फेसबूक बरंच काही करत असलं तरी अकाउंट हॅक केलं जातं. हॅकर्स फेसबुक अकाउंट कशा प्रकारे हॅक करतात हे जाणून घेऊया...

**फिशिंग अटॅक**

'फिशिंग अटॅक' या पद्धतीने हॅकर्स फेसबूक अकाउंट हॅक करू शकतात. यासाठी हॅकर्स फेक म्हणजे खोटं लॉग इन पेज तयार करतात. ते खऱ्या फेसबूक पेजसारखं दिसतं. हॅकर्स युजर्सना त्यावर लॉग इन करायला सांगतात. यामुळे युजर आयडी आणि पासवर्ड सेव्ह होतो. ही टेक्स्ट फाईल डाउनलोड केल्यावर तुमचं अकाउंट हॅक होतं.

**कसा करायचा बचाव?**

फिशिंग अॅटॅकमध्ये अडकू नये यासाठी दुसऱ्याच्या पीसी किंवा लॅपटॉपमधून फेसबूक अकाउंट ओपन करू नका. फेसबूक ओपन करण्यासाठी कायम क्रोम ब्राउजरचा वापर करा. फेसबूक अकाउंटमध्ये लॉग इन करायला सांगणाऱ्या ई मेलकडे दुर्लक्ष करा.

**स्मार्ट टिप्स**

**की लॉग इन**

की लॉग इन ही फेसबुक अकाउंट हॅक करण्याची सोपी पद्धत आहे. 'की लॉगर' हा छोटासा प्रोग्राम आहे. हा प्रोग्राम कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपमध्ये इन्स्टॉल केला की तुमची सगळी माहिती त्यात साठते. यानंतर एफटीपी किंवा ई मेलच्या माध्यमातून ही माहिती पाठवली जाते.

**कसा करायचा बचाव?**

साईट विश्वासार्ह असेल तरच सॉफ्टवेअर डाउनलोड करा. युएसबी ड्राईव्ह स्कॅन करून घ्या. कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपम ध्ये अँटीव्हायरस सॉफ्टवेअर टाकून घ्या.

आपण पीसीच्या ब्राउजरमध्ये पासवर्ड सेव्ह करून ठेवतो. यामुळे हॅकर्सना तुमचं अकाउंट हॅक करणं सोपं जातं तसंच म ोबाईल फोनमधूनही फेसबूक हॅक करता येतं. फोनच्या माध्यमातून फेसबूक वापरत असाल तर जास्त काळजी घ्या. नको असलेली अॅप्स इंस्टॉल करू नका.

# उपयुक्त चांदी

चांदी हा पृथ्वीतील एक सुंदर, चमकदार आणि उपयुक्त धातू आहे. तिचा रंग पांढराचम कदार असतो.चांदी खूपच मऊ आणि लवचिक असते. प्राचीन काळापासून लोक चांदीचा वापर दागिने, नाणी, घरगुती वस्तू आणि पूजा-सामुग्री बनवण्यासाठी करत आले आहेत. चांदी पृथ्वीच्या खोल थरांमधील खडकांमध्ये मिळते. ती अनेक वेळा तांबे, शिसे आणि जस्त यांच्यासोबत मिसळलेली असते. अनेक नद्यांच्या वाळूतही चांदीचे छोटे चमकदार कण आढळून येतात.



**खनिजांची माहिती**

चांदी शोधण्यासाठी भूवैज्ञानिक आधी जमिनीचा अभ्यास करतात. मग खडकांमध्ये कुठे चांदी मिसळलेली आहे ते ठरवल्यावर खाणकाम करणारे कामगार मोठ्या मशिनने खडक तोडतात. या तुटलेल्या दगडांमध्ये चांदीचे कण असतात. त्यांना बाहेर काढून त्या खडकांचे छोटे तुकडे करतात. त्यानंतर हे तुकडे आणखी बारीक करून एकसारखी पूड तयार केली जाते. ही पूड पाण्यात मिसळून एक द्रव मिश्रण बनवले जाते. चांदी जड असल्यामुळे ती खाली बसते. वरचे पाणी आणि हलके दगडाचे तुकडे वेगळे काढले जातात.

त्यानंतर चांदी अजून शुद्ध करण्यासाठी तिला खूप उष्ण तापमानावर गरम केले जाते. गरम केल्यावर इतर धातू वितळतात आणि हलकी चांदी वर तरंगते. वरची चांदी वेगळी केली जाते आणि थंड करून त्यापासून छोट्या छोट्या पट्ट्या, बार किंवा दागिने बनवण्यासाठी लगडीबनवल्या जातात. ही चांदी अजून शुद्ध करण्यासाठी पुन्हा गरम करणे आणि अशुद्धता वेगळ्या करणे असे काही टप्पे करावे लागतात. शुद्ध चांदीची चमक खूपच तेजस्वी असते.चांदी काळी पडू नये म्हणून तिच्यावर खास थर दिला जातो.

# स्वामी विवेकानंदांचं बालपण

स्वामी विवेकानंदांची जयंती (१२ मे) राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरी केली जाते. त्यानिमित्त या थोर बुद्धीमान, तत्वज्ञानी व्यक्तीबद्दल जाणून घेऊया. ते बालपणी कसे होते?



**प्रेरणा**

त्यांना आज आपण स्वामी विवेकानंद या नावाने ओळखत असलो तरी त्यांचे खरे नाव नरेंद्र असे होते. त्यांचे वडील व्यवसायाने वकील होते. आई भुवनेश्वरीदेवी वृत्तीने धार्मिक आणि बुद्धीमान होती. तिने नरेंद्रवर बालपणीउत्तम संस्कार केले होते. बाल नरेंद्र लहानपणापासून अत्यंत श्रद्धाळू वृत्तीचे होते. त्याबद्दलची एक कथा सांगतात, बाल नरेंद्र लहानपणी आईबरोबर कीर्तन ऐकायला जात असत. असेच एके दिवशी ते कीर्तनाला गेले असताना कीर्तनकाराने हनुमान या देवाचे कीर्तन केले आणि 'हनुमान हा चिरंजीव म्हणजेच अमर आहे' असे सांगितले. ते ऐकून बाल नरेंद्राला हनुमानाबद्दल अत्यंत भक्ती निर्माण झाली आणि त्याला पाहण्याची उत्सुकताही वाटू लागली. कीर्तन संपल्यावर ते कीर्तनकारांकडे गेले आणि उत्सुकतेने विचारले, 'आपण आत्ता सांगितल्याप्रमाणे हनुमानाला केळी आवडतात ना? मग मी जर केळीच्या झाडापाशी त्यांची वाट बघितली तर ते मला भेटण्यासाठी येतील का?' हा प्रश्न ऐकूनकीर्तनकारांना हसू आले पण या छोट्या मुलाला नाराज करु नये म्हणून त्यांनी 'होय' असे उत्तर देऊन टाकले. झाले, नरेंद्र लगेच देवळाजवळच्याच एका केळीच्या झाडाखाली जाऊन बसला. चार-पाच तास झाले तरी त्याला हनुमान काही भेटले नाहीत. पण नरेंद्र जागचा हलला नाही. शेवटी, इतका वेळ हा मुलगा कुठे गेला म्हणून आईच त्याला शोधीत केळीच्या झाडाखाली आली. तिला नरेंद्रची इच्छा कळली तशी तिने मोठ्या युक्तीने त्यांची समजूत घातली. 'हे बघ, आज प्रभू रामरायांचे काही महत्त्वाचे काम निघाले असेल, ते करण्यासाठी हनुमंतराव गेले असतील. म्हणून इथे आले नसतील. सवडीने ते नक्की येतील!' हे पटल्यावर नरेंद्र घरी जायला तयार झाले.

# आग लागली असता

कोणत्याही आपत्तीचा सामना करण्यासाठी आपण सज्ज असायला हवं. कोणती दुर्घटना कधी घडेल याचा काहीच नेम नसतो. आता आगीचंच बघा. छोट्याशा चुकीमुळे आग लागू शकते. दिवाळीत फटाके फोडले जातात, पणत्या लावल्या जातात. अशा वेळी आग लागण्याची शक्यता अनेकपटींनी वाढते. दिवाळीतच नाही तर इतर वेळीही काळजी घेणं गरजेचं असतं. आग लागली तर कोणती काळजी घ्यावी याविषयी...

* आग लागल्यास लायटर, गॅस, मेणबत्ती, दिवा,



**टेक केअर**

पणती यापासून लांब रहा.

* दिवा, मेणबत्ती यापासून कपडे लांब ठेवायला हवेत. कपड्यांना लवकर आग लागते. तुमच्या बाबतीत असं घडलं तर घाबरू नका. मुख्य म्हणजे पळू नका. जमिनीवर झोपा. तोंड हातांनी झाकून घ्या आणि लोळा. यामुळे कपड्यांना लागलेली आग विझेल.

* आग लागलेली असताना तुम्ही घराच्या एखाद्या खोलीत असाल आणि दार बंद असेल तर लगेच दार उघडू नका.

दारांच्या फटींमधून धूर येत आहे का, ज्वाळा दिसत आहे का ते पहा.

दाराच्या पलीकडे आग लागली आहे का, हे तपासून घ्या. फटीतून धूर दिसत असेल तर दार उघडू नका.

* धूर दिसला नाही तर दाराला हात लावून बघा. दार खूप गरम लागलं तर थांबा. दार उघडू नका.

* दार गरम लागलं नाही तर हँडलला हात लावून बघा. हँडल गरम लागत असलं तरी दार उघडू नका.

* दाराखालून धूर येत नसेल, दार आणि हँडल थंड असेल तर दार किलकिलं करून बघा. दार उघडल्यावर अचानक धूर आला किंवा ज्वाळा दिसल्या तर लगेच बंद करा.

* ज्वाळांपेक्षाही धूर आणि घातक वायूंमुळे जास्त त्रास होतो. आग लागली तर जमिनीवर झोपा. धुरापासून लांब रहा.

*अग्निशमन दलाचे जवान तुम्हाला वाचवण्यासाठी येतील. तोपर्यंत धीर धरा. घाई करू नका. घरात किंवा इमारतीत संकटकाळी बाहेर पडण्याचा मार्ग असेल तर त्याचा वापर करा.

*मोठ्यांनी दिलेल्या सूचना ऐका. त्यांचं पालन करा.

# ए आय खरेच विचार करतो का ?

आपण रोज मोबाईल वापरतो. व्हिडिओ पाहतो.गेम खेळतो. गुगलला प्रश्न विचारतो. कधी कधी असे वाटते की समोरचेए आय प्रयुक्त उपकरण आपल्यासारखाच विचार करून उत्तर देते आहे. पण खरंच तसे असते का?ए आयविचार करतो का?



**रंजक विज्ञान**

त्यासाठी विचार करणे म्हणजे काय, हे आधी समजून घेऊ या. आपण एखादी गोष्ट पाहतो. ऐकतो.ती आठवतो.एखादी गोष्ट चूक किंवा बरोबर आहे ते आपण ठरवतो. आपल्या मनात आनंद, भीती, राग, शंका अशा भावना निर्माण होतात. हे सगळे मेंदूमुळे होते. ए आयकडे मात्र भावना नसतात.इच्छा नसतात. स्वतः चे मत नसते. ए आयम्हणजे एक अतिशय हुशार संगणक प्रोग्राम आहे. त्याला प्रचंड प्रमाणात माहिती दिलेली असते. लाखो पुस्तके, वेबसाईट्स, चित्रे, आवाज यावरून तो शिकलेला असतो. आपण प्रश्न विचारला की तो त्या माहितीमधून योग्य उत्तर शोधतो. हे सगळे खूप वेगाने होते.म्हणून आपल्याला वाटते की तो विचार करतोय.

पण ए आयस्वतःहून काहीही विचार करत नाही. आपण काही विचारले, आदेश दिला तरच तो काम करतो. त्याला हे समजत नाही की दिलेले उत्तर बरोबर आहे की चूक आहे. एखादी गोष्टचांगली आहे की वाईट आहे. तो फक्त आकडे, शब्द आणि पॅटर्न ओळखतो. उदाहरणार्थ, ए आयला आई या शब्दाची भावना कळत नाही.

# रोबो नाचणारा, गाणारा

वेगवेगळ्या कामांसाठी रोबोंचा वापर केला जातो. रोबोंमुळे माणसांवरचा ताण कमी होणार आहे. घरची कामं करण्यासाठी रोबो उपयुक्त ठरत आहे. सध्या कुरी नावाच्या रोबोची चर्चा आहे. हा रोबो लोकांच्या करमणुकीसाठी तयार करण्यात आला आहे. तो गाणं म्हणतो, नाच करतो. मेफिल्ड रोबोटिक्सने हा रोबो तयार केला आहे. कुरीचा एक व्हिडिओही त्यांनी शेअर केला आहे. यात तो नाचताना दिसत आहे. नाचताना तो पुढे सरकतो आहे. तसंच धमाल गाणंही म्हणत आहे.



**स्मार्ट गॅजेट्स**

छोटासा, गोंडस असा हा रोबो आहे. कुरीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. शिवाय त्यात नवं हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर अपडेट करण्यात आलं आहे. यात व्हर्च्युअल असिस्टंट मोबाईल एंटरटेनमेंट डिव्हाइस बसवण्यात आलं आहे. यात गाणी ऐकण्यासाठी ब्लू टूथ स्पीकर्स बसवण्यात आले आहेत. हा कुरी व्हिडिओ रेकॉर्डिंगही करेल. व्हिडिओसाठीचं खास फीचर यात बसवण्यात आलं आहे. त्यामुळे घरात पार्टी असो किंवा कोणताही सण, कुरी सगळं काही रेकॉर्ड करेल. या कुरीसोबत तुम्ही नाचू शकता. गाऊ शकता. लवकरच तो बाजारात उपलब्ध होणार आहे. तो एखाद्या खेळण्यासारखा दिसतो.

**खादाडी**

## यमी काकडी सँडविच



दुपारच्या वेळी काय खावं, असा प्रश्न तुम्हाला पडतो. अशा वेळी हेल्दी काकडी सँडविच ट्राय करता येईल. यासाठी पाऊण कप चीझ, काकडी, बटर आणि ब्रेड असे पदार्थ लागतील. सँडविच बनवण्यासाठी तुमच्या ब्रेड स्लाईसला बटर लावा. त्यावर चीझ पसरा. आता काकडी कापून घ्या. काकडीचे तुकडे ब्रेडवर ठेवा. दुसऱ्या ब्रेडलाही बटर आणि चीज लावा. हा ब्रेड आधीच्या ब्रेडवर ठेवा. मस्त काकडी सँडविच खा.

**स्टाईल**

## असा निवडा चष्मा



चष्मा लावणं हे आता स्टाईल स्टेटमेंट झालं आहे. त्यामुळे चष्मा निवडताना त्याची फ्रेम आणि डिझाइन यावर भर द्यायला हवा. चष्मा निवडताना तुम्ही स्वत: जा. तुमच्या चेहऱ्याला कोणती फ्रेम शोभून दिसते हे बघा. चष्म्याची खरेदी ऑनलाईनही करता येते. चष्म्याची काळजीही घ्यायला हवी. काचेवर धूळ साठणार नाही याकडे लक्ष द्या. चष्मा नेहमी मऊ कापडाने पुसा. डाग नीट स्वच्छ करा.

**परंपरा**

## वाराणसीचा त्रिपुरोत्सव



भारत हा परंपरांचा देश आहे. आपल्याकडे सण सारखेच असले तरी ते साजरा करण्याची पद्धत राज्यानुसार बदलत जाते. वाराणसीमध्ये दिवाळीनंतर 'देव दिवाळी'चा उत्सव साजरा केला जातो. याला त्रिपुरोत्सव असंही म्हटलं जातं. दिवाळीनंतर पंधरा दिवसांनी हा उत्सव साजरा केला जातो. कार्तिक महिन्यातल्या पौर्णिमेला या सोहळ्याचं आयोजन केलं जातं. शंकराने त्रिपुरासुराचा वध केला. ही घटना त्रिपुरोत्सवाच्या माध्यमातून साजरी केली जाते. या दिवशी भाविक मोठ्या संख्येने वाराणसीला येतात.

**दोस्त हे मस्त**

## ब्राझिलियन तापीर



ब्राझिलियन तापीर हा गेंड्याच्या कुटुंबातला प्राणी आहे. तो दक्षिण अमेरिकेतल्या घनदाट जंगलांमध्ये आढळतो. हा प्राणी पाण्याजवळ राहतो. त्याला पोहता येतं. शत्रुपासून बचाव करण्यासाठी हे प्राणी अनेकदा पाण्यात जाऊन लपतात. या प्राण्याची मोठ्या प्रमाणावर शिकार झाली आहे. त्यामुळे त्यांची संख्या कमी होत आहे. ही प्रजाती वाचवण्यासाठी प्रयत्न होत आहेत.

## निवडक

### मैदानावरच फलंदाजाचा हृदयविकाराने मृत्यू

**मिजोरम :** मिजोरमचे माजी रणजी क्रिकेटपटू के. लालरेम रूआटा यांचे गुरुवारी क्रिकेट मैदानावरच निधन झाले. स्थानिक क्रिकेट सामन्यादरम्यान हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेमुळे मिजोरमसह संपूर्ण क्रिकेट वर्तुळात शोककळा पसरली आहे. ३८ वर्षीय लालरेम रूआटा एका स्थानिक स्पर्धेत वेंगनुआई रेडर्स क्रिकेट क्लबकडून खेळत होते. फलंदाजी आटोपल्यानंतर तंबूकडे परतत असताना अचानक त्यांची तब्येत बिघडली अन् ते मैदानावरच कोसळले. त्यांना तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. माहितीनुसार हृदयविकाराचा झटका हे मृत्यूचे कारण असल्याचे सांगण्यात येत आहे. के. लालरेमरूआटा हे मिजोरम क्रिकेटमधील एक परिचित आणि आदरणीय नाव होते. त्यांनी दोन वेळा रणजी ट्रॉफीमध्ये मिजोरमचे प्रतिनिधित्व केले होते. तसेच सैयद मुश्ताक अली ट्रॉफीमध्येही त्यांनी सात सामने खेळले होते. राज्यस्तरीय व स्थानिक क्रिकेटमध्ये त्यांचा मोठा प्रभाव होता. ते सातत्याने क्लब क्रिकेट खेळत राहिले आणि अनेक युवा खेळाडूंसाठी प्रेरणास्थान ठरले. मिजोरम क्रिकेट संघटना आणि बीसीसीआय डोमेस्टिककडून लालरेमरूआटा यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. संघटनेच्या निवेदनात म्हटले की, ही घटना मिजोरम क्रिकेटसाठी मोठी हानी आहे. आम्ही के. लालरेमरूआटा यांच्या कुटुंबियांप्रती मनापासून संवेदना व्यक्त करतो.

### रत्नागिरीत मोफत कराटे ट्रेनिंग शिबीर

**पावस :** कराटे असोसिएशन व जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय यांच्यातर्फे आयोजित मोफत ॲडव्हान्स कराटे ट्रेनिंग कॅम्पला उत्साहात सुरुवात झाली. तालुका क्रीडाधिकारी गणेश जगताप यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. त्यांनी स्वसंरक्षणाचे महत्त्व पटवून दिले. कराटे प्रशिक्षकांनी कॅम्पदरम्यान सहभागी विद्यार्थ्यांना काताकुमिते, स्पर्धात्मक कराटेचे नियम तसेच स्वसंरक्षण याबद्दल मार्गदर्शन देण्यात आले. कॅम्पचे प्रशिक्षण रत्नागिरीतील नामवंत कराटे प्रशिक्षक जावेद मिरकर, सूरज बने, अरुण बेग यांनी दिले. विद्यार्थ्यांना कराटेचे काता, कुमिते आणि स्वसंरक्षणाचे उत्कृष्ट प्रशिक्षण मिळाले. तसेच सहाय्यक कराटे प्रशिक्षक नौशिन कापडी, तेजस जाधव, अयान मिरकर, रिया माचकर, दिव्य यादव, ध्रुव बसणकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### कराटे स्पर्धेत मधुरासह सानिकाचे यश

**सावंतवाडी :** विरार-मुंबई येथे झालेल्या स्टेअर्स युथ महाराष्ट्र कराटे चॅम्पियनशिप २०२५-२६ या राज्यस्तरीय स्पर्धेत मळगाव येथील मधुरा मांजरेकर हिने रौप्य व कांस्य, तर सानिका गोसावी हिने दोन कांस्यपदके पटकावत गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. विरार येथील अर्नाळा बीचवर ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत राज्यभरातील विविध कराटे अकादमीचे खेळाडू सहभागी झाले होते. मधुरा व सानिका यांनी जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर हे यश प्राप्त केले. मधुरा व सानिका येथील आरपीडी महाविद्यालयात अकरावी कला शाखेत शिकत असून मळगाव येथे कराटेचे प्रशिक्षण घेत आहेत. या दोघींना इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सेल्फ डिफेन्सचे संचालक किरण देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. या सुवर्ण यशामुळे दोघींचीही दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशामुळे मळगाव परिसरासह सर्वस्तरातून दोघींचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### अहिल्यानगर येथे सायकलिंग चाचणी

**मालवण :** सायकलिंग क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची इच्छा असलेल्या १४ ते १५ वयोगटातील खेळाडूंसाठी एक मोठी संधी उपलब्ध झाली आहे. सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्यावतीने तसेच स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनाखाली १० व ११ जानेवारीला वाडीया पार्क क्रीडांगण, अहिल्यानगर येथे राज्यस्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी रोड सायकलिंग, ट्रॅक सायकलिंग आणि माउंटन बाईक या प्रकारांसाठी असेल. या चाचणीतून निवडल्या गेलेल्या खेळाडूंना स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया तर्फे उच्च दर्जाचे प्रशिक्षण, निवासी सुविधा आणि क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. यात १४-१५ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना सहभागी होता येणार आहे. खेळाडूंची निवड केवळ सायकलिंगवर आधारित नसून त्यांच्या शारीरिक क्षमतेवर केली जाणार आहे. मुलांसाठी १६०० मीटर धावणे, व्हर्टिकल जम्प आणि ब्रॉड जम्प तर मुलींसाठी ८०० मीटर धावणे, व्हर्टिकल जम्प आणि ब्रॉड जम्प घेतली जाणार आहे. चाचणीसाठी येताना खेळाडूंनी जन्म दिनांकाचा दाखला, गुणपत्रिका, आधारकार्ड, पासपोर्ट साईज फोटो आणणे अनिवार्य आहे. ही चाचणी केवळ स्पर्धा नसून करिअर, शिस्त आणि फिटनेसच्या दृष्टीने राष्ट्रीय स्तरावर पोहोचण्याचे मोठे व्यासपीठ आहे.

## टाटा स्टील चेस स्पर्धा

# प्रज्ञानंदने घड्याळ बंद केल्याने वाद

## ■ अमेरिकन खेळाडूशी सामना झाला ड्रॉ; राऊंड-४ मध्ये अर्जुन एरिगैसीकडून आनंद पराभूत

**| कोलकाता | वृत्तसंस्था |**

**कोलकाता येथे सुरू असलेल्या टाटा स्टील चेस इंडिया रॅपिड स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी, भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद आणि अमेरिकन खेळाडू वेस्ली सो यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्यात पंचांच्या निर्णयावरून मोठा वाद निर्माण झाला. सामन्यादरम्यान प्रज्ञानंदने पुढील चाल न खेळताच घड्याळ थांबवले आणि पंचांकडे (निर्णायक) मदत मागितली. यानंतर पंचांनी सामना ड्रॉ (बरोबरी) घोषित केला. या निर्णयावर बुद्धिबळ जगतात प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.**





आर. प्रज्ञानंदने सामन्याच्या शेवटच्या क्षणी आपला प्यादा प्रमोशन (राणी बनवण्याच्या) स्थितीत पुढे सरकवला होता. पण घड्याळात खूप कमी वेळ शिल्लक होता आणि तो प्याद्याला राणीमध्ये बदलू शकला नाही. वेळ संपण्यापूर्वी बरोबर एक सेकंद आधी प्रज्ञानंदने घड्याळ थांबवले आणि पंचांची मदत मागितली. यावेळी समालोचक आणि प्रेक्षकांना वाटले की, वेळ संपल्यामुळे वेस्ली सोला विजय मिळेल, पण दीर्घ चर्चेनंतर पंचांनी सामना ड्रॉ घोषित केला.

या निर्णयावर प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ पंच क्रिस बर्ड यांनी तीव्र टीका केली. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर लिहिले, महासामना पराभव मानला जायला हवा होता. नियम ६.११.२ नुसार, खेळाडू घड्याळ तेव्हाच थांबवू शकतो जेव्हा प्रमोशन झाले असेल आणि आवश्यक मोहरा उपलब्ध नसेल. येथे प्रमोशन झालेच नाही, त्यामुळे हा नियम लागू होत नाही.अनेकांचे असे मत आहे की प्रज्ञानंदने हा सामना पराभव मानला पाहिजे होता. मात्र, वेस्ली सो म्हणाला की ही घटना अनवधानाने घडली आणि त्याला बोर्डवर खेळून जिंकणे आवडते, त्यामुळे त्याने विजयाचा दावा केला नाही.

दरम्यान, पाच वेळा विश्वविजेते ठरलेल्या विश्वनाथन आनंद यांना अर्जुन एरिगैसीविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. चौथ्या फेरीत आनंद चांगल्या स्थितीत होते, परंतु एका चुकीच्या चालीमुळे अर्जुनने सामन्याचे चित्र पालटले आणि विजय मिळवला. मात्र, यानंतर आनंदने शानदार पुनरागमन केले. त्यांनी हांस नीमन आणि वोलोडार मुर्जिन यांना हरवून ४.५ गुण मिळवले आणि संयुक्त आघाडी घेतली.

आनंदसोबत युवा भारतीय खेळाडू निहाल सरिनही ४.५ गुणांवर आहे. निहालने दिवसाचे तिन्ही सामने जिंकले.त्याने नीमन आणि मुर्जिनच्या चुकांचा फायदा घेतला आणि विदित गुजराथीला एंडगेममध्ये हरवले. महिला गटात रशियाची कॅटेरिना लाग्नो सहा फेऱ्यांनंतर ४.५ गुणांसह अव्वल स्थानी आहे. भारतीय खेळाडूंमध्ये वंतिका अग्रवाल तीन गुणांसह पाचव्या स्थानावर आहे, तर हरिका द्रोणावल्ली, आर. वैशाली आणि रक्षिता रवी अजूनही विजेतेपदाच्या शर्यतीत आहेत.

## सिंधू, सात्विक-चिराग उपांत्यपूर्व फेरीत

**| क्वालालंपूर | वृत्तसंस्था |**

स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने जपानच्या टोमोका मियाझाकीचा पराभव करत महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. दुखापतीतून सावरल्यानंतर पुनरागमन करणाऱ्या सिंधूने आठव्या मानांकित मियाझाकीचा केवळ ३३ मिनिटांत २१-८, २१-१३ असा सहज पराभव केला. शिवाय, पुरुष दुहेरीत भारताची अव्वल पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनीही स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवला. मात्र, पुरुष एकेरीत भारताचे आव्हान संपुष्टात आले.

महिला एकेरीत दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती सिंधू आता उपांत्यपूर्व फेरीत तिसऱ्या मानांकित जपानी खेळाडू अकाने यामागुचीशी दोन हात करेल. यादरम्यान, भारताची अव्वल पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज

### लक्ष्य सेन, आयुष शेट्टी पराभूत

**भारताच्या पुरुष एकेरीतील खेळाडूंची मात्र निराशा झाली. लक्ष्य सेन आणि युवा आयुष शेट्टी या दोघांनाही उपउपांत्यपूर्व फेरीत (प्री-क्वार्टर फायनल) पराभवाला सामोरे जावे लागले. लक्ष्य सेनला हाँगकाँगच्या ली च्युक यिउविरुद्ध २२-२२, १५-२१ अशा फरकाने पराभव पत्करावा लागला. आयुष शेट्टीने जागतिक अव्वल मानांकित शी यू क्यूविरुद्ध कडवी झुंज दिली. मात्र, त्याचे आव्हानही १८-२१, २१-१८, १२-१२ अशा फरकाने संपुष्टात आले.**



रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनीही स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवला आहे. त्यांनी मलेशियाच्या जागतिक क्रमवारीत १७ व्या स्थानी असलेल्या जुनैदी आरिफ आणि रॉय किंग याप जोडीवर २१-१८, २१-१२ असा विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या या भारतीय जोडीने मलेशियाच्या जोडीविरुद्ध आपले ४-० असे सरस रेकॉर्ड कायम ठेवले आहे. आता पुढील फेरीत त्यांचा सामना चिनी तैपेईच्या चेन झी रे-लिन यू चिह आणि सहाव्या मानांकित इंडोनेशियाच्या फजर अल्फियान-फिकरी मुहम्मद यांच्यातील विजेत्याशी होईल.

## डेरवण येथे क्रीडा स्पर्धेची सांगता

**पावस :** जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या जिल्हास्तरीय हिवाळी क्रीडा स्पर्धा चिपळूण तालुक्यातील डेरवण येथे सुरू झाल्या. बुधवारी (दि. ७) या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. स्पर्धेचा बक्षीस समारंभ गुरूवारी (दि. ८) सायंकाळी ४ वा. होणार आहे. बुधवारी मुले, मुलींच्या सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धा झाल्या. ८ ला मुले, मुली यांच्या सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपले शेलचे कौशल्य दाखवत विजेते पडला गवसणी घालण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना खेळाचे जीवनातील महत्व समजावून सांगितले.

## उद्या खानावमध्ये क्रिकेट स्पर्धा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुका सेल्स टीम आयोजित अलिबाग सेल्स प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी(दि.११) सकाळी या स्पर्धेला सुरूवात होणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.



वेगवेगळ्या कंपनीच्या माध्यमातून मार्केटींगची कामे केली जातात. या सेल्स टीमला एका छताखाली आणण्यासाठी अलिबाग तालुका सेल्स टीमच्या माध्यमातून गतवर्षापासून प्रिमिअर लिग क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले जात आहे. याही वर्षी हा उपक्रम अलिबाग तालुका सेल्स टीमच्या वतीने खानावमध्ये राबविण्यात येणार आहे. या क्रिकेट स्पर्धेत एकूण आठ संघ सहभागी होणार आहे. अंतिम सामन्यानंतर प्रथम क्रमांकाला रोख सात हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला चार हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक, सामनावीर, मालिकाविराला आकर्षक बक्षीस देऊन त्यांचा सन्मान केला जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## शाहिन आफ्रिदीची जीभ घसरली

**| लाहोर | वृत्तसंस्था |**

आशियाई क्रिकेट परिषद आणि पाकिस्तान क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्या हातून ट्रॉफी स्वीकारण्यास भारतीय संघाने नकार दिल्यानंतर नक्वी ती ट्रॉफी स्वत:सोबत घेऊन गेले होते. या घटनांची बरीच चर्चा क्रिकेटविश्वात झाली.दरम्यान, एका कार्यक्रमात आशिया कपबाबत पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिन आफ्रिदीने वादग्रस्त भाष्य केले आहे. त्याच्या व्हिडिओही व्हायरल होत आहे.

शाहिन आफ्रिदी म्हणाला, सीमेपलीकडील लोकांनी खिलाडूवृत्तीचे उल्लंघन केले. आमचं काम क्रिकेट खेळले आहे आणि त्यावरच आमचे लक्ष्य क्रेंदित असेल. आम्ही मैदानावरच उत्तर देऊ. शाहिनच्या या विधानांवर सध्या टीकेची झोड उठली आहे. अनेक भारतीयांनी त्याला सुनावले आहे. काहींनी म्हटलं आहे की महो उत्तर मैदानातच मिळेल.भारत आणि पाकिस्तान हे संघ आता टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेत पुन्हा आमने-सामने असणार आहेत. साखळी फेरीसाठी दोन्ही संघ एकाच गटात आहेत. या दोन संघात १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे सामना होणार आहे. तथापि, शाहिन आफ्रिदी या टी २० वर्ल्ड कपमध्ये खेळणार की नाही, यावर अद्याप प्रश्नचिन्ह आहे. तो सध्या गुडघ्याच्या दुखापतीचा सामना करत आहे. त्याच्यावर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या लाहोरमधील हाय परफॉर्मन्स सेंटरमध्ये उपचार सुरू आहेत. बिग बॅश स्पर्धेत क्षेत्ररक्षण करताना गुडघा दुखावला.त्याला ऑस्ट्रेलियामध्ये बिग बॅश लीगमध्ये खेळताना दुखापत झाली आहे. त्यामुळे तो ब्रिस्बेन हिट संघातून बाहेर झाला असून पाकिस्तानमध्ये परतला आहे. दरम्यान, त्याची दुखापत किती गंभीर आहे आणि त्याला त्यातून तंदुरुस्त होण्यास किती काळ लागणार आहे, याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही.

## शूटिंग बॉल स्पर्धेमध्ये आचरा, त्रिंबक विजेते

**आचरा :** पोलीस रेजिंग डे निमित्त येथील पोलीस ठाण्यातर्फे आयोजित शूटिंग बॉल स्पर्धेत शिवरामेश्वर आचरा तर श्री पासिंग शूटिंग बॉलमध्ये त्रिंबक रामेश्वर संघाने प्रथम क्रमांक मिळविला. आचरा पिरावाडी येथे झालेल्या या स्पर्धेत सहा संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन आचरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रदीप पोवार यांच्या हस्ते झाले. यावेळी जनता विद्यामंदिर त्रिंबकचे चेअरमन सकपाळ, पोलीस ठाण्याचे मिलिंद परब, हेमंत पेडणेकर, मनोज पुजारे उपस्थित होते. या स्पर्धेचे चषक सचिन माणगांवकर यांनी पुरस्कृत केले होते. शूटिंग बॉल स्पर्धेमध्ये संघातील खेळाडूंनी विजयासाठी कौशल्य पणाला लावले. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

## रामकृष्ण ठरला विजयाचा शिल्पकार

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६च्या एलिट ग्रुप सी मधील एका हाय-व्होल्टेज सामन्यात महाराष्ट्राने शेवटच्या षटकांत झालेल्या रोमांचक सामन्यात गोव्याचा ५ धावांनी पराभव करून सर्वांना चकित केले. हा सामना खऱ्या अर्थाने गोलंदाजाची परीक्षा होती.

महाराष्ट्राचा अष्टपैलू खेळाडू रामकृष्ण घोष याने शेवटच्या षटकात उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या संघाचा विजय निश्चित केला. रामकृष्ण घोषच्या जादुई गोलंदाजीने महाराष्ट्राने गोव्याकडून सहज विजय हिसकावून घेतला.

रामकृष्ण घोषच्या सहा जादुई चेंडूंमुळे गोवा संघ लक्ष्यापासून फक्त पाच धावांनी दूर राहिला. सामन्याचा खरा नाट्यमय क्षण शेवटच्या षटकात उलगडला. गोव्याला जिंकण्यासाठी फक्त सहा धावांची आवश्यकता होती, एक विकेट शिल्लक होती. या महत्त्वाच्या क्षणी, रामकृष्ण घोषने गोलंदाजीला सुरुवात केली. घोषने दबावाखाली उत्कृष्ट नियंत्रण ठेवले आणि संपूर्ण षटकात एकही धाव दिली नाही. मेडन ओव्हर टाकत त्याने महाराष्ट्राला पाच धावांनी संस्मरणीय विजय मिळवून दिला. रामकृष्ण घोषने १० षटकांत फक्त ३५ धावा दिल्या आणि एक गडी घेतला.



सामन्यात महाराष्ट्राने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ७ गडी गमावून २४९ धावा केल्या. यामध्ये ऋतुराज गायकवाडचे शतक होते. ऋतुराज गायकवाडने कर्णधारपदाला साजेशी १३४ धावांची खेळी केली. तर विकी ओस्तवालने ५३ धावांचे योगदान दिले. प्रत्युत्तरादाखल गोव्याने दमदार सुरुवात केली.

कश्यप बखले आणि स्नेहल कौथनकर यांनी पहिल्या विकेटसाठी ८३ धावा जोडल्या. पण त्यानंतर डाव डळमळीत झाला आणि संघाने २२१ धावांत ९ गडी गमावले. नंतर ललित यादवने गोव्याचा डाव सावरला आणि त्याने ६७ चेंडूत नाबाद ५७ धावा केल्या. वासुकी कौशिकनेही त्याला साथ दिली. पण ही जोडी संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही. रामकृष्ण घोष आयपीएल २०२५ मध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून खेळताना दिसतील. रामकृष्ण घोष आयपीएल २०२५ च्या आधी सीएसके संघात सामील झाले आणि चेन्नई सुपर किंग्जने लिलावात त्याच्यावर ३० लाख रुपये खर्च केले. तथापि, त्याला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. तरीही, त्याला आयपीएल २०२६ साठी कायम ठेवण्यात आले. संघ व्यवस्थापनाचा हा विश्वास या वर्षी फायदेशीर ठरू शकतो आणि तो आयपीएलमध्ये पदार्पण करताना दिसू शकतो.

## विजय हजारे ट्रॉफी स्पर्धा अंतिम टप्प्यात | १३ जानेवारीला होणार फायनल

# उपांत्य पूर्वसाठी ८ संघ फिक्स

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

विजय हजारे ट्रॉफी २०२५-२०२६ या स्पर्धेत (२०२५-२०२६) ८ जानेवारीला साखळी फेरीतील शेवटचे सामने खेळवण्या आले. मुंबई, महाराष्ट्र दिल्लीसह अनेक संघांनी साखळी फेरीत आपले शेवटचे सामने खेळले. त्यानंतर आता उपांत्य पूर्व अर्थात क्वार्टर फायनलचा थरार रंगणार आहे.

या फेरीत एकूण ८ संघांमध्ये चुरस पाहायला मिळणार आहे. या फेरीतील ४ सामने हे १२ आणि १३ जानेवारीला खेळवण्यात येणार आहेत. मुंबई, दिल्ली, उत्तर प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश, सौराष्ट्र, विदर्भ आणि पंजाब या ८ संघांनी उपांत्य पूर्व फेरीचं तिकीट मिळवलं आहे. या ८ संघांमध्ये आता उपांत्य फेरीत पोहचण्यासाठी चुरस पाहायला मिळणार आहे.

उपांत्य पूर्व फेरीतील सर्व सामने हे एकाच ठिकाणी होणार आहेत. उपांत्य पूर्व फेरीतील सामने हे बंगळुरुतील सेंट्रल ऑफ एक्सीलेन्समध्ये आयोजित करण्यात आले आहेत. पहिले २ सामने हे १२ जानेवारीला होणार आहे. तर शेवटचे २ सामने हे १३ जानेवारीला खेळवण्यात येणार आहेत.

विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेमध्ये देशातील दर्जेदार खेळाडूंचा खेळ भारतीयांनी पाहिला. या स्पर्धेमध्ये षटकार आणि चौकारांची आतषबाजी पाहायला मिळाली. अनेक गुणवंत खेळाडूंची शतके आणि गोलंदाजांची भेदक गोलंदाजी प्रेक्षकांना अनुभवता आली.




### पंजाब विरुद्ध मध्य प्रदेश आणि दिल्ली विरुद्ध विदर्भ

**दुसऱ्या सामन्यात उत्तर प्रदेश विरुद्ध सौराष्ट्र आमनेसामने असणार आहेत. त्यानंतर १३ जानेवारीला पंजाब विरुद्ध मध्य प्रदेश आणि दिल्ली विरुद्ध विदर्भ हे सामने होणार आहेत. पंजाबच्या कर्णधारपदाची जबाबदारी ही टीम इंडियाचा युवा सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्मा याच्याकडे आहे. पंजाबने साखळी फेरीतील शेवटच्या सामन्यात मुंबईसारख्या तगड्या संघाला पराभूत केले. त्यामुळे पंजाबचा विश्वास दुणावलेला असणार आहे. त्यामुळे पंजाब संघ मध्य प्रदेश विरुद्ध कशी कामगिरी करतो, याची उत्सकूता आहे. तसेच यूपी-सौराष्ट्र यांच्यापैकी उपांत्य फेरीचं तिकीट कोणता संघ मिळवणार? हे पाहणंही महत्त्वाचं ठरणार आहे. त्यामुळे आता या ८ संघांपैकी कोणते ४ संघ पुढील फेरीत पोहचणार? यासाठी १३ जानेवारीपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.**

### मुंबईसमोर कर्नाटकाचं आव्हान

**मुंबईसमोर क्वार्टर फायलनमध्ये कर्नाटकाचं आव्हान असणार आहे. या सामन्याकडे साऱ्या क्रिकेट चाहत्यांचं लक्ष असणार आहे. या दोन्ही संघांत बहुतांश कॅप्ड खेळाडू आहेत. सूर्यकुमार यादव,शिवम दुबे, श्रेयस अय्यर, यशस्वी जैस्वाल, सर्फराज खान यासारखे कॅप्ड खेळाडू मुंबई टीममध्ये आहेत. तर देवदत्त पडीक्कल आणि मयंक यादव हे कर्नाटक संघात आहे. त्यामुळे मुंबई विरुद्ध कर्नाटक यांच्यापैकी कोण मैदान मारणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.**

## तायक्वांदोत 'गोगटे'ला विद्यापीठाचे उपविजेतेपद

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

मुंबई विद्यापीठ पुरुष व महिला तायक्वांदो स्पर्धेत गोगटे- जोगळेकर महाविद्यालय (स्वायत्त) रत्नागिरीच्या पुरुष व महिला संघाने यश मिळवले. संघाने एक सुवर्णपदक, एक रौप्यपदक आणि दोन कास्यपदक प्राप्त करत महाविद्यालयाच्या महिला संघाने महिला तायक्वांदो स्पर्धेचे सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावले.

मुंबई विद्यापीठ आणि मार्गताम्हाणे येथील डॉ. तात्यासाहेब नातू, आर्ट्स आणि कॉमर्स महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत गोगटे महाविद्यालयाच्या महिला संघात श्रुती चव्हाण (५४ किलोखालील) हिने सुवर्णपदक पटकावले. समर्था बने (४६ ते ४९ किलोगट) हिने रौप्यपदक मिळवले. पुरुष संघातील सुजल सोळंके (६८ ते ७४ किलो) याने कास्य, देवेन सोपल (५४ किलोखालील गट) यानेही कांस्यपदक मिळवले.

सई सावंत व पार्थ गावडे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. महाविद्यालयाच्या पुरुष व महिला तायक्वांदो संघाला महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. विनोद शिंदे, प्रशिक्षक शाहरुख शेख, प्रा. कल्पेश बोटके यांचे मार्गदर्शन आणि जिल्हा तायक्वांदो असोसिएशनचे सहकार्य लाभले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)